म.ग्रं.सं. वाचनालय, शाखा
विषय : नाटक
दा.क्र.: २३१०१



— पु. ल. देशपांडे

IRBK-0123907

श्री विद्या प्रकाशन पुणे

२३८०७

वाचनालय
नाशिक

3 JUL 1998
3 AUG 1998
3 NOV 1999
0 APR 2000
4 MAY 2000

मराठी ग्रं[illegible] [illegible], ठाणे
सरस्वती मंदिर, सुभाष पथ,
स्टेशन रोड, जिल्हा परिषदे समोर
ठाणे-४०० ६०१
दूरध्वनी - २५४०६७८७

२३८०७ [illegible] ४/७/९०
नाशिक

19 OCT 1998
1 DEC 1997

# “सुंदर मी होणार”

# "सुंदर मी होणार"

[ तीन अंकी नाटक ]

लेखक

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

IRBK-0123907

IRBK-0123907

श्रीविद्या प्रकाशन

२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ
पुणे ३०

मुखपृष्ठ सजावट
गोपाळकृष्ण भोवे

मूल्य : दहा रुपये

मुद्रक :
चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ
पुणे ३०

आवृत्ती पहिली
३०/४/५८
आवृत्ती दुसरी
३०/४/६०
आवृत्ती तिसरी
१२/१२/६३
आवृत्ती चौथी
१२/२/६९
आवृत्ती पाचवी
१२/११/७७
आवृत्ती सहावी
१/११/८६

२३९०५ नों. दि ५।७।९०

“ सुंदर मी होणार ”

**पुस्तक आणि प्रयोग**
**यांच्या हक्कासंबंधी**

या पुस्तकाच्या या आवृत्तीच्या प्रकाशनाखेरीज पुढील आवृत्तींचे, पटकथेचे, भाषांतराचे, रेडिओसाठी अगर पुस्तकात उतारे घेण्याचे वगैरे सर्व हक्क सौ. सुनीता पुरुषोत्तम देशपांडे यांच्या स्वाधीन आहेत.

**प्रयोग** : ह्या नाटकाचे प्रयोग करावयाचे झाल्यास, मग ते फुकट असोत, तिकिटे लावून असोत अगर कुठल्याही संस्थेच्या मदतीसाठी इ. इ. असोत, नाटकाच्या तालमी सुरू करण्या-पूर्वी, सौ. सुनीता पुरुषोत्तम देशपांडे [ १ रूपाली, ७७७ शिवाजीनगर, पुणे ४११००४ ] यांची लेखी परवानगी घेणे अत्यंत आवश्यक आहे. परवानगी घेतल्याशिवाय प्रयोग केल्यास कायदेशीर इलाज केला जाईल.

पु. ल. देशपांडे

प्रस्तुत नाटकाचा प्रथम प्रयोग ३० एप्रिल १९५८ रोजी रात्रौ ८॥ वाजता केळेवाडी, मुंबई ४ येथील मुंबई मराठी साहित्य संघमंदिरात, साहित्य संघाच्या नाट्योत्सवात सादर करण्यात आला.

कलावंत

| | |
|---|---|
| दिदी | सुनीता देशपांडे |
| राजेंद्र | काशीनाथ घाणेकर |
| प्रताप | राम भडसावळे |
| डॉक्टर | आत्माराम भेंडे |
| बेबी | विजया जयवंत |
| महाराज | दाजी भाटवडेकर |
| संजय | पु. ल. देशपांडे |
| हुजऱ्या | सुरेश कर्णिक |
| मेनका | उषा परांजपे |
| सुरेश | प्रभाकर जठार |
| सुभानराव | गंगाधरपंत जोशी |

रंगभूषा

नाना जोगळेकर

दिग्दर्शक

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

निर्मिती

मुंबई मराठी साहित्य संघ ( नाट्यशाखा )

हे नाटक लिहिताना ‘ इम्मॉर्टल् लव्ह ’ ह्या ब्राउनिंग पतिपत्नींच्या चरित्र-ग्रंथाचा, व्हर्जीनिया वूल्फने लिहिलेल्या ‘ फ्लश् ’ ह्या पुस्तकाचा आणि ‘ बॅरेट्स् ऑफ् विंपोल् स्ट्रीट ’ ह्या नाटकाचा आधार मिळाला आहे. परंतु एक विनंती करावीशी वाटते—हे नाटक पाहताना अगर वाचताना यांतील महाराज म्हणजे बॅरेट नव्हे, दिदी म्हणजे एलिझबेथ नव्हे आणि संजय म्हणजे ब्राउनिंग नव्हे ही गोष्ट कृपा करून ध्यानात ठेवावी. ह्यातला बराचसा रंग त्यांच्याच जीवनातला आहे खरा, परंतु ही चित्रे संपूर्णतया त्यांची नव्हेत. तुलनेला माझी हरकत नाही. ( अर्थात हरकती घेणारा मी कोण ? ) परंतु तुलना, ह्या पात्र-निर्मितीमागली भूमिका लक्षात घेऊन व्हावी. ह्या नाटकातील ‘ शब्दावाचुनि कळले सारे शब्दांच्या पलिकडले ’ ह्या ओळी माझे मित्र मंगेश पाडगावकर ह्यांच्या आहेत. त्यांचा उपयोग करू दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

ह्या नाटकाचा प्रयोग उभा करताना अनेकांचे साहाय्य झाले आहे. मुख्यतः ह्या प्रयोगात भाग घेणारे सर्व कलाकार. पहिल्या अंकातले इंग्रजी गाणे शिकवणारी आत्माराम भेंड्यांची चिमुकली निमा, रंगभूमीच्या सजावटीसाठी राबलेले माझे मित्र चित्रकार गोडसे, त्या बाबतीत काही मोलाची सूचना करणारे श्री. श्याम आडारकर आणि आनंद पै ह्या सर्वांचा मी आभारी आहे. याखेरीज ह्या नाटकासाठी प्रयोगदृष्ट्या आवश्यक अशा वस्तू मिळविण्यासाठी माझे मित्र अंधृटकर यांनी जिवापाड परिश्रम केले आहेत, त्यांचा मी ऋणी आहे. पुस्तकाची सजावट श्री. गोपाळकृष्ण भोबे यांनी केली. त्याचप्रमाणे ह्या नाटकाच्या तालमी घेण्यासाठी श्री. मो. ग. रांगणेकर यांनी आपल्या नाट्य-निकेतनाचा तालीम हॉल सर्वस्वी आमच्या स्वाधीन केला ह्याबद्दल त्यांचा मी व्यक्तिशः ऋणी आहे. मुंबई मराठी साहित्य संघाच्या सर्व कार्यकर्त्यांच्या हार्दिक आणि सक्रिय पाठिंब्यामुळे हे नाटक उभे राहिले आहे याची मला जाणीव आहे.

**पु. ल. देशपांडे**

*Though I do my best, I shall scarce succeed*
*But what if I fail of my purpose here?*
*It is but to keep the nerves at strain,*
*To dry one's eyes and laugh at a fall,*
*And baffled, get up and begin again,*
*So the chase takes up one's life, that's all.*

ROBERT BROWNING

**रॉबर्ट आणि एलिझबेथ ब्राऊनिंग**

*तुमच्या काव्यांतून जीवनाविषयक नाट्य आणि चारित्र्यग्रंथांतून मला जी प्रेरणा मिळाली ती घेऊन मी हे नाटक लिहिले आहे. ते तुमच्या नित्य स्फूर्तिदायक स्मृतींना अर्पण करतो. ह्यातल्या अपूर्णत्वाबद्दल मला क्षमा करून ह्या नाट्यकृतीचा स्वीकार करा.*

पु. ल. देशपांडे

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय ठाणे.
क्र. २३९६५ नों. दि. ५।७।६०...
वि. नाटक

*नंदनवाडीच्या महाराजांचा राजवाडा ! महाराजांची सर्वांत मोठी मुलगी 'दिदी' आपल्या दालनांत, आजारी माणसाला अधिक आरामांत बसतां यावं अशा प्रकारच्या खुर्चीवर बसून कविता लिहिण्यांत गढली आहे. मागें आणि डाव्या बाजूला उंच खिडक्या आहेत. परंतु त्यांवर पडदे सोडलेले आहेत. दिदीच्या खुर्चीशेजारीं एक टीपॉय आहे. त्यावर ममीची तसबीर आणि कांहीं पुस्तकें आहेत.*

**राजेंद्र** : (प्रवेश करून) गुड् मॉर्निंग दिदी—

**दिदी** : गुड् मॉर्निंग राजू—

**राजेंद्र** : कसं वाटतंय् दिदी ?

**दिदी** : ठीक वाटतंय् !

**प्रताप** : (प्रवेश करून) गुड् मॉर्निंग दिदी—

**दिदी** : गुड् मॉर्निंग प्रताप !

**प्रताप** : नवी कविता लिहीत होतीस दिदी ?

**दिदी** : नाहीं रे ! उगीच आपलं कांहीं तरी—

**राजेंद्र** : आम्हीं डिस्टर्ब केलं दिदी तुला ?

**दिदी** : छे रे ! ब्रेकफास्ट झाला ?

**राजेंद्र** : नाहीं नाहीं, निघालों आहों तिकडेच.

**प्रताप** : कसली कविता लिहीत होतीस सांग ना दिदी ?

**दिदी** : अरे अजून झाली नाहीं पुरी—

**राजेंद्र** : केव्हां होईल ग पुरी ?

**दिदी** : काय सांगावं! असं सांगतां येतं काय रे वेड्या! झाली तर आतां होईल, नाहीं तर केव्हांच होणार नाहीं!

**राजेंद्र** : दिदी, मी सुद्धां कधीं तरी कविता लिहिणार आहें बरं का!

**प्रताप** : तूं? (हसतो.)

**राजेंद्र** : का ग, दिदी, मला लिहितां येणार नाहीं कविता ?

**प्रताप** : आली तर येईल, नाहीं तर केव्हांच येणार नाहीं!

**दिदी** : नाहीं रे राजू—सांगतां येत नाहीं—एखादवेळीं येईल तुलासुद्धां लिहितां—

**राजेंद्र** : मला देखील सुचत होती एक कल्पना—

**प्रताप** : ऐकवा तरी.

**राजेंद्र** : पण माझी मलाच भयंकर वाटली, म्हणून मी विसरायचा प्रयत्न करतोंय ती!

**दिदी** : ओ हो! अरे इतकी कसली भयंकर कल्पना सुचली तुला ?

**राजेंद्र** : सांगूं? मला एकदम असं वाटायला लागलं की आपला हा पॅलेस आहे ना, हें एक मोठ्ठं थडगं आहे, आणि त्यांत आपण राहतों. (दिदी त्याच्याकडे पाहून स्तब्ध होते.) का ग दिदी—गप्प झालीस ? वाईट आहे कल्पना ? पण मी कवि कुठें आहे ? मला आपली आली एक कल्पना, तूं सांग म्हणालीस म्हणून सांगितलं—मी नाहीं पुन्हा तुला सांगणार कल्पना—

**दिदी** : रागावूं नको बेटा! कल्पना वाईट नाहीं तुझी—आणि खोटीहि नाहीं!

**डॉक्टर** : (प्रवेश करून) गुड् मॉर्निंग दिदीराजे! येऊं का? कीं भावंडांचं कांहीं खास, गुप्त, प्रायव्हेट असं कांहीं चाललंय् ?

**दिदी** : डॉक्टरकाका, आमचं कांहींहि खास, गुप्त, प्रायव्हेट चाललेलं नाहीं. आणि जरी चाललं तरी प्रत्येक जण शेवटीं तुम्हांला तें खास, गुप्तपणें आणि प्रायव्हेटली सांगितल्याशिवाय का राहणार आहे ?

**डॉक्टर** : बरं ! हं काय—कसं वाटतंय दिदीराजे—

**दिदी** : काय वाटायचं डॉक्टर ? मागील पानावरून पुढें चालू ! गेल्या दहा वर्षांत जें रोज वाटत आलंय तेंच आज—

**डॉक्टर** : असं कसं ! हें नवीन टॉनिक चांगलं आहे !—दहाबारा दिवसांत पाहा खूप बरं वाटेल.

**दिदी** : नको नको, डॉक्टरकाका, नको—नाहीं पिववत मला तें औषध.

**डॉक्टर** : नको म्हणून कसं चालेल दिदीराजे ? अगदीं लेटेस्ट औषध आहे हें या रोगावर. गुण आलाच पाहिजे !

**दिदी** : गेल्या दहा वर्षांत अशीं किती तरी लेटेस्ट औषधं घेतलीं मीं—नव्या डॉक्टरबरोबर रोगाचं निदानहि बदलतं आणि औषधहि बदलतं—आणि शेवटीं जगायचं तरी कशासाठीं ?—एखाद्या ढकलगाडीसारखं आयुष्य रोज एका एका दिवसानं पुढें ढकलत जायचं—नाहीं डॉक्टरकाका, पुरे झाल्या आतां ह्या यातना.

**डॉक्टर** : असं काय बरं दिदी ? तुम्ही बऱ्या होणार आहांत—

**दिदी** : नाहीं डॉक्टर, कसली बरी होतें मी आतां ! दहा वर्षं रोज हेंच ऐकत आलें आहें मी. तुम्हीच काय, पण रोज सकाळीं त्या तिथें चिमण्या येतात ना ? त्या देखील सांगतात मला—दिदी, तूं बरी होणार आहेस. दिदी, तूं बरी होणार आहेस. पण केव्हां ?...का त्या बऱ्या होण्याचा अर्थ कांहीं निराळा आहे ?...निराळाच असेल...पक्ष्यांच्या इवल्याशा छातींत सूर मावेनासा होतो आणि तो उंच उंच जायचा प्रयत्न करतो. तो सूरच त्यांना उंच नेत असतो. तसं कीं नाहीं, माझ्या मनांत खूप कांहीं कांहीं येतं—तें मला उंच उंच नेत असतं...एक दिवस तें मला इतकं उंच नेईल कीं तिथून पुन्हा मी कधीं खालींच येणार नाहीं—

**डॉक्टर** : असं कांहीं अभद्र बोलूं नये दिदीराजे.

**दिदी** : हें अभद्र आहे डॉक्टर ? मरण अभद्र आहे म्हणून सांगितलं कुणीं तुम्हांला ?...गोविंद कवि असेच माझ्यासारखे पांगळे होते—

**डॉक्टर** : तुम्ही स्वतःला पांगळं कां म्हणतां दिदीराजे ?...अशक्तपणामुळं तुमच्या पायांतलं त्राण गेलं आहे...कशाचा तरी आधार घेऊन दोनचार

पावलं टाकूं शकतां तुम्ही. पांगळं म्हणत नाहींत कांहीं त्याला...

**दिदी :** पण तूतं तर पांगळी आहें ना...गोविंद कवि आयुष्यभर पांगळेच राहिले बिचारे! (त्यांनीं मृत्यूवर एक कविता लिहिली आहे...सुंदर मी होणार—मरणानं सुंदर होण्याची कल्पनाच केवढी भव्य, उदात्त आहे... सुंदर मी होणार...

> जुनीं इंद्रियें, जुना पिसारा, सर्व सर्व झडणार।
> नव्या तनूचे, नव्या शक्तिचे पंख मला फुटणार।
> सुंदर मी होणार, सुंदर मी होणार—
> मृत्यू म्हणजे वसंत माझा, मजवरती फुलणार।
> सौंदर्याचा ब्रह्मा तो मज सौंदर्यं घडणार॥
> सौंदर्यं घडणार—सौंदर्यं घडणार—

राजू, त्या कपाटांत गोविंदांचा संग्रह आहे...वरच्या कप्प्यांतलं चौथं किंवा पांचवं पुस्तक असेल.

**डॉक्टर :** राहूं दे दिदीराजे—मला काव्यांतलं कांहीं कळत नाहीं!

**दिदी :** असं म्हणूं नका डॉक्टरकाका. तुम्हांला माझ्याबद्दल अमाप सहानुभूति आहे—आणि ज्याच्या ज्याच्या म्हणून अंतःकरणांत सहानुभूतीचा लहानसा का होईना, पण झरा असतो ना, त्याला केव्हां ना केव्हां तरी काव्याचा साक्षात्कार झाल्याशिवाय राहत नाहीं.

**डॉक्टर :** मला आणि काव्याचा साक्षात्कार?—ओ गॉड्!—दिदीराजे, हें औषध घ्या बघूं—हिज हायनेसना कळलं तर मला प्यायला लावतील ते औषध!

**दिदी :** डॉक्टरकाका—मी एक विचारूं तुम्हांला?

**डॉक्टर :** विचारा.

**दिदी :** तुम्हीं कधीं प्रेम केलंय्?

**डॉक्टर :** नाउ नाउ नाउ नाउ...डोंट बी सिली...मी आणि प्रेम? आज सकाळींच हा काय प्रश्न सुचला तुम्हांला! (हसतात.)

**दिदी :** हं...लपवूं नका...

**डॉक्टर :** छान! म्हणजे आमची मस्करी करायचा बेबीराजांचा हक्क,

दिदी, आतां तुम्हींहि घेतलात वाटतं—मी ? आणि प्रेम ? नेव्हर—नेव्हर !

**दिदी** : मग लग्न कां केलं नाहीं तुम्हीं ?

**डॉक्टर** : लग्न करतं का कोणी ?—लग्न होतं ! काय प्रतापराजे ?

**प्रताप** : मला काय ठाऊक ?

**डॉक्टर** : वेल ! लग्न होतं !—जसा खोकला होतो, पित्त होतं, गालगुंड होतं—तसं लग्न होतं.

**प्रताप** : मग तुम्हांला फक्त खोकला—पित्त आणि गालगुंडच झालं वाटतं ?

**डॉक्टर** : हं—(त्यांच्या 'हं' मध्यें कुठें तरी खिन्नपणा दडला आहे.) हें पाहा...आतां आधीं हें औषध घेऊं या. माझं लग्न कांहीं आतां व्हायचं नाहीं—ती भीति मला नाहीं...

**दिदी** : आणि मलाहि नाहीं...(हसते.)

**डॉक्टर** : दिदी—आय् डोंट लाइक् दॅट्. पुन्हा असं बोल्लांत तर औषधाचा डोस वाढवून देईन. चला, घ्या औषध...कम ऑन्, बी ए गुड गर्ल.

**प्रताप** : डॉक्टरकाका—

**डॉक्टर** : यस्—प्रतापराजे !

**प्रताप** : कांहीं नाहीं—

**डॉक्टर** : तरी पण—

**प्रताप** : कांहीं नाहीं—

**डॉक्टर** : नाउ नाउ नाउ...मनांत असेल तें स्वच्छ बोलून टाकावं—मनांतले विचार दाबले कीं कॉम्प्लेक्सिस निर्माण होतात...त्यांनून मग न्यूरॉसिस... कुठें भ्रमिष्टपणा—कुठें काय, कुठें काय—काय वाटेल तें होईल—

**राजेंद्र** : नक्की ?

**डॉक्टर** : हू सेड दॅट ?—राजेंद्रजी ? आपण ?

**राजेंद्र** : यस् डॉक्टर.

**डॉक्टर** : कां ? शंका कां आली तुम्हांला ?

**राजेंद्र** : नाहीं—तुम्ही म्हणालांत कीं मनांतले विचार दाबून ठेवले कीं भ्रमिष्टपणा होतो—

**डॉक्टर** : होतो म्हणजे काय ?—झालाच पाहिजे.

**राजेंद्र** : नाहीं—शक्य नाहीं डॉक्टरकाका...

**डॉक्टर** : लुक हिअर—कितवं वर्ष चालू आहे तुम्हांला ?

**राजेंद्र** : बावीस.

**डॉक्टर** : अडीच-तीनपट मोठा आहें मी तुमच्यापेक्षां—तुम्ही जन्माला आलांत तें प्रथम मीं पाहिलंय्—हर हायनेसनीं, तुमच्या जन्मदात्या आईनं देखील नव्हे. तुम्हीच काय, दिदीराजे, प्रतापराजे आणि बेबीराजे कुठें गेल्या—त्या देखील ! एवढे एवढे एवढे एवढे डोळे किलकिले करून प्रथम ह्या जगांत तुम्हीं काय पाहिलंय ठाऊक आहे तुम्हांला ? डॉक्टर पटवर्धन. फिजिशियन टु हिज रॉयल हायनेस, विश्वासराव महाराज ऑफ नंदनवाडी, के. सी. आय. इ.

**दिदी** : हिज रॉयल हायनेस...हं...

**डॉक्टर** : काय झालं दिदीराजे ?

**दिदी** : डॉक्टरकाका, तुम्हांला किती वेळां सांगितलं कीं मला दिदीराजे म्हणूं नका...नुसतं दिदी म्हणा, नाहीं तर हेमा म्हणा...ममी मला हेमा म्हणायची...ममी गेल्यानंतर मला हेमा अशी कुणीं कुणीं देखील हाक मारली नाहीं. पपा देखील मला दिदीच म्हणतात...परवांच मी बेबीला म्हणालें होतें कीं मला कुणी तरी 'हेमा' अशी हाक मारली तर फार आवडेल मला. तुम्ही लहानपणीं मला हेमाच म्हणत होतां...

**डॉक्टर** : तशा लहान होऊन ज्या दिवशीं धावत याल ना माझ्यापुढें, त्या दिवशीं नक्की हेमा म्हणेन मी तुम्हांला.

**दिदी** : आतां लहान होणं आणि धावत येणं—दोन्ही शक्य नाहींत मला !

**डॉक्टर** : शक्य आहे दिदीराजे—

**दिदी** : पाहा, पुन्हा दिदीराजेच म्हणालांत !

**डॉक्टर** : वळण आहे जिभेला, जायचं नाहीं.

**प्रताप** : गेलं पाहिजे !

**डॉक्टर** : अरे झालंय काय तुम्हां लोकांना आज ?

**राजेंद्र** : डॉक्टरकाका, भावना दाबल्या तर भ्रमिष्ट होतो ना माणूस, मग

आम्ही कसे नाहीं झालों भ्रमिष्ट अजून ?

**डॉक्टर :** ऑं ?

**राजेंद्र :** होय डॉक्टरकाका, होय ! आम्ही कसे नाहीं झालों भ्रमिष्ट—अरे हें काय लाइफ आहे ?—दिदी, मला हेवा वाटतो तुझा !

**दिदी :** राजू—

**राजेंद्र :** होय दिदी, होय—तुझा आजार दिसतो, आमचा दिसत नाहीं. डॉक्टरकाका, तुमचं तें कसलं नवीन कडू औषध आहे ना, त्याचा एक मोठा बंपर भरून आणीत चला आणि रोज सगळ्यांना पाजत जा. मनानं पांगळे झालोंच आहोंत, शरीरानं आणखी व्हायला नको.

**डॉक्टर :** काय बरं हें ? पेशंटच्या भोंवतीं कसं आनंदी वातावरण हवं.

**प्रताप :** आनंद !—ह्या वाड्याचा आणि आनंदाचा काय संबंध ? इथें फक्त मुजरे, आदब, परंपरा नांवाची एक कुणींहि न पाहिलेली आणि कुणालाहि न कळलेली गोष्ट संभाळायची पराकाष्ठा !

**दिदी :** प्रताप, असं काय बरं ?—डॉक्टरकाका, द्या तें औषध.

**प्रताप :** नको, दिदी, पिऊं नको तें औषध. बरी होशील एखादे वेळीं... पूर्वीसारखं झपाझप चालतां यायला लागेल, आणि मग प्रश्न पडेल चालायचं कुठं ? ह्या वाड्यांतल्या पंधरा दालनांतून किती फेऱ्या घालूं शकणार तूं ? मूठभर संस्थान विलीन झालं आपलं, हा वाडा कां नाहीं त्याच झटक्यांत विलीन करून घेतला ?

**राजेंद्र :** खरंच कां नाहीं घेतला ? छान उघड्यावर पडलों असतों... मनमुराद भटकलों असतों—हातांत पडेल तें खाल्लं असतं...आपल्या कल्याणी नदीच्या पाण्यांत डुंबलों असतों......(बेबी आंत येतांना हें ऐकते.)

**बेबी :** काय काय काय म्हणालास राजूभय्या—कल्याणीच्या पाण्यांत काय !

**राजेंद्र :** कांहीं नाहीं.

**दिदी :** कुठें गेली होतीस बेबी ?

**बेबी :** राजू, कल्याणीच्या पाण्यांत डुंबण्याविषयीं बोलत होतास ना तूं ? घरीं बसा आणि करा मनोराज्यं...कल्याणी पाहिली आहेस का जाऊन ? काय प्रचंड पूर आलाय् दिदी—

**डॉक्टर :** तुम्हांला कसं कळलं बेबीराजे ?

**बेबी :** कसं कळलं? मीं पहाटे जाऊन माझ्या डोळ्यांनीं पाहिलं! काल रात्रभर पाऊस पडत होता ना—

**राजेंद्र :** तो देखील पाहायला मिळाला नाहीं मला...पपांना डायसीची इंग्लिश कॉन्स्टिट्यूशन वाचून दाखवायची लहर आली!—प्रतापदादा, मी आणि मेजर सुभानराव—तीन सक्तीचे श्रोते!

**बेबी :** दिदी, काय सांगू तुला—क्षितिजापर्यंत नुसतं पाणी...कुठून कुठून काय काय वाहून येत होतं.

**दिदी :** गांवांत नाहीं ना पाणी शिरलं?

**डॉक्टर :** छे छे—उंचावर आहे आपली नंदनवाडी.

**दिदी :** पण डॉक्टरकाका, तुम्ही बोललां नाहीं कुठें?

**डॉक्टर :** त्यांत काय बोलायचं—पुराचा आपल्याला धोका थोडाच आहे?

**बेबी :** धोका?

**डॉक्टर :** धोका नाहीं तर काय? तुम्हांला कल्पना नाहीं!—तीस वर्षांपूर्वी—म्हणजे महाराजांच्या राज्यारोहणाच्या वर्षी कल्याणीला पूर आला होता. ओ माय गॉड्!...समारंभ सहा महिने पुढें ढकलावा लागला. व्हाइसरॉयसाहेबांना दिल्लीला तारेनं कळवावं लागलं...द गवर्नर हॅड् ऑल्मोस्ट स्टार्टेड—

**बेबी :** डॉक्टरकाका—हां हां—

**डॉक्टर :** काय झालं?

**बेबी :** त्या व्हाइसरॉय-गवर्नरांच्या कोटाला धरून पुन्हा तुम्ही आमच्या त्या जुन्या संस्थानांत शिरणार—तिथून मग दरबार...मग तुम्ही लेडी विलिंग्डनला संस्कृत श्लोक शिकवल्याची गोष्ट सांगणार—तिला संस्कृत उच्चार करतांना धाप लागल्याची कथा सुरू करणार आणि राजवाड्यांत शिष्टाचारांची सक्ति असल्यामुळें आम्हांला सक्तीनं हसावं लागणार... आम्ही हसणार नाहीं...काय दिदी?—

**दिदी :** (हसत) बेबी?...डॉक्टरकाका, तुम्हींच ह्या बेबीला फार चढवून ठेवली आहे हं—

**डॉक्टर :** बेबी! दोन वर्षांची होईपर्यंत तोंडांत एक दांत नव्हता आणि

डोक्यावर एक केस नव्हता...नुसता गोळा होता गोळा...वाटलं नव्हतं एवढी वटवट करील...बरं का दिदीराजे, मम्मींच्या बरोबर स्वित्झर्लंडच्या हॉस्पिटल-मध्यें होतों ना आम्ही...

**बेबी** : ठाऊक आहे—तिथें एक फ्रेंच नर्स होती—माद्‌माझेल् फ्लाविया! मीं तिच्या डोळ्यांत बोट घातलं होतं...मग ती मोसिये मोसिये करीत धावत ओरडत तुमच्यापाशीं आली...आणि डॉक्टरकाका, आतां खरं सांगा हं—डॉक्टरकाका, तुम्हीं कशी समजूत काढलीत तिची?

**डॉक्टर** : बेबी! बेबी!...नाउ नाउ नाउ—

**बेबी** : आतां नाहीं नाउ नाउ नाउ...अगदीं खरं सांगा ना...आतां खरी गोष्ट ऐकण्याइतकीं मोठीं झालों आहों आम्ही—सांगा ना डॉक्टर...दिदी, डॉक्टरकाका लाजले बघ! डॉक्टरकाका, तुम्ही लाजलांत कीं छान दिसतां—

**डॉक्टर** : बेबीराजे, कशाला म्हाताऱ्याला छळतां उगाच!

**प्रताप** : बेबी, पूर बघायला कोणाबरोबर गेली होतीस?

**बेबी** : कोणाबरोबर?—सरळ उठलें नि चालायला लागलें.

**प्रताप** : देवडीवर पाहाऱ्याला नाहीं कुणी आज?

**बेबी** : कुणाला ठाऊक!

**राजेंद्र** : आणि पपा?

**बेबी** : पपा त्यांच्या स्टडीमध्यें होते...ते काल कुणी इतिहासकार आले आहेत ना, त्यांच्याशीं चर्चा करीत असतील...

**डॉक्टर** : यस्—प्रोफेसर सिद्धनाथशास्त्री वाठारकर...डु यू नो, नंदन-वाडीच्या राजघराण्याचा आणि वाकाटकांचा संबंध लागतो म्हणे—आपल्या योगेश्वराच्या देवळांतला शिलालेख पाहून ते सांगत होते—

**प्रताप** : मग त्या देवळांतच का नाहीं मुक्कामाला ठेवलं त्यांना? योगेश्वरा-बरोबर त्यांनाहि जलसमाधि मिळाली असती!

**डॉक्टर** : त्या बिचाऱ्यानं काय केलंय् प्रतापराजे?

**प्रताप** : मागं कोणी तरी आले होते ते म्हणत होते कीं आपला संबंध शूर्पारकांशीं लागतो म्हणून.

बेबी : काय मिळवणार आहेत पपा ह्या वाकाटकांशीं आणि शूर्पारकांशीं संबंध जोडून कोण जाणे—ज्यांच्याशीं जोडायचा त्यांच्याशीं जोडत नाहींत!

डॉक्टर : कुणाशीं संबंध जोडायचा त्यांनीं—

बेबी : आमच्याशीं! त्यांच्या मुलांशीं! (केस झटकीत बोलते) आमचा कांहीं संबंध नसल्यासारखे वागतात आणि शूर्पारकांशीं संबंध जोडतात—

दिदी : इकडे ये बेबी—(तिच्या केसांवरून हात फिरवीत...) केस ओले आहेत तुझे—

बेबी : असूं दे ग.

डॉक्टर : आणि सर्दी झाली म्हणजे?

बेबी : एकदांहि अजूनपर्यंत औषध घेतलेलं नाहीं मीं तुमचं!

दिदी : छत्री कां नाहीं नेलीस?

बेबी : आपल्या राजवाड्यांत छत्री कुठें आहे? पावसांत भिजायचा कधीं प्रसंग आलाय् आपल्यावर? पायांना चिखल लागलाय कधीं आपल्या?

प्रताप : खरं आहे! पपांचं छत्र आहे ना डोक्यावर! उन्हापावसाचं आपल्याला कसलं भय?

बेबी : पण दिदी...काय सांगूं तुला—तूं यायला पाहिजे होतंस. (दिदी एकदम खालीं पाहते.)

राजेंद्र : बेबी! (कांहीं क्षण स्तब्धता.)

बेबी : सॉरी—सॉरी हं दिदी...चुकून म्हटलं मीं. पण खरं सांगतें, काय प्रवाह पाण्याचा! मी अगदीं घाटावरचा तो उंच बुरूज आहे ना, तिथून पाहिला पूर. आठवतो तुला बुरूज?

दिदी : हो, आठवतो ना. कार्तिकांत कल्याणींत दीपदान होत असे, तेव्हां आपला शामियाना बुरजावरच असायचा. अजून होतं का हो डॉक्टरकाका कल्याणीला दीपदान?

डॉक्टर : मीं नाहीं बुवा पाहिलं—पण होत असेल. पूर्वीं हिज हायनेस जायचे तेव्हां जात होतों. छान दिसायचं हं—हजारों पणत्या अमावास्येच्या रात्रीं नदींतून वाहत वाहत जायच्या...

**दिदी :** हो—हजारों पणत्या नदींतून वाहत वाहत जायच्या. अमावास्येची रात्र असायची, आकाशांत लक्षावधि नक्षत्रं लुकलुकत असायचीं—आणि कल्याणींत पणत्या,...मला आठवतंय...ममी मला धरून बुरजाच्या कांठापर्यंत न्यायची. सुवासिनी ममीला ओवाळायच्या, ममी त्यांची खणा-नारळांनीं ओटी भरत असे. तबकांत पणत्या ठेवून शेंकडों बायका घाटावरून उतरतांना वाटायचं, कीं अधांतरीं नुसत्या पणत्याच चालल्या आहेत! ममीच्या नाकांतली हिऱ्याची नथ तबकांतल्या निरांजनाच्या प्रकाशात आकाशांतल्या नक्षत्रासारखी चमकायची, प्रहररात्र झाली कीं मला झोप यायची...झोप येऊं नये म्हणून खूप प्रयत्न करीत असें मी...मग दोन दोन, तीन तीन दिवस झोपेंत पणत्या यायच्या—प्रवाहांतल्या पणत्या...मी ममीला विचारीत असें, 'कुठं गेल्या असतील ग त्या पणत्या?' ममी म्हणायची, 'आपल्या घरीं.' मला वाटायचं, दूर क्षितिजाला जाऊन कल्याणी नदी मिळते ना, तिथपर्यंत त्या पणत्या जात असतील. मग तिथं आकाशाचं दार असेल—तिथून मग त्या पणत्या आकाशांत जाऊन पोहोंचत असतील आणि नक्षत्रं होऊन लुकलुकत पुन्हा बाकीच्या पणत्यांकडे पाहात असतील!

**बेबी :** दिदी, किती छान बोलतेस ग दिदी! किती छान कल्पना येतात तुला!—तूं पूर पाहिला असतास ना दिदी, तर तूं महाकाव्य लिहिलं असतंस...

**दिदी :** मी आणि महाकाव्य? अग असामान्य प्रतिभा लागते त्याला. महाकाव्य लिहायला गरुडानं समुद्र पाहावा तसं जीवन दिसावं लागतं.

**बेबी :** दिदी—(टेबलावरचं एक पुस्तक उचलीत) मग हे संजय लिहूं शकतील का ग महाकाव्य?

**दिदी :** मला काय ठाऊक?—तूंच पत्र पाठवून विचार त्यांना.

**बेबी :** तूं कां नाहीं पाठवत पत्र?

**दिदी :** मी? छे ग...

**बेबी :** पाठव ना दिदी त्यांना पत्र. तुला त्यांच्या कविता इतक्या आवडतात.

**डॉक्टर :** हा संजय कोण दिदीराजे?

**दिदी :** कवि आहे!

**डॉक्टर** : अस्सं ! काय करतो हा ?

**बेबी** : काय करतो म्हणजे ? कविता !

**डॉक्टर** : तें ठीक आहे...पण जगण्याचा उद्योग असेल ना कांहीं...

**दिदी** : हा पाहा...(पुस्तक उघडून डॉक्टरांना देते.)

**डॉक्टर** : (पुस्तकांतून कविता मनांतल्या मनांत वाचीत) सुंदर—सुंदर !

**बेबी** : डॉक्टरकाका, जरा इकडे पाहा—

**डॉक्टर** : कां ?

**बेबी** : स्टेथास्कोप पाहूं दे जरा.

**डॉक्टर** : तुम्हांला काय करायचा स्टेथास्कोप ?

**बेबी** : द्या, द्या. (स्टेथास्कोप घेते.)

**प्रताप** : काय चावटपणा हा बेबी ?

**बेबी** : प्लीज—मला डॉक्टरांचं हार्ट तपासायचंय !

**प्रताप** : कां ?

**बेबी** : अरे, कवितेच्या ओळींना सुंदर म्हणाले, हें काय प्रकृति ठीक असल्याचं लक्षण आहे ?

**डॉक्टर** : म्हणजे आमच्याबद्दल काय कल्पना आहे तुमची बेबीराजे ?

**बेबी** : सगळं कांहीं—खरं सांगायचं तें सांगत नाहीं तुम्ही. आम्हीं कल्पना काय करायची ? अहो, तुम्हीं पूर पाहिला असतात तर सुंदर सुंदर सुंदर म्हणून नाचलां असतां—खरं सांगतें दिदी, निसर्गाचं केवढं रौद्र दर्शन. वाटलं कीं मारावी उडी त्या प्रवाहांत—आणि ओंडक्यांसारखं जावं वाहत—लागलें कांठाला तर लागलें, नाहीं तर अनेक ओंडक्यांतला हा एक ओंडका.

**डॉक्टर** : बेबीराजे, दॅट्स् टू मच.

**प्रताप** : नाहीं डॉक्टरकाका, बरोबर आहे बेबीचं—अशाच कुठल्या तरी प्रवाहांत उडी टाकायचे दिवसांतून पन्नासदां विचार येतात आम्हांला...

**डॉक्टर** : हें काय बरं प्रतापराजे...अहो, इतका सुंदर राजवाडा आहे—प्रिन्स ऑफ वेल्स देखील पाहायला आले होते !

**प्रताप** : आणि अजूनहि लोक येतात कीं—मग पपा आम्हांला कोंडतात एका दालनांत—

**बेबी** : हो, आम्हांला बसावं लागतं त्या दालनांत कोंडून घेऊन आणि पॅलेस पाहायला आलेल्या लोकांचे आवाज तेवढे ऐकूं येतात. 'काय मस्त आहे नाहीं?'—मग आम्ही ओळखतों ही पुण्याची मंडळी! कुणाचा तरी आवाज येतो—(नाकांत बोलते) 'हाय्—इजन्ट इट् वंडरफुल्'—मग मी हळूच दिदीला सांगतें, 'मेड इन् यू. एस. ए.'...कधीं कधीं गंभीर आवाजांत कुणी तरी म्हणत असतो, 'यहाँ का आर्किटेक्चर् फतेहपूर सिक्रीसे कुछ मिलता जुलता है!'—कीं ओळखायचं पाहुणा दिल्लीवाला आहे. मधूनच एखादा उद्गार येतो, 'अय्या! पूतळे किती छाऽऽन आहेत नाय्?' कीं ओळखावं ट्रिप 'मुंबई'ची आहे. 'बट यू मस्ट सी महाबळिपुरम् आर्किटेक्चर्र्. व्हॉऽऽट वंडरफुल स्टॅट्च्यूज्!'—बस्स! लगेच कळतं कीं ह्यांच्या थर्मास्मध्यें कॉफी असेल आणि पिशवींत इडली...खरंच कधीं कधीं मला वाटतं कीं आठ-आठ आणे तिकीट लावावं आणि आपल्याला बसवावं ओळीनं—मग डॉक्टरकाका सांगतील, हे पाहा, शूर्पारकांच्या घराण्यांतले हे चालतेबोलते पुतळे पाहा.

**दिदी** : त्यांतला एक पुतळा नुसताच बोलता आहे हं, चालता नाहीं कांहीं!

**प्रताप** : असं ग काय दिदी!

**दिदी** : अरे, त्यांत काय झालं? गमतीनं म्हणालें मीं.

**प्रताप** : ही कसली गंमत?

**दिदी** : अरे चालायचं त्राण नाहींसं झालं म्हणजे सर्वच का गेलं माझं?

**बेबी** : डॉक्टर, दिदी केव्हां चालायला लागणार हो?

**डॉक्टर** : लागेल. लवकर चालायला लागेल. अहो, इच्छाशक्तीच्या बळावर पांगळीं माणसं चालूं लागतात—मुक्यांना वाचा फुटते...मूकं करोति वाचालं—पंगुं लंघयते गिरिम—यत्कृपा तमहम् वन्दे परमानंदमाधवम—त्याची कृपा पाहिजे—नव्हे, त्याच्यावर श्रद्धा हवी.

**प्रताप** : कशावर तरी श्रद्धा हवी डॉक्टर! आम्हीं कशावर ठेवायची? दिदीनं कशावर ठेवायची?

**दिदी** : असं नाहीं हं प्रताप, माझी खूप श्रद्धा आहे.

**बेबी :** दिदी, पण नुसती श्रद्धा तरी काय कामाची ग? आतांच मी पाहून आलें तो पूर. तो श्रद्धेनें थोडाच पाहतां येतो!

**दिदी :** तुला काय वाटतं, मीं पूर पाहिला नाहीं? अग पाहिला मीं पूर—

**राजेंद्र :** दिदी—

**दिदी :** होय राजू—पाहिला मीं. सगळं दिसतं. तुला ठाऊक आहे, ह्या खिडकीच्या उजव्या बाजूस आंब्याचं झाड आहे—बिछान्यावर पडल्या पडल्या तें झाड दिसतं मला...गेल्या वर्षी वर्षभर अंथरुणालाच खिळून होतें ना मी—सगळ्या ऋतूंनीं त्या झाडावरुन दर्शन दिलं मला. आणि त्याच्या पलीकडून लांबीची ती गुल्मोहरांची रांग दिसते. गेल्या मे महिन्यांत काय फुललीं होतीं तीं झाडं—आठवतं तुला?

**राजेंद्र :** मला नाहीं आठवत.

**दिदी :** तुम्ही पाहतच नाहीं रे! फार सुंदर—आणि काल्चा पूर... अहाहा! योगेश्वरांनीं समाधि लावली होती ना?—मला ठाऊक होतं तें... रात्रभर सागरानं अभिषेक धरला होता! ग्रीष्माच्या दाहानं तप्त झालेल्या योगेश्वराला प्रसन्न करुन घ्यायचं होतं ना त्याला? देवांच्या दाराशीं विजलींच्या धडका देत होता सागर! पण वेडा सागर...त्याला ठाऊक नव्हतं कीं कैलासाला कंटाळलेले कैलासनाथ उजाड नदीच्या रेताड वाळवंटांत योगसमाधींत दंग होते...हिमालयाच्या माथ्यावरुन, मेघांच्या विमानांतून, हिंडून हिंडून थकला सागर! पण गौरीहर तिथं नव्हता. अग, भणंग नटेश्वर तो. वाड्यांत राहायला तो राजघराण्यांत थोडाच जन्माला आला होता? तो कल्याणीच्या उघड्या वाळवंटांत रमलेला...वरुन दिसला सागराला आणि हजार हातांनीं भेटला तो त्याला! भावगंगेला पूर आला बेबी. प्रेमाच्या पुरांत, असंच बुडावं लागतं—असंच बुडावं लागतं...तरच असले हे भणंग भैरवनाथ प्रसन्न व्हायचे! योगेश्वरोला बुडवून टाकल—कसली कसली पर्वा नाहीं केली...वाहत्या नदींत वाहून जायच्या योग्यतेचं होतं तें सारं वाहून गेलं...खरंच बेबी...आणि आपल्या कल्याणीच्या संध्याघाटाच्या अलीकडे तो प्रचंड वड आहे...पाखरं घरटीं बांधून राहतात...तिथलीं घरटीं नसतील वाहून गेलीं...नाहीं जायचीं. वडाची माया मोठी असते बेबी...तूं पाहिलीं

आहेस का घरटीं तीं ?

**बेबी :** दिदी—

**दिदी :** तीं घरटीं—त्यांत पांखरं कशीं बिलगून बिलगून बसलीं होतीं...पण राजू, एका रात्रीचा कोंडवाडा बरं का हा ? फक्त एका रात्रीचा. आज सकाळीं उघाडी पडली ना, माझ्या खिडकीशीं आलीं होतीं पुराच्या गोष्टी सांगायला ! इतक्या गोष्टी सांगायच्या होत्या त्या पांखरांना, कीं एकमेकांना बोलंच देईनात. शाळा सुटली कीं सगळीं मुलं एकदम बोलायला लागतात ना, तशीं...आपण एकदां एका शाळेच्या समारंभाला गेलों होतों नाहीं ?—खूप, तेरा-चौदा वर्षं झालीं त्याला.

**बेबी :** आपल्याला कां नाहीं ग कधीं शाळेंत घातलं ?

**प्रताप :** वा ! आपण राजकुमार—आपण शाळेंत जायचं ? विलायतेहून इथें मास्तर आले होते आपल्या घरीं—परीक्षेपुरते शाळेंत गेलों आपण, तर तिथें देखील स्वतंत्र खोल्या.

**डॉक्टर :** पुन्हा त्याच विषयावर आलांत तुम्ही. दिदी, पण तुम्ही हें पुराचं वर्णन केलंत कसं ?

**दिदी :** डॉक्टरकाका, खरंच मीं पूर पाहिला. नदीच्या, नाल्याच्या, ओढ्याच्या आणि समुद्राच्या देखील वेदना कळत नाहींत का आपल्याला ?

**डॉक्टर :** आठवतं मला. हर हायनेसचं शेवटलं ऑपरेशन बॉम्बेला झालं तेव्हां मीच घेऊन गेलों होतों तुम्हांला समुद्रावर...

**दिदी :** हो ! मीं खूप शिंपले गोळा करून आणले होते ममीला द्यायला. पण—परत आलों तेव्हां—कॉटवर ममी नव्हती !

**डॉक्टर :** कोण काय करणार त्याला ? असाध्य रोग होता तो.

**बेबी :** पण डॉक्टर, श्रद्धा असती ममीची तर जगली असती ना ममी ?

**प्रताप :** पण कशावर ठेवणार श्रद्धा ?

**दिदी :** नाहीं हं—खूप गोष्टींवर श्रद्धा होती तिची. हे लँडस्केप्स काढले असते का तिनं नाहीं तर ? ममीचा आवाजही खूप गोड होता...पपा नसले कीं ममी गाणं म्हणायची. आठवतं तुला प्रताप ?

**प्रताप :** हो.

**दिदी** : बेबी, तुला आठवत नसेल—

**बेबी** : नाहीं. मला—लहानपणीं त्या मिसेस जॅक्सन होत्या आपल्याला—त्यांच्याबरोबर आपण गाणीं म्हणून नाचत होतों—

**दिदी** : हो, नाचत होतों. (सर्व भांवंडं चमकून एकमेकांकडे पाहतात.) राजू म्हण ना...कम् ऑन् नाउ...डॉक्टर...यू मस्ट जॉइन् अस्—हं... मी नुसती कंडक्टर होतें हं...यस्, रेडी—वन्, टू—

(एक हल्कंफुल्कं इंग्रजी गाणं म्हणतात. गाणं ऐन रंगांत आलं आहे... आणि दारांत 'हिज हायनेस' येतात. त्यांच्या मागें शरीररक्षकाच्या वेषांत मेजर सुभानराव. राजेसाहेब आल्याचें कोणालाहि भान नाहीं. मेजर सुभान-राव थोडेसे आदब सांभाळून डोलतात. महाराज नुसते एकदां त्यांच्याकडे पाहतात, ते चपापतात. महाराज त्यांना नुसत्या मानेनें 'जा' असा इशारा करतात. नाच व गाणें संपतें.)

**महाराज** : डॉक्टर ! (सर्वजण दचकून थांबतात. डॉक्टर चटकन् वाकून मुजरा करतात.)

**डॉक्टर** : युवर हायनेस् !—(महाराजांच्या डोळ्यांत राग फुललेला स्पष्ट दिसतो. कांहीं तरी बोलायचें म्हणून डॉक्टर म्हणतात—) दिदीराजांचा मूड जरा—

**महाराज** : दिदीराजांच्या मूडबद्दल आम्ही दिदीराजांना विचारूं शकतों ! ह्या सगळ्या नाचरंगाचं कारण ?

**बेबी** : पण पपा—

**महाराज** : मी प्रतापराजांना विचारतोंय्—हं ?

**प्रताप** : कांहीं नाहीं.

**महाराज** : समाधान नाहीं झालं आमचं. दिदी...

**दिदी** : पपा, नाचरंग कसला ! कुठलं तरी लहानपणीं मिसेस जॅक्सननीं शिकवलेलं गाणं आठवलं.

**महाराज** : हें गाणं मिसेस जॅक्सननीं शिकवलं होतं ?

**दिदी** : होय पपा—

**महाराज** : कां?

**राजेंद्र** : कां? ('कां' म्हणजे काय अशा अर्थानं)

**महाराज** : (अत्यंत थंडपणानं)—कां? (ह्याला कुणाजवळहि उत्तर नाहीं. बेबी उगीचच खाकरत.) खाकरलं कोण?

**बेबी** : मी!

**महाराज** : कां!

**बेबी** : ज़रा सर्दी झाल्यासारखं वाटलं—

**महाराज** : डॉक्टर, तपासलं होतं सगळ्यांना आज सकाळीं?

**डॉक्टर** : आज सकाळीं—

**महाराज** : माझ्या प्रश्नाचं उत्तर हो किंवा नाहीं ह्या दोन अक्षरांत मिळूं शकतं!

**डॉक्टर** : नाहीं, युवर हायनेस्—

**महाराज** : कां?—हल्लीं रोजची फेरी नसते तुमची?

**डॉक्टर** : असते, युवर हायनेस्.

**महाराज** : कशाला?—गाणीं म्हणायला? तिचा घसा पाहा—आणि कांहीं इन्फ्लमेशन् वगैरे असलं तर पेनिसिलिन द्या.

**बेबी** : पण तसं कांहीं नाहीं आहे पपा.

**महाराज** : इथें डॉक्टर कोण आहे?—तुम्ही कीं डॉक्टर पटवर्धन?

**डॉक्टर** : तसं कांहीं विशेष नसावं युवर हायनेस्—

**महाराज** : इतक्या दुरून घसा तपासतां येतो?

**दिदी** : पपा—

**महाराज** : कसं वाटतंय दिदी आज?

**दिदी** : बरं वाटतंय् पपा—

**महाराज** : नवीन मेडिसिन् दिलंत डॉक्टर?

**डॉक्टर** : नाहीं. तेंच द्यायला आलों होतों—

**महाराज** : मग थांबलांत कां ?—गाण्यासाठीं ?

**प्रताप** : (कुरबुरीच्या स्वरांत) पण गाणं म्हणजे काय—प्रचंड—अपराध झाला ?

**महाराज** : मीं म्हटलं नसतं. गाणं ऐकायचीच इच्छा असली तर दरबारगवई अजून आहेत...

**बेबी** : तें कसलं गाणं ?—यँ यँ यँ यँ (वेडंवाकडं गाऊन दाखवते.)

**महाराज** : ध्रुपदिये आहेत ते ! ग्वाल्हेरचं अस्सल गाणं ऐकायला लोक ग्वाल्हेरहून इथं येतात.

**राजेंद्र** : बाहेरच्या लोकांनीं पाहण्यासारखं खूप आहे इथं—

**महाराज** : उपरोध मलाहि समजतो. काय म्हणायचंय् तुम्हांला ?

**राजेंद्र** : पपा, पण आम्ही काय आयुष्यभर नुसतं पाळलेल्या 'जनावरां-सारखं राहायचं ?

**महाराज** : काय करायचंय् तुम्हांला ?

**राजेंद्र** : पण आम्हीं कांहींच करायचं नाहीं का ?

**महाराज** : प्रश्न विचारीत असतों आम्ही. उत्तराची अपेक्षा आहे—प्रश्नाची नाहीं.

**राजेंद्र** : मला ह्या वाड्याबाहेर जायचं आहे.

**महाराज** : जा.

**राजेंद्र** : कुठं जाऊं ?

**महाराज** : पुन्हा प्रश्न विचारलात. प्रश्नांचीं उत्तरं देण्याचं दुय्यम काम केलं नाहीं आम्हीं.

**बेबी** : मग संस्थान विलीन करतांना विलीन करतां कीं नाहीं, हा प्रश्नच विचारला होता ना तुम्हांला ?

**महाराज** : त्याचं उत्तर दिलं नाहीं आम्हीं. त्यांनीं संस्थान विलीन केलं, आम्हीं एका अक्षरानं—

**बेबी** : कां केलंत असा प्रश्न विचारला नाहीं. (एक विचित्र स्तब्धता.)

**दिदी** : बेबी, से सॉरी !

**बेबी** : आय् ॲम् सॉरी पपा—पण पपा—

**महाराज** : अजून माझं राजेंद्रांशीं बोलणं संपलं नाहीं—कुठं जाणार आहांत ?

**राजेंद्र** : ह्या पिंजऱ्याबाहेर कुठेंहि !

**महाराज** : ह्या वाड्याला पिंजरा म्हणून वास्तुदेवतेचा अपमान करतां आहांत तुम्ही.

**राजेंद्र** : वास्तुदेवता! देवता मंदिरांत राहतात पपा, थडग्यांत राहात नाहींत !

**महाराज** : तुम्ही जाऊं शकतां—असेच. अंगावरच्या कपड्यांनिशीं—या-पलीकडे कांहींहि नेतां येणार नाहीं तुम्हांला—

**डॉक्टर** : पण युवर हायनेस्—

**महाराज** : दिदीच्या औषधाचा ग्लास भरलात ?

**दिदी** : पण माझ्याच्यानं पिववत नाहीं हो तें औषध—

**महाराज** : आज काय अवशेचा दिवस आहे ?—(राजेंद्राला) तुमचा निर्णय ह्या मिनिटाअखेर झाला पाहिजे—

**दिदी** : (तिला आतां हें असह्य झालं आहे. ती खुर्चीतून उठण्याचा प्रयत्न करते.) पपा—(एकदम खालीं कोसळते.)

**महाराज** : दिदी...(बेबी तिला उचलून पुन्हा खुर्चीवर बसवते.)

**दिदी** : पपा—पाय धरतें मी तुमचे—कंटाळलीं आहेत हो सारींजणं—कंटाळलीं आहेत !

**महाराज** : काय झालं कंटाळायला ?—गेल्या वर्षीं तर मसूरीला जाऊन आलों !

**बेबी** : हो ! पण तिथंहि तुम्ही होतांच बरोबर—

**महाराज** : काय ?

**बेबी** : आय् ॲम् व्हेरी सॉरी पपा—

**महाराज** : वास्तविक कंटाळा आला ही तक्रार मीं दिदीकडून ऐकली असती. गेल्या कित्येक वर्षांत ह्या दालनाबाहेर गेल्या नाहींत त्या—तुमच्या-साठीं इथं सगळ्या सुखसोयी आणून ठेवल्या. आहेत—बिलिअर्ड टेबल

आहे—बॅड्मिंटन कोर्ट आहे—सिनेमाचं थिएटर आहे—स्विमिंग पूल आहे—फॉरेनर्सना देखील आपली लायब्ररी पाहून आश्चर्य वाटतं...आणखी काय हवंय तुम्हांला?

**बेबी :** मोकळी हवा—पपा, मोकळी हवा!

**महाराज :** बेबीराजे, आज फार बोल्तांय तुम्ही—यू हॅव ऑल्वेज् बीन रूड—पण आज विशेष...कोण भेटलं तुम्हांला हें असं वागायला शिकवणारं?

**बेबी :** पूर!

**महाराज :** कोण?

**बेबी :** पूर!

**महाराज :** पूर?—ठिकाणावर आहे का डोकं?

**बेबी :** नाहीं.

**महाराज :** डॉक्टर!

**डॉक्टर :** यस् युवर हायनेस्.

**महाराज :** डॉक्टर, आपण जाऊं शकतां.

**डॉक्टर :** यस् युवर हायनेस्. दिदीराजे, औषध वेतां ना!

**महाराज :** आम्ही देऊं.

**डॉक्टर :** बरं आहे. (मुजरा करून जातात.)

**महाराज :** (एकदम कडाडून) बेबी, काय म्हणायचंय् तुला?

**दिदी :** पपा, जाऊं दे ना तें. ते नवे इतिहाससंशोधक आले आहेत ते काय म्हणत होते?

**महाराज :** तो तुझा प्रांत नाहीं दिदी. पण प्रताप, राजेंद्र, बेबी—कसला कट आहे?

**दिदी :** कट कसला पपा? पांगळ्यासारखं वाड्यांत राहायचा कंटाळा आला आहे पपा—

**महाराज :** राजेंद्र, वाडा सोडून जायचं आहे?

**राजेंद्र :** आय् ॲम् सॉरी पपा—पण पपा—

**महाराज :** इनफ! (घड्याळांत पाहतात.) ब्रेकफास्ट तयार असेल. यू कॅन

गो—दिदी, तुझा ब्रेकफास्ट झाला ?

**दिदी** : इच्छा नव्हती मला. पण पपा, तुम्ही जात नाहीं ब्रेकफास्टला ?

**महाराज** : नको.—तुम्ही इथं का अजून उभे ? आणि टेबलावर माझी डाक येईल सकाळची. ती पाठवून द्या इथं. (राजेंद्र, प्रताप आणि बेबी जातात.) दिदी—

**दिदी** : काय पपा ?

**महाराज** : कसं वाटतंय बेटा ?

**दिदी** : काय वाटायचंय् पपा ?—खूप बरं वाटल्यासारखं वाटतं, पुन्हा एकाएकीं भयंकर अशक्तपणा वाटतो.

**महाराज** : औषध घेणार ना बाळ ?

**दिदी** : नको पपा. घसा भाजत जातं तें औषध. आणि मग इतक्या भयंकर कळा येतात—नाहीं सहन होत मला तें पपा !

**महाराज** : पण घ्यायला पाहिजे बाळ तें. बेटा कधींतरी कधींतरी तुला पुन्हा पहिल्यासारखं चालतांना पाह्यला हवं मला—लहानपणीं नॅनीचा हात चुकवून तूं धावत सुटायचीस...ओ मॉय् गॉड—

**दिदी** : पपा, माझ्यासारख्या पांगळीवर एवढी माया करतां—मग बेबी, प्रताप, राजू यांच्याशीं कां हो असं रागावून वागतां पपा ?

**महाराज** : दिदी, औषध घ्यायला पाहिजे—

**दिदी** : पपा, सांगा ना. मी नेहमीं त्यांना सांगतें—पपा चांगले आहेत, चांगले आहेत. पण पटावं कसं त्यांना पपा ?

**महाराज** : पटायला नको आहे !

**दिदी** : कां पपा ?

**महाराज** : मला प्रश्न आवडत नाहींत दिदी !

**दिदी** : मीं विचारले तरी ?

**महाराज** : दिदी, तुला यातना नाहीं कळायच्या.

**दिदी** : पपा—यातनांची माझ्याइतकी ओळख कुणाला तरी असेल का ? वयाच्या सोळाव्या वर्षापासून आजपर्यंत फक्त यातना—यातना—

**महाराज** : तारुण्यांत यातना सहन करण्याची शक्ती असते दिदी— म्हातारपणांत मन घट्ट झालेलं असतं—त्याला नाहीं वळवतां येत.

**दिदी** : कसल्या यातना पपा?

**महाराज** : अनेक—

**दिदी** : पण पपा—मी नाहीं का कमी करूं शकणार त्या यातना? राजू, प्रताप, बेबी नाहीं का कमी करूं शकणार?

**महाराज** : कोणी कुणाच्या यातना कमी करूं शकत नाहीं. कुठें होतों आम्ही आणि काय करून ठेवलंय् आमचं—लोकशाही म्हणे!

**दिदी** : लोकशाहीचा काय संबंध आहे तुमच्या यातनांशीं पपा—

**महाराज** : सांगितलं ना तुला दिदी, अनेक गोष्टींचा आहे. परवांचीच गोष्ट घे. आपल्या नंदनवाडींतून असेंब्लींत कोण निवडून आलाय् ठाऊक आहे तुला? बंडा सावंत!—हा नंदनवाडीचा प्रतिनिधी! हा बंडा सावंत!

**दिदी** : बंडा!—बंडा म्हणजे आपल्याकडे शिदबा सावंत होता त्याचा मुलगा?

**महाराज** : त्याचा मुलगा! शिदबा मोतद्दाराचा मुलगा—हा नंदनवाडीचा प्रतिनिधि!

**दिदी** : हुषार होता लहानपणापासून—

**महाराज** : म्हणून हा राज्यकर्ता?—नंदनवाडीचा प्रतिनिधि? काय वाईट केलं होतं आम्हीं नंदनवाडीचं? मुलांना फुकट शिक्षण होतं, अन्नछत्रं होतीं, पाठशाळा होत्या, शिल्पशाळा होत्या—आमच्या आश्रयावर शिकून नंदन-वाडीच्या मुलांनीं चार ठिकाणीं नांव मिळवलं होतं. गांवांत तालमी होत्या, आखाडे होते,—काय नव्हतं?

**दिदी** : स्वातंत्र्य नव्हतं पपा—

**महाराज** : स्वातंत्र्य? कशासाठीं हवं असतं स्वातंत्र्य? सगळ्या सुखसोयी मिळाव्या म्हणूनच ना?

**दिदी** : म्हणून नाहीं पपा—स्वातंत्र्य—केवळ स्वातंत्र्यासाठीं हवं असतं.

**महाराज** : उगीच कवींच्या भाषेंत बोलूं नकोस.

**दिदी** : पण पपा, लोकांना जें हवं तें मिळालं. त्यांना राज्य करावंसं वाटतं ना, करूं द्यावं त्यांना तें !

**महाराज** : आणि खड्डयांत पडूं द्यावं—काय चाललंय् हें ? लोकशाहीच आहे ना जगभर आतां ? मग कशाला हीं युद्धं आणि लढाया ? कशाला इतके पक्ष, उपपक्ष, निवडणुका, मारामाऱ्या, दंगेधोपे ?

**दिदी** : असा महापूर येतो पपा नेहमींच. गंगेला पूर येतो ना, तसा लोक-गंगेलाहि येतो—त्यांत ताठर युद्धखोर उन्मळून जातील. आणि गरीब, दीन, लव्हाळ्यासारखे वाटणारे शांतताप्रिय लोक हळूहळू वर येतील—आणि तांडवानंतर शांत झालेल्या प्रलयंकर शिवशंकराला म्हणतील, शंभुनाथ, आतां तुमचं शांत नटेश्वराचं स्वरूप दाखवा. मग मूर्तिकार मूर्ति घडवतील, गायक गातील, कवि काव्य लिहितील—

**महाराज** : काव्य ! हं ! फावल्या वेळांत करमणूक म्हणून ठीक आहेत ह्या कविता !

**दिदी** : पपा ! (सात्त्विक त्वेषानें) कुणीं सांगितलं तुम्हांला हें ? कविता ही फावल्या वेळांतली करमणूक ? जी दृष्टि आल्यामुळें पांगळ्याला देखील विराट विश्वाचं दर्शन बसल्या ठिकाणीं होतं, ती कविता म्हणजे फावल्या वेळांतली करमणूक ?

**महाराज** : डोंट गेट एक्सायूटेड माय् चाइल्ड !—पण ज्या रस्त्यांतून आम्ही आणि आमचे पूर्वज हत्तीवरून मिरवीत गेलों, तिथून बंडा सावंताची —एका मोतद्दाराच्या मुलाची मिरवणूक जावी ?

**दिदी** : महान् भाग्याचा आहे बंडा ! हत्तींच्या मिरवणुकी भाडोत्री सरंजाम मिरवीत जायचे पपा...बंडाला लोक डोक्यावर घेऊन नाचले असतील. सुवासिनींनीं त्याला ओवाळलं असेल. शाहिरांनीं त्याचे पोवाडे गायले असतील. त्याच्या आईनं—शिदबा मोतद्दाराच्या सावित्रीनं बंडाला मीठ-मोहऱ्या ओवाळल्या असतील. योगेश्वराच्या पुजाऱ्यांनीं नारळ देऊन आशीर्वाद दिला असेल...

**महाराज** : तुला कुणीं सांगितलं हें दिदी ? अगदीं शब्दन् शब्द खरा आहे यांतला.

**दिदी** : मला दिसलं सगळं—

**महाराज** : तूं कधीं गेली होतीस वाड्याबाहेर ?

**दिदी** : वाड्याबाहेर कशाला जायला हवं ? स्वतंत्र नंदनवाडीचा पहिला प्रतिनिधि, त्याचं कौतुक होणार नाहीं तर काय गांवाबाहेर महारोग्यासारख्या राहिलेल्या महाराजांचं आणि राजपुत्र-राजकन्यांचं ?

**महाराज** : दिदी ! (भयंकर थकल्यासारखे बसतात.)

**दिदी** : पपा, आय् ॲम् सॉरी पपा—मी नाहीं हो हें बोलत. हें कीं नाहीं बोललं जातं—कोण बोलतं कोण जाणे...लहानपणीं आपल्या बागेंतलीं झाडं, फुलं, पानं माझ्याशीं बोलायचीं—सकाळीं पांखरं बोलतात...चांदण्या रात्रीं झरोक्यांतून चंद्रकिरण येतात ते बोलतात !

(बेबी डाक घेऊन येते.)

**बेबी** : पपा, ही डाक.

**महाराज** : तूं कां आणलीस ?

**बेबी** : कारभारी आजारी आहेत.

**दिदी** : बेबी, डॉक्टरना जायला सांग त्यांच्या घरीं.

**महाराज** : नको ! सार्वजनिक दवाखान्यांत जाऊं दे त्यांना. लोकाश्रयावर जगायची संवय लागूं दे सगळ्यांना.

**बेबी** : (हातांतलं एक पत्र चटकन एका पुस्तकांत घालून) दिदी, हें पुस्तक घेऊं वाचायला ?

**दिदी** : कोणतं ?

**बेबी** : हें—'तांडव !'

**महाराज** : काय ?

**बेबी** : 'तांडव'—कवितासंग्रह आहे.

**महाराज** : बघूं.

**बेबी** : कविता आहेत त्या पपा—ह्या पुस्तकांत तुम्हांला इंटरेस्ट नाहीं वाटणार !

**दिदी :** असं काय म्हणतेस बेबी ? पपांना देखील कविता आवडतात. त्यांना कविता आवडत नसत्या तर माझ्या नांवावर कविता छापायला त्यांनीं परवानगीं दिली नसती !

**बेबी :** तसं नाहीं दिदी, पण ह्या नवीन कविता पपांना नाहीं पटणार !

**महाराज :** बेबी, मला पुस्तक दे.

**बेबी :** पण कवितांचं पुस्तक—तुम्हांला—

**दिदी :** बेबी, हा काय भलताच हट्ट ?

(बेबी पुस्तक देते.)

**महाराज :** (त्यांतील पत्र घेतात. पुस्तक फेकून देतात. पत्र उघडतात.) संजय देशमुख !

**दिदी :** संजय देशमुखचं पत्र ? कुणाला आलंय् ?

**बेबी :** तुला दिदी.

**दिदी :** मला ?—बघूं पपा—

**बेबी :** पपा, द्या ना तें पत्र दिदीला.

**दिदी :** पपा—

**महाराज :** कुणीं बोलावलं त्याला इथं ?

**दिदी :** कुणाला ?

**महाराज :** ह्याला !

**दिदी :** कुणीं बोलावलंय ? कुणीं नाहीं.

**महाराज :** न बोलवतांच येतो आहे तो इथं ?

**दिदी :** इथं ?—केव्हां ?

**महाराज :** आज. बेबी—

**बेबी :** काय पपा ?

**महाराज :** खरं सांग—हा येणार म्हणून मघाचं नाचगाणं चाललं होतं कीं नाहीं ?

**बेबी :** नाहीं.



म. ग्रं. ...
क्र. २३२०८ ... ५।७।६०

**महाराज** : खोटं बोलूं नकोस.

**बेबी** : मी खोटं बोलत नाहीं पपा. आणि ह्या वाड्यांत खोटं बोललेलं वास्तुदेवतेला आवडणार नाहीं.

**महाराज** : बेबी—आय विल शूट यू !

**बेबी** : आतां शक्य नाहीं तें.

**महाराज** : कां नाहीं ?

**बेबी** : कोर्टापुढें चौकशी होईल. पूर्वी अधिकार होते तुम्हांला—

**महाराज** : कुणीं शिकविलीं उलट उत्तरं द्यायला ?

**बेबी** : माझ्या इंग्लिश गवर्नेसनं—जातांना माझ्या ऑटोग्राफ्सच्या वहींत एकच वाक्य लिहून दिलंय तिनं—'स्वाभिमान सोडूं नकोस.'

**महाराज** : ठीक आहे. मग हा वाडा सोडून जावं लागेल.

**बेबी** : जाईन.

**महाराज** : कुठं जाशील ?

**बेबी** : गेल्यावर कळेल !

**महाराज** : हा निर्णय शक्य तितक्या लवकर घे ! दिदी, हा इसम इथं येतां कामा नये !

**दिदी** : पण तो कुठं येणार आहे ?

**महाराज** : ह्यांत स्वच्छ लिहिलं आहे त्यानं. दिदी, बेबीवर माझा कधींच विश्वास नव्हता—तुझ्यावर होता—पण गेला !

**दिदी** : विश्वास ?—पण पपा...कां—कां पण ?

**महाराज** : मला प्रश्नांचीं उत्तरं द्यायची संवय नाहीं. (जातात.)

**दिदी** : बेबी, खरंच संजय येणार आहेत ?

**बेबी** : (महाराजांच्या थाटांत) प्रश्नांचीं उत्तरं द्यायची संवय नाहीं मला ! (महाराज ज्या दिशेनें गेले त्या दिशेला पाहून) हीऽऽ ! (दांतओठ चावते.)

**दिदी** : बेबी, संजय इथं येतील ?—पण नाहीं बेबी. ते येतां कामा नयेत ! नाहीं नाहीं—मला त्यांना भेटायचं नाहीं. ह्या अवस्थेंत नाहीं. तूं खालीं जा... आणि ते आले कीं त्यांना रिसीव कर.

**बेबी :** स्टेट गेस्ट वर्ग पहिला, दुसरा कीं तिसरा ? खास पाहुणे म्हणून कीं नुसतंच पब्लिक ?

**दिदी :** बेबी, पण संजय कशाला येतील इथं ! छे बेबी—पण बेबी, वेणी सुद्धां घातली नाहीं ग मीं नीट—

**बेबी :** राहूं दे दिदी—तशीच चांगली दिसतेस.

**दिदी :** बेबी, पण तूं त्यांना सांग—म्हणावं दिदी आजारी आहे, पण दिदी म्हणजे कोण तें कळणार नाहीं त्यांना ! पण सांग—जा, थांब जा खालीं जाऊन.

**बेबी :** पण ते केव्हां येणार तें कसं कळायचं ? का आतांपासूनच जाउन बसूं ?

**दिदी :** जा बेबी—नाहीं ग, मला नाहीं भेटायचं त्यांना—नको बेबी—काय वाटेल तें कर बेबी...पण शक्य नाहीं मला तें—

**बेबी :** पण दिदी, मला आतां अपॉइंटमेंट आहे—

**दिदी :** कुणाची ?

**बेबी :** कळेल तुला. तुला काय वाटलं, पपांना मी घराबाहेर जाईन असं सांगितलं तें उगीच ? दिदी, आय मस्ट गो नाऊ—तो येईल—

**दिदी :** कोण ?

**बेबी :** तो—तो—

**दिदी :** तो ?—त्याचं कांहीं नांव ?

**बेबी :** (नुसतीच मान हलवते.)

**दिदी :** कोण तो ?

**बेबी :** दिदी—(तिच्या गळ्यांत पडते आणि तिच्या कानांत सांगते.)

**दिदी :** बेबी—छे छे ! आणि पपा—पण पपांना सहन होणं शक्य नाहीं हें ! आणि बेबी, इतके दिवस माझ्यापासून लपवून ठेवलंस ना हें ?

**बेबी :** दिदी, मला धैर्यच झालं नाहीं ग तुला सांगायचं !

**दिदी :** म्हणजे पपांच्यापेक्षां मला जास्त घाबरतेस तूं बेबी ?

**बेबी :** नाहीं दिदी—मी आयुष्यांत जर कुणाला घाबरलें नसेन ना, तर

पपांना. कशाला घाबरायचं ग दिदी त्यांना ? त्यांनीं कधीं प्रेमच केलं नाहीं आमच्यावर.

**दिदी** : असं नाहीं बेबी—पपांचं खूप प्रेम आहे आपल्यावर—

**बेबी** : तुझ्यावर—आमच्यावर नाहीं ! प्रतापदादा आणि राजूभय्याला फॉरेनला शिकायला जायचं होतं, त्यांना नाहीं पाठवलं—आमचं ह्या वाड्यांत लोणचं घालून ठेवलं आहे पपांनीं—म्हणून मी ठरवलंय् कीं इथून जातांना पपांना जबरदस्त धक्का देऊन जायचं !

**दिदी** : आणि जाईपर्यंत दिदीला देखील एका अक्षरानं कळवायचं नाहीं... होय ना ?

**बेबी** : असं नाहीं ग दिदी. मी धाकटी बहीण तुझी—तुझ्या आधीं माझं लग्न ? दिदी, नको ग बोलायला लावूं मला.

**दिदी** : वेडी ! तुम्हां सगळ्यांना हा वाडा सोडून जायचं आहे. प्रताप आणि राजूहि जातील कुठें कुठें, शेवटीं मी आणि पपा...आणि शेवटीं मी—अगदीं एकटी—अगदीं एकटी—

(संजय प्रवेश करतो.)

**संजय** : मी येऊं का आंत ?

**हुजऱ्या** : (मागून धावत येत) पण साहेब, आपण एकदम आंत येऊं शकत नाहीं—

**संजय** : येऊं शकत नाहीं ? आलों तर खरा ! येऊं कां नाहीं शकत ?

**हुजऱ्या** : पद्धत नाहीं, साहेब.

**संजय** : पद्धत नाहीं ?—मग काय पद्धत आहे ?

**हुजऱ्या** : विचारून आंत यायचं.

**संजय** : वारा येतो का वाड्यांत तुमच्या ?

**हुजऱ्या** : वारा ?

**संजय** : हो, वारा.

**हुजऱ्या** : हो, येतो.

**संजय** : तो कधीं विचारून येतो का ?

**हुजऱ्या :** काय ?

**संजय :** वारा कधीं विचारून येतो का ?

**हुजऱ्या :** नाहीं—

**संजय :** मग मलाहि गरज नाहीं विचारायची ! जा ! (हुजऱ्या जातो.)
(संजय पुढें येतो. एकदां बेबीकडे आणि एकदां दिदीकडे असें आलटून पालटून पाहतो.)

**दिदी :** (क्षणभर त्याच्याकडे पाहून) संजय !

**संजय :** होय !—हेमा ?

**दिदी :** होय—(उठायचा प्रयत्न करते—बेबी तिला धरते.)

**बेबी :** उठूं नको दिदी—

**संजय :** कां ? बरं वाटत नाहीं ?

**दिदी :** (अत्यंत खिन्नपणानं) हो !

**संजय :** पण ?—कसं शक्य आहे ?

**बेबी :** गेलीं दहा वर्षं आजारी आहे दिदी !

**संजय :** शक्य नाहीं—रानांतून, तृणांतून, पानांतून, हरणाच्या गतीनें धावणारी, कविता लिहिणारी हेमा—

**दिदी :** संजय—इथं कसे आलांत तुम्ही—

**संजय :** कसा आलों ? तूं बोलावलंस म्हणून आलों—'शब्दावांचुन कळलें सारें शब्दांच्या पलिकडलें, प्रथम तुला पाहियलें आणिक घडूं नये तें घडलें—'

**दिदी :** माझी कविता ! पण छापली नव्हती मीं कुठं. तुम्हांला कशी कळली ?

**संजय :** मला कशी कळली ?—वा ! करून सवरून नामानिराळं राह्यचं ही राजनीति आहे हेमा—आपली नीति नाहीं ! प्रत्येक कविता लिहून पाठवत होतीस ना तूं मला, मी उत्तर देखील पाठवत होतों—

**दिदी :** नाहीं हो ! आज पहिलं पत्र आलं तुमचं. तें देखील मीं वाचलं नाहीं. मग तुमच्या कवितांना मी उत्तर कसं पाठवणार ?

**संजय :** काय बोलतेस हें हेमा ?

**दिदी** : हो! माझ्याच ओळी ह्या. पण माझ्या वहींत आहेत त्या. तुमच्या कविता मीं संग्रहांतून—मासिकांतून वाचल्या.

**संजय** : पण त्यापूर्वी त्या तुला लिहून पाठवल्या आहेत मीं—मिळाल्या नाहींत?

**दिदी** : कसली शपथ घेऊन सांगूं?

**संजय** : नको नको—शपथ नको. पण तुला माझं एकहि पत्र मिळालं नाहीं? मग तुझीं इतकीं पत्रं मला कशीं मिळालीं?

**दिदी** : मी तुम्हांला पत्र?—हो—मनांत खूप लिहीत होतें—त्या ओळी कविता होऊन येत होत्या—मला छळायच्या त्या ओळी—पण त्या तुम्हांला कोणीं पाठवल्या?

**बेबी** : मीं!

**दिदी** : बेबी?

**बेबी** : होय दिदी—मीं! तीं पत्रं मीं लिहिलीं संजय! दिदीच्या कविता मीं पाठवल्या—दिदीला नकळत—

**दिदी** : हें काय केलंस बेबी? असली क्रूर थट्टा—कां त्यांना असं फसवलंस?

**संजय** : फसवलं? कुणीं फसवलं?

**दिदी** : माझ्या ह्या धाकट्या बहिणीनं—

**संजय** : मग त्यांत फसवलं काय तिनं? हें असं व्हायचंच होतं!

**दिदी** : काय व्हायचं होतं!

**संजय** : मी हा तुला असा भेटणार होतों—हें केव्हांच ठरलं आहे!

**बेबी** : ठरलं आहे! कुणीं ठरवलं आहे?

**संजय** : ज्यानं वसंतांत कोकिळेनं गायचं असं ठरवलं, श्रावणांत उन्हा-पावसाची पाठशिवणी ठरवली, जो शिशिरांत वसुंधरेला धुक्याच्या दुलया पाठवतो आणि वर्षाऋतूंत मोरांना नाचायला लावतो त्यानं. हेमा ठाऊक नव्हतं तुला हें? कसं शक्य आहे? तूंच—हो तूंच—पण तूं अशी बसून नव्हतीस, खूप खूप हिंडत होतीस! ऊठ ऊठ! (दिदी भारावल्यासारखी उठण्याचा

प्रयत्न करते.)...हं चल, पुढं ये—असं काय? अग श्रावण झडायला लागेल—पिवळ्या उन्हांतून—हिरव्या सरींतून खूप फिरायचं आहे तुला. थांबायचा नाहीं श्रावण आपल्यासाठीं...चल चल...(दिदी पुन्हा उठण्याचा प्रयत्न करते, पण क्षणभर उभी राहून पुन्हा बसते.)

**दिदी :** नाहीं संजय—अशक्य आहे हें. (दूर वाड्यावर टोले वाजल्याचा आवाज येतो. बेबी चटकन् घड्याळांत पाहते.)

**बेबी :** दिदी, मी जाऊं?

**दिदी :** कुठें ग?

**बेबी :** तो आला असेल—

**संजय :** कोण?

**दिदी :** सांग ना बेबी—सांग ना कोण कुणासाठीं उभा राहिलाय तो!

**बेबी :** सांगूं? वसंतांत ज्यानं कोकिळेला गायला लावलं, श्रावणांत ज्यानं उन्हापावसाची पाठशिवणी ठरवली, हेमंतांत—हेमंतांत ज्यानं कुणाला तरी... असंच कांहीं करायला लावलं—त्यानंच त्याला उभा केलाय, वाड्याबाहेरच्या पिंपळाच्या पारावर—

**संजय :** चेष्टा करतेस काय ग माझी? प्रेम करतेस ना कोणावर तरी?—उत्कटतेनं कर—वीज वृक्षाला जशी येऊन भेटते ना, तशी भेट त्याला.

**बेबी :** नको नको...वृक्ष उन्मळून पडायचा.

**संजय :** सांगतां येत नाहीं—फुलूनहि येईल.

**दिदी :** बेबी, जा—ताटकळत असेल बिचारा!

**बेबी :** राहूं दे थोडा वेळ उभा. मग थोडासा रागावेल तो. आणि दिदी, रागावला कीं नाहीं, म्हणजे कपाळावरची केसांची बट अशी बोटांत घालून गुंडाळीत गप्प बसतो...

**दिदी :** बेबी, आपल्या माणसाची इतकी तारीफ करूं नये बेटा.

**बेबी :** मग काय करूं?—त्याला कविता करतां येत असत्या तर दिवसभर गुणगुणत बसलें असतें—ना ना न ना ना न न ना न ना ना...

(हुजऱ्या महाराजांना घेऊन आला आहे.)

हुजऱ्या : हेच ते ! वाऱ्याला परवानगी लागत नाहीं म्हणाले...

महाराज : (हुजऱ्याला नुसत्या मानेनं 'जा' असा इशारा करतात.)

बेबी : हे संजय देशमुख—पपा—हे आमचे वडील.

(संजय नमस्कार करतो.)

महाराज : दिदीराजांची प्रकृति ठीक नाहीं.

संजय : सांगितलं त्यांनीं मला.

महाराज : बेबीराजे, तुमचं काय काम आहे इथं ? कितीदां सांगितलं मी इथं दिदीच्या खोलींत येऊन तिला त्रास देऊं नका म्हणून ?

दिदी : बेबीचा कसला त्रास पपा ? मला कुणाचाच त्रास होत नाहीं पपा—

बेबी : तुला नाहीं होत दिदी—पपांना होतो. दिदी, जातें हं मी.

महाराज : बेबीराजे ! आमच्या स्टडीमध्यें जाऊन बसा—मला बोलायचं आहे तुमच्याशीं.

बेबी : मला बाहेर जायचं आहे.

महाराज : जातां येणार नाहीं—कुणालाहि आतां वाड्याबाहेर जातां येणार नाहीं !

बेबी : पण पपा मला—

महाराज : मला तुमचं कांहींहि ऐकायचं नाहीं. स्टडींत जाऊन बसा माझ्या.

(बेबी जाते.)

संजय : अस्सं !

महाराज : अस्सं काय ?

संजय : ह्यांच्या आजाराचं कारण समजलं मला...

महाराज : आपण कांहीं डॉक्टर वगैरे ?

संजय : डॉक्टरना सुधारतां येण्यासारखा रोग नाहीं आहे हा. ह्या पायांत औषधांनीं त्राण येणार नाहीं—त्यांना भल्या पहाटे गवताच्या पात्यांवरच्या

दवाचं स्नान घडलं पाहिजे...पावसाची प्रतीक्षा करीत तापत असलेल्या शेतांतल्या ढेकळांचा लेप लावावा लागेल...डोंगरमाथ्यावर जाऊन उगवल्या सूर्यकिरणांचा शेक घ्यावा लागेल...सायंताऱ्याला साक्षी ठेवून माळावरचं भणाणणारं वारं कानांवरून घालवावं लागेल...चंद्रकिरणांचं सचैल स्नान घडावं लागेल...ह्या रोगावरचीं औषधं वैद्यकीच्या पुस्तकांत नाहीं सांपडणार. व्यास, वाल्मीकि, कालिदास, भवभूति, शेक्सपिअर, शेली यांच्यासारखे धन्वंतरी हा रोग बरा करण्याचा महामंत्र केव्हांच देऊन गेले आहेत, युवर हायनेस.

**महाराज :** दिदी...ह्यांना जायला सांगूं शकतेस ! दिदी, तें औषध अजून तिथंच !

**संजय :** असल्या औषधांनीं तिच्या पायांत फार तर त्राण येईल...पण तिला पंख हवे आहेत, पांय नकोत—तिच्या चालण्याला पाय अपुरे आहेत ...हें चालणं अलौकिक आहे, युवर हायनेस. ह्या चालण्यांतून जीं पावलं उमटतात, तीं शतकानुशतकं पुसलीं जात नाहींत. सारे लोक त्यांचा मागोवा घेत आपली वाट काढतात. असं चालण्याचं भाग्य फार थोड्या—अगदीं मनुष्याणाम् सहस्रेषु...असं क्वचित् एखाद्याच्या वांट्याला येतं. तें चालणं थांबवतों म्हणून थांबवूं शकणार नाहीं तुम्ही !

**महाराज :** नुसते शब्द !

**संजय :** शब्द ! परमेश्वराचं स्वप्न ज्यांतून साकार झालं, तोहि एक नुसता शब्दच होता. नुसता हुंकार ! समर्थांनीं ह्या शब्दसृष्टीच्या ईश्वरांना पहिलं वंदन केलं आहे...वाल्मीकीचा शब्द खरा करायला रामचंद्राला अवतार घ्यावा लागला ! महात्माजींनीं दोनच शब्दांचा मंत्र उच्चारला, 'चालते व्हा ! —एक प्रचंड साम्राज्य गडगडलं आणि त्याच्या ढिगाऱ्याखालीं तुमच्या संस्थानासारखीं अनेक संस्थानं...

**महाराज :** तेंच मी तुम्हांला सांगतों आहे — चालते व्हा !

**संजय :** (हसतो.) मंत्र उच्चारणारा महात्मा असावा लागतो सरकार— शाळकरी नाटकांतला राजा देखील 'दिवाणजी, ह्या दुष्टाचा शिरच्छेद करा—' म्हणतो आणि प्रेक्षक त्या चिटुकल्या नाटकी राजाच्या अभिनयाला पोट

धरधरून हसतात...चालते व्हा! मी इथं आलोंय् तो चालता व्हायला नव्हे, चालतं करायला! सगळ्यांना पांगळं केलंय तुम्हीं!

**महाराज** : माझ्या घरांत मी वाटेल तें करीन. मीं काय करावं हें सांगायचा अधिकार तुमचा नाहीं—

**संजय** : मान्य आहे, पण तुमच्या वाड्यांत एक व्यक्ति अशी जन्माला आली आहे कीं तिनं येतांना देवाच देणं बरोबर आणलं आहे. तुमच्या राजवाड्यांत ही पांगळी हेमलतादेवी होऊन राहण्यासाठीं जन्माला आली नाहीं! 'हें विश्वचि माझें घर' अशी ज्या घराची अलौकिक प्रतिज्ञा आहे त्या कुळांत तिचा जन्म झाला आहे. चिरंतनाचं वरदान आहे तिला. वरपांगीं दुबळ्या झालेल्या देहांत अद्भुत सामर्थ्य आहे, युवर हायनेस—तें कोंडून ठेवूं शकणार नाहीं तुम्ही!

**महाराज** : तुम्ही काय बोलतां आहांत यांतल्या एका अक्षराचाहि अर्थ कळत नाहीं मला!

**संजय** : दुर्दैव तुमचं! परमेश्वरानं तुम्हांला इतकं अभागी कां करावं कळत नाहीं मला!

**महाराज** : आपल्या अलौकिक भाग्याची कल्पना येईल का मला?

**संजय** : नाहीं येणार! तुमचा इलाज नाहीं त्याला! निसर्ग असलीं क्रूर कर्मे करतो कधीं कधीं! त्यालाहि राजेमहाराजांसारख्या लहरी आहेत. फकिरांच्या गळ्यांत तो सूर ठेवतो आणि अमीरांच्या डोळ्यांत रंग भरायला विसरतो! युवर हायनेस, कां, कां तिला ह्या कोंडवाड्यांत ठेवतां? कसला स्वार्थी हेतु आहे तुमचा?—

**महाराज** : स्वार्थ? ह्यांत कसला आला आहे स्वार्थ! दिदी चालायला लागावी...पुन्हा पहिल्यासारखी हिंडायला लागावी म्हणून मीं काय काय इलाज केले तुम्हांला काय कल्पना?

**संजय** : जो इलाज करायचा तो केला नाहीं तुम्हीं! तिला औषध एकच आहे—मुक्त स्वातंत्र्य!

**महाराज** : म्हणजे तुमच्या बरोबर पाठवायचं—

**संजय** : माझ्याबरोबर ती येणार? पाचोळ्यानं वादळ उठवलेलं ऐकलं नाहीं

मीं सरकार ! वादळानं पाचोळा उडतो ! तिच्या कविता वाचल्या आहेत का कधीं आपण ?

**महाराज :** तेवढंच राहिलं आहे आतां ! राज्य गेलं—उद्योग काय उरलाय् आम्हांला—कविता वाचत बसतों !

**संजय :** जरूर वाचा ! राज्य गेल्याचं दुःख नाहींसं होईल. एका विराट राज्याचे महाराज झाल्याचा आनंद होईल.

**महाराज :** नको आहे तो मला.

**संजय :** बरं बोललां नाहीं—पण खरं बोललांत. तुम्हांला आनंद नको आहे—तुम्हांला स्वतःला नको आहे. आणि कोणाला झालेलाहि नको आहे. फक्त सत्ता !—सत्ता हवी असते ! खूप आहेत तुमच्या जातीचे लोक ह्या जगांत. कुणी आनंदानं नाचतगात असलं, खातपीत असलं, आनंदानं बेहोष झालेलं असलं कीं त्यांना कधीं एकदां बंदुकीच्या गोळ्यांनीं ठार मारून टाकूं असं होऊन जातं तुम्हांला !—हिटलर, मुसोलिनी यांच्यासारख्या मग्रुरांची अवलाद ह्याच ह्याच तत्त्वज्ञानांतून निघाली होती.

**महाराज :** सुभानराव ! (सुभानराव धावत येतात.) फेकून द्या याला बाहेर…

**दिदी :** (खुर्चीवरून उठून आवेगानें त्याच्यापर्यंत चालत जाते.) पपा—

(महाराज वळून पाहतात. दिदीला संजयनं सावरलं आहे.)

**महाराज :** दिदी, हे इथं आलेले आवडणार नाहीं मला !

**दिदी :** पपा—पपा—मी घेतें औषध. (संजय तिला खुर्चीवर बसवतो.)

**संजय :** पण युवर हायनेस, नका—नका देऊं तीं औषधं—त्यांची व्यथा मला कळली आहे. मघाच्या आवेगाबद्दल क्षमा करा मला—मला पाहवत नाहीं हें दृश्य—जिच्या शब्दांतून सगळ्या जगाला चैतन्य मिळावं, तिनं हें असं असहाय, दीन, करुण होऊन इथं पडून राह्यचं ? माझं ऐका—हेमाचं हें दर्शन पाहण्याच्या अपेक्षेनें मी नव्हतों आलों–

**महाराज :** कशासाठीं आलां होतां ?

**संजय :** आज कित्येक वर्षं मी त्यांच्या कविता वाचत आलों आहे. माझ्या कविता त्यांनीं वाचल्या आहेत. त्यांच्या तोंडून कविता ऐकाव्या, आयुष्यांतले

कांहीं क्षण एका अलौकिक प्रतिभेचा विलास पाहण्यांत घालवावे एवढीच अपेक्षा होती युवर हायनेस—

**महाराज** : एवढीच ?

**संजय** : आणखी काय काय असणार युवर हायनेस ?—

**महाराज** : दिदी, तें औषध घेऊं नकोस.

**संजय** : (सद्गदित होऊन) थँक्स, युवर हायनेस.

**महाराज** : जाऊं शकतां !

**संजय** : माझी एक विनंती ऐका, युवर हायनेस—

**महाराज** : सुभानराव, त्यांना देवडीपर्यंत पोहोंचवा.

**सुभानराव** : यस् युवर हायनेस.

**संजय** : (अर्धवट आपल्याशीच) यस् युवर हायनेस—यस् युवर हायनेस !

(सुभानरावाकडे कमालीच्या तुच्छतेनें पाहतो आणि निघून जातो.)

**महाराज** : दिदी—

**दिदी** : पपा—हें पाहा पपा, मी घेतें औषध—पपा—(महाराज वळून तिच्याकडे पाहतात...अत्यंत कष्टानें दिदी औषध घेऊं लागते. दिदी औषधाचा पेला ओठाला लावते आणि पडदा पडतो.)

# २

*स्थळ तेंच. दिदी हळूहळू चालत आहे. प्रताप, राजेंद्र आणि डॉक्टर पाहत आहेत. चालत चालत शेवटीं एका मोठ्या खुर्चीवर जाऊन बसते.*

**डॉक्टर :** एक्सलंट!—दिदीराजे, एक्सलंट! अठ्ठेचाळीस पावलं झालीं.. वंडरफुल् दिदीराजे. मीं म्हटलं नव्हतं — यत्कृपा तमहं वंदे परमानंदमाधवं—
**प्रताप :** दिदी, विश्वास नाहीं बसत—मार्वलस् प्रोग्रेस—
**राजेंद्र :** डॉक्टर, यू आर—यू आर—यू आर वंडरफुल! डॉक्टर! मी जर राजा असतों ना नंदनवाडीचा, तर—राज्य राज्य दिलं असतं तुम्हांला—नाहीं दिदी?
**प्रताप :** नको नको. राज्य नको कुणाला. दिदी, आतां आपल्याला काश्मीरला जातां येईल...
**दिदी :** काश्मीर!—हो. पण आधीं मी कुठं जाणार आहं ठाऊक आहे तुला? हृषीकेशला! तिथें गंगेचा प्रवाह शुभ्र, अगदीं दुधासारखा शुभ्र आहे!
**प्रताप :** आणि लक्ष्मणझूला म्हणून हलता पूल आहे म्हणे!—मीं पुलावरून नदीच्या प्रवाहांत उडी टाकीन.
**राजेंद्र :** मी सुद्धां.
**दिदी :** डॉक्टर, मला पोहतां येईल का हो?
**डॉक्टर :** दिदी, तुम्हांला काय येणार नाहीं? कल्पनेच्या पंखानें तुम्ही त्रिखंडांत भराऱ्या मारून येतां—एखादवेळीं...
**दिदी :** उडत उडत आकाशांत जाईन म्हणतां—

**डॉक्टर** : जाल! मीं मात्र ठरवलंय...तुम्ही कुठेंहि जा. मी आपला नाशिकला जाईन. हो नाशिकला!

**राजेंद्र** : कशाला?

**डॉक्टर** : आमची डॉक्टरकीची डिग्री आहे ना, तिचं अस्थिविसर्जन करून येतों! नो नो! माझा विश्वासच बसत नाहीं—दिदी, यू आर ॲक्च्युअली वॉकिंग्!

**दिदी** : डॉक्टर, आज पहाटे कीं नाहीं, मी टेरेसपर्यंत गेलें...तिथून दूरचे डोंगर कसे निळे निळे दिसतात! डॉक्टरकाका, हा निळा रंग आहे ना, हा मोठा भव्य आहे. मला कधीं कुणीं भव्यतेचं चित्र काढायला सांगितलं तर मी फक्त निळ्या रंगाच्याच छटा वापरीन. आकाशाचा निळा—समुद्राचा निळा—गडद निळा रंग...ममीचे डोळे निळसर होते—त्यांना सातासमुद्राची अथांगता होती—

**डॉक्टर** : दिदी—अजून नाहीं माझा विश्वास बसत. परवां तुम्हीं पहिलीं पावलं टाकलींत—मला काय वाटलं सांगूं?

**दिदी** : काय वाटलं?

**डॉक्टर** : राजेंद्र, प्रतापराजे, हसायचं नाहीं हं! तुम्ही म्हणाल सेंटिमेंटल आहे म्हातारा. म्हणा बापडे—आय काण्ट हेल्प इट्—आय् कांट हेल्प इट्! काय वाटलं सांगूं, वाटलं कीं तुमच्या त्या नवी शक्ति आलेल्या पावलांवर डोकं ठेवावं—आणि गडबडा लोळावं!

**दिदी** : डॉक्टर, पायांवर डोकं ठेवलं पाहिजे तुमच्या. आज दहा वर्षं माझ्या पायांखेरीज विचार नव्हता तुम्हांला.

**डॉक्टर** : त्यालाहि असेच महान् पाय जबाबदार आहेत.

**प्रताप** : पाय?—कुणाचे?

**डॉक्टर** : तुमच्या ममीचे! त्या पायांवर हात ठेवून शपथ घेतली होती मीं.

**दिदी** : कसली?

**डॉक्टर** : जाऊं दे! लेट् अस् फर्गेट् इट्! पण दिदीराजे, मी काय सांगूं तुम्हांला?—खरं सांगूं दिदीराजे, राजघराण्यांतल्या रीतिरिवाजांत मुक्तता मेली

आहे आमची, नाहीं तर तुम्हांला डोक्यावर घेऊन नाचलों असतों मी ! छे, आनंदानं वेड लागेल मला. दिदीराजे, जरा उभ्या राहतां ?

**दिदी :** कशाला डॉक्टर ?

**डॉक्टर :** दिदीराजे, उभ्या राहा—प्लीज्. प्रताप, राजेंद्र, तुम्ही डोळे मिटा पाहूं.

**प्रताप :** डोळे मिटूं ?

**राजेंद्र :** कां पण ? दिदीला डोक्यावर घेऊन नाचणार वगैरे आहांत कीं काय ? आम्हांला तरी बघूं दे. नाहीं तर आपण सगळेच नाचूं या का ?

**डॉक्टर :** बॉइज्, नाऊ बी सीरिअस. दिदीराजे, देवानें मला अलौकिक असं कांहीं देणं दिलं नाहीं. साधा आर्. एम्. पी. डॉक्टर मी. महाराजांच्या आश्रयाला राहिलों तें इथंच आयुष्य गेलं माझं. (दिदी हळूहळू उभी राहते.) माझा आनंद व्यक्त करायला मला शब्द सुचत नाहींत...कांहीं कांहीं सुचत नाहीं...पण दिदी, मला तो व्यक्त करायचा आहे...म्हणून दिदीराजे— (तिचे पाय धरून तिला नमस्कार करतो.)

**दिदी :** डॉक्टर, हें काय बरं ? मला आशीर्वाद द्यायचा तुम्हीं—नमस्कार करतां ? (डॉक्टरांच्या डोळ्यांतून अश्रूंचा प्रवाह वाहतो.) डॉक्टर—डॉक्टर-काका, डॉक्टर, बसा. प्रताप—(डॉक्टरांना आधार देऊन बसवायला सांगते.)

**प्रताप :** (त्यांना बसवीत) डॉक्टर, हें काय बरं डॉक्टर ! काय झालं डॉक्टर ?

**डॉक्टर :** ओ—डोंट बी अफ्रेड बॉय...ओ—मी जरा—एक्साइट झालोंय. एखादं—एखादं महान् कार्य संपावं आणि—आणि...नो—मला नीट समजावून नाहीं सांगतां येणार—पण एक कांहीं तरी नवं पर्व सुरू व्हावं—काइंड ऑफ अ न्यू बिगिनिंग...ओ—होपलेस...नाहीं—मला नाहीं सांगतां येत. सॉरी चिल्ड्रेन—मी कीं नाहीं जरा एक्साइट झालोंय...यू नो—म्हातारपण झालं आतां, आतां दुःख तर नाहींच, पण आनंदसुद्धां सहन करणं कठीण जातं शरिराला.

**प्रताप :** नाहीं डॉक्टर, तुम्ही कांहीं तरी लपवतां आहां. डॉक्टर, पपा कांहीं बोलले का तुम्हांला ?

**डॉक्टर :** नाहीं नाहीं प्रतापराजे, कुणीहि कांहीं बोललं नाहीं—आणि मला यापुढं कोणी बोललं—अरे मूर्ख, गाढव, काय वाटेल तें म्हटलं तरी मला कांहीं

वाटणार नाहीं...अरे महान् महान् साक्षात्कार झाला आहे मला. (उठतात.)

**दिदी** : डॉक्टर, उठलांत कां तुम्ही ? बसा जरा स्वस्थ.

**डॉक्टर** : कधीं बसलों मी तुमच्यापुढं—

**दिदी** : हें काय डॉक्टर—छे ! तुम्हीं नमस्कार केल्यापासून मला इतकं चमत्कारिक वाटायला लागलं आहे—

**डॉक्टर** : तुम्हांला नाहीं केला मीं नमस्कार. ह्या पायांना केला. ह्या पायांना कसल्या तरी अलौकिक तेजाचा स्पर्श झालाय. त्या तेजाला नमस्कार केला मीं. पांगळ्यांना पर्वत चढायला लावणाऱ्या परमानंदाच्या कृपेचा स्पर्श झालाय ह्या पायांना—त्यांना केला मीं नमस्कार.

**दिदी** : छे छे—डॉक्टर, योग्यता आहे का त्या पायांची ?

**डॉक्टर** : असली पाहिजे—नाहीं दिदीराजे, औषधांनीं पाय बरे झाले असं म्हणायला वेड नाहीं लागलं मला ! कुठलं तरी दिव्य चैतन्य संचारलं आहे तुमच्या अंगांत—त्यानं ही शक्ति आली.

**प्रताप** : मग डॉक्टरकाका, आतां आपण जायचं ना हृषीकेशला ? तुम्ही सांगा पपांना. म्हणावं दिदी आतां एव्हरेस्टवरसुद्धां जाऊं शकेल !

**राजेंद्र** : आणि डॉक्टर, तुम्ही पपांना सांगा, कीं त्यांना हा प्रवास झेपणार नाहीं. तिथें आपण खूप भटकूं—नाहीं दिदी ?

**दिदी** : हो, खूप भटकूं. हिमालयाच्या शिखराचं दर्शन घेऊं. गंगेच्या प्रवाहांत डुंबत राहूं.

**राजेंद्र** : तिथें तूं महाकाव्य लिहिशील का ग दिदी ?

**दिदी** : राजू, केवळ गंगेच्या स्नानानं महाकाव्य लिहिणं शक्य नसतं बाबा. त्याला आकाशगंगेचं स्नान घडावं लागतं. असल्या माणसानं मग एखाद्या उंदरावर कविता लिहिली तरी त्या उंदराला ऐरावताचं भाग्य लाभतं.

**प्रताप** : डॉक्टर, जा ना तुम्ही पपांना सांगायला.

**डॉक्टर** : यस्—यस्—ऑफ् कोर्स ! दिदीराजे, मी जातों. पण आतां जास्त परिश्रम करायचे नाहींत हं. आत्म्याची शक्ति प्रचंड असते, पण शरिराचा झाला तरी तो दुबळा पिंजराच—थकतो तो !

**दिदी :** हो, थकल्यासारखं वाटायला लागलं आहे खरं.

**डॉक्टर :** या—(तिला हाताला धरून नेहमीच्या खुर्चीवर न्यायला लागतात.)

**दिदी :** नको नको—आतां त्या खुर्चीवर नको. तिची किनई भीति वाटायला लागली आहे मला. बघा ना—कशी रागावल्यासारखी पाहतेय ती. चेहरा बघा कसा—

**प्रताप :** पपांसारखा केलाय्. तुझं हें चालणं तिला नाहीं आवडायचं. फेकून देऊं या का ही खुर्ची?

**दिदी :** नको रे नको—गरीब आहे बिचारी. खूप उपकार आहेत तिचे माझ्यावर.

**राजेंद्र :** मग पपांचे काय कमी आहेत? खूप खायला घालतात कीं आपल्याला—

**डॉक्टर :** नो राजेंद्र—असं बोलूं नये. ठीक आहे दिदी, तुम्ही ह्याच खुर्चीवर बसा बरं.

**दिदी :** नको—बसतें तिथें. वाईट वाटेल माझ्या खुर्चीला. (डॉक्टर तिला नेहमींच्या खुर्चीकडे नेतात.) बसतें बाई, इथेंच बसतें. तुझी माझी सोबत फार वर्षांची आहे! अरे खरंच, बेब्या कुठं गेला?

**प्रताप :** ती काय, गेली असेल पपांना आल्यावर नवा धडा द्यायला. आमच्या बहिणीच शहाण्या आमच्यापेक्षां. जाऊं दे झालं. डॉक्टर, जातां ना पपांना सांगायला—

**डॉक्टर :** यस्, असा जातों आणि सरळ सांगतों—(महाराज येतात. डॉक्टरांच्या व इतर कोणाच्याहि लक्षांत हें आलेलें नाहीं.) युवर हायनेस्, दिदीराजांची प्रकृति आतां ठणठणीत बरी झाली आहे. त्यांना काश्मीरला जायला माझी परवानगी आहे.

**महाराज :** स्टुपिड्! डॉक्टर, काय पोरकटपणा चाललाय् हा!

**डॉक्टर :** पोरकटपणा नाहीं युवर हायनेस—खरंच दिदीराजांची प्रकृति उत्कृष्ट सुधारते आहे.

**महाराज :** डोंट बी सिली!

**प्रताप** : खरंच, पण पपा—

**महाराज** : तुमचं काय काम आहे इथं? दिवसभर दिदीराजांच्या रूममध्यें काय हा धिंगाणा चालतो? तिला संपूर्ण शांततेची आवश्यकता आहे.

**प्रताप** : पण पपा—

**महाराज** : जाऊं शकतां तुम्ही! (कोणीहि हलत नाहीं.) काय झालंय अलीकडे सर्वांना? डॉक्टर, कसला कट चालवलाय तुम्हीं आमच्या विरुद्ध?

**दिदी** : पपा, डॉक्टरकाकांना कां उगीच—

**महाराज** : मला डॉक्टरांच्याकडून उत्तर पाहिजे. परवांपासून त्यांनीं माझ्या मागें काश्मीरला जायची भुणभुण लावली आहे—कोण आहे काश्मीरला? कुठला धन्वंतरी येऊन बसलाय तिथं? बोलत कां नाहीं डॉक्टर? असह्य होत चाललंय सगळं मला.

**डॉक्टर** : युवर हायनेस्, दिदीराजांना न थकतां चालतांना मीं प्रत्यक्ष पाहिलं—

**महाराज** : मीं देखील पाहिलं!

**डॉक्टर** : कुठून?

**महाराज** : हा राजवाडा आहे. इथं गुप्त असं कांहींच चालूं शकत नाहीं.

**डॉक्टर** : त्यांत 'गुप्तता असायचं काय कारण होतं? वास्तविक मीच धावत येऊन सांगणार होतों आपल्याला—

**महाराज** : मग कां नाहीं सांगितलं?

**डॉक्टर** : मला आनंदाच्या भरांत काय करावं तें कळेना.

**महाराज** : म्हणून माझ्याशिवाय काश्मीरला जायचा कट केलात—

**दिदी** : कट?

**महाराज** : किती दिवस चालली आहे ही कॉन्स्पिरसी? राज्य चालवलंय आम्हीं दिदी—साडेतीन लोकांचं कुटुंब चालवणं अवघड नाहीं आम्हांला. आणि वेवीराजे काय काश्मीरचीं तिकिटं काढायला गेल्या आहेत? दिदी, खरं सांगा—केव्हांपासून चाललंय हें?

**डॉक्टर** : काश्मीरला जावं असं तरुण मनाला वाटणारच युवर हायनेस्—

**महाराज** : तुमच्या तरुण मनाला काय काय वाटलं होतं तेंहि सांगा एकदां.

**डॉक्टर** : तें तरुणपणीं एकदांच मीं आपल्याला सांगितलं होतं, युवर हायनेस—

**महाराज** : काय सांगितलं होतं ?

**डॉक्टर** : आपण तें ध्यानांत ठेवण्याचं कारण नव्हतं—पण मी नाहीं विसरूं शकत तें, युवर हायनेस्. माझी आतां इथं आवश्यकता नाहीं—दिदी बऱ्या झाल्या आहेत—

**महाराज** : दिदी बऱ्या झाल्या नाहींत. तरीहि तुम्हांला जायचं असेल तर जाऊं शकतां. ज्यांना ज्यांना इथून जायचं असेल त्यांनीं जावं. मी कुणालाहि थांबवीत नाहीं. पण इथं राह्यचं असलं तर आमच्या इच्छेप्रमाणें वागायच्या अटींवरच राहिलं पाहिजे ! मग ते नोकर असोत नाहीं तर राजघराण्यांतील लोक असोत. दिदी, औषध घेतलंस ?

**दिदी** : औषध ?

**डॉक्टर** : औषधाची आवश्यकता नाहीं !

**महाराज** : आहे !

**दिदी** : पपा, मला खरंच चालतां येतं. मी जरा थकलें आहें आतां, नाहीं तर—

**महाराज** : ह्याचाच अर्थ तुम्हांला औषधाची गरज आहे. डॉक्टर, विचार करून मला आपला निर्णय कळवा. मला दुसऱ्या डॉक्टरांची व्यवस्था करावी लागेल !

**डॉक्टर** : मी शब्द मागं घेतों, युवर हायनेस्—

**प्रताप** : पण कां—डॉक्टर जात कां नाहीं ? (डॉक्टर त्याच्या पाठीवरून हात फिरवितात—खिन्नपणानें हसतात आणि जातात.)

**महाराज** : प्रताप, राजेंद्र, मला दिदीशीं बोलायचं आहे—फक्त तिच्याशीं. (ते दोघ जातात.) दिदी, काश्मीरला जायचंच आहे तर मला नकळत कां हा कट चाललाय् ?

**दिदी** : पपा, कुठला कट आणि काय ? कांहींतरीच डोक्यांत घेऊन बसलां आहांत तुम्ही—

**महाराज :** काय अपराध केलाय् मीं तुमचा? प्रत्येक जण असं कां वागतोय माझ्याशीं? बेबी कुठें जात असते? तो कवि किती वेळां आला होता? कां? कां हें सगळं मला चोरून चाललंय्?

**दिदी :** पपा, काय बोलतां आहांत हें? आज आम्ही किती आनंदांत होतों—मला चालतां यायला लागलं—

**महाराज :** चालतां येण्यांतून हेंच निष्पन्न होणार असेल तर अधू होऊन पडली होतीस बिछान्यावर तें काय वाईट होतं?

**दिदी :** काय वाईट होतं? पपा, किती वर्षं मीं ह्या यातना भोगाव्या अशी इच्छा आहे तुमची? लहानपणापासून साऱ्या वाड्यांतून धावत सुटत असें मी—दोन दोन नॅनीजना आवरत नसे माझं हुंदडणं...तासन् तास घोड्यावरून रपेट करायची, पोहायचं, मैत्रिणींच्या घोळक्यांत खेळायचं नाचायचं... किती वर्षं झालीं हें सगळं बंद होऊन! मी पडून राहूं आणि काय करूं पपा?

**महाराज :** बरी हो! जा पुन्हा नाचायला लाग, खेळायला लाग. जा—सगळे जण जा! चालते व्हा! तूंहि जा—मी राहतों मग एकटा भुतासारखा! दिदी, मला त्यांचं कोणाचं कांहीं वाटत नाहीं बेटी, पण तूं माझं सर्वस्व आहेस. तूं गेलीस ह्या वाड्यांतून कीं सगळं शून्य शून्य होणार आहे.

**दिदी :** पपा, म्हणून मी अशी अपंग होऊन पडून राहूं?

**महाराज :** राहा असं कसं म्हणूं मी? पण राहिलीस तर तुझ्या पांगळेपणाचं दुःख सहन करूं शकेन मी!

**दिदी :** म्हणजे मी कधींच बरी नको का होऊं? मृत्यूची वाट पाहणं यापलीकडे कांहींच नसावं का माझ्या आयुष्यांत?

**महाराज :** मृत्यु! मृत्यूची कशाला वाट पाहतेस?

**दिदी :** मग कोणाची वाट पाहूं?

(बेबी "दिदी दिदीऽऽ" अशा हाका मारीत धावत येते—आणि महाराजांना पाहून थबकते.)

**महाराज :** बेबी, कसल्या ह्या जंगली मॅनर्स?

**बेबी :** सॉरी पपा—पण मला भयंकर आनंद झालाय.

**महाराज** : कसला ? काश्मीरचीं तिकिटं मिळालीं ?
**बेबी** : काश्मीर ? काश्मीरचं तुम्हांला कुणीं सांगितलं ?
**महाराज** : मला कुणीं सांगितलं ! पाहिलंस दिदी, मी कट म्हणत होतों तो हाच ! हेच कट चालतात वाटतं इथं ह्या राजवाड्यांत ?
**बेबी** : कट राजवाड्यांतच चालायचे पपा—
**महाराज** : बेबी !
**बेबी** : ऐतिहासिक आधार आहेत पपा—
**दिदी** : जाऊं दे तें बेबी—कसली आनंदाची बातमी सांगणार होतीस ?
**बेबी** : मेनका आली आहे—
**महाराज** : मेनका ? ती कशाला आली इथं ?
**बेबी** : कां ? तुमची पुतणी ती पपा—आमची चुलत बहीण ! आपल्या नवऱ्याला घेऊन आली आहे तुमच्या पायां पडायला.
**दिदी** : म्हणजे ? तिचं लग्न केव्हां झालं ?
**महाराज** : गेल्या आठवड्यांत.
**दिदी** : आणि बापूमहाराजांनीं निमंत्रण नाहीं धाडलं आपल्याला—
**महाराज** : धाडलं होतं—
**दिदी** : मग पपा, सांगितलं नाहीं तुम्हीं आम्हांला—
**महाराज** : त्यांत काय सांगायचं ? लग्न केलं म्हणजे काय जगावेगळी गोष्ट केली ?
**बेबी** : ह्या वाड्यांत जगावेगळीच !
**महाराज** : बेबी, माझ्या भेटीला तिला आणूं नका.
**बेबी** : ती माझ्या परवानगीसाठीं थोडीच थांबली आहे ? वाड्यांत आचारी-पाणक्यापासून सर्वांची ओळख करून देते आहे ती आपल्या नवऱ्याशीं—
**दिदी** : कुणाशीं लग्न झालं तिचं ?
**बेबी** : बघशीलच आतां ! किती तरी लोकांनीं प्रेम केलं म्हणे तिच्यावर ! कुणी पायलट होते, कुणी इंजिनिअर्स, कुणी डॉक्टर्स—शिवाय सिनेमानट तर म्हणे हात धुवून लागले होते तिच्या मागं ! खरं तर रंग धुवून म्हणायला हवं, नाहीं का दिदी ?

**महाराज** : बेबी, मला हें असलं बोलणं आवडत नाहीं—तरी कां ? कां ? व्हाय डु यू इन्सिस्ट ऑन धिस काइंड ऑफ नॉनसेन्स ?

(मेनका आणि सुरेश—मेनका अत्यंत भडक रंगाची साडी नेसली आहे. म्हणूनच तिच्या वेशभूषेंत भडकपणा आहे. सुरेशनें संपूर्ण पाश्चिमात्य पोशाख केला आहे. गळ्याला मात्र मफलर गुंडाळला आहे. मेनकेच्या मागून दवल्या-सारखा येतो. मेनका धावत महाराजांपाशी जाते.)

**मेनका** : अंकल् !! (त्यांच्या पाठीवर बुक्के मारते. महाराज सटकन दूर होतात. बेबील इनं येतें.)—बेबी, तूं सांगितलंस ना अंकल्‌ना मी आलें म्हणून. लुची ! अंकल् मला तुम्हांला सरप्राइज् द्यायचा होता. आणि वेडिंगला कुणीसुद्धां आलां नाहीं ना तुम्ही ? नुसतेच एक हजार रुपये पाठवलेत वाटेल तें प्रेझंट घे म्हणून. मला नाहीं आवडलं—दिदी-दीदी-हाऊ आर यू डिअर—बेस-बेस-तूं नको हं त्रास घेऊं—बैस. हं सुरू—हे माझे अंकल्.

**सुरेश** : (नमस्कार करतो.)

**मेनका** : ए—असा नाहीं कांहीं नमस्कार करायचा—आपण दोघांनींहि वाकून नमस्कार करायचा—

**सुरेश** : क्षमा करा हं अंकल्—

**मेनका** : ए, से—युवर हायनेस् ! अंकल् माझे अंकल् आहेत. तुझे अंकल् नाहींत कांहीं ! वा ! पाहिलंत अंकल्—नुसतेच कोट्याधीश आहेत हे लोक. राजघराण्यांतल्या मॅनर्स नाहींत ह्यांना—से—युवर हायनेस्—

**सुरेश** : युवर हायनेस्—

**मेनका** : हं, बोल आतां पुढें काय बोलायचं होतं तें—

**सुरेश** : छे छे—मला कांहींच बोलायचं नव्हतं—युवर हायनेस्—

**मेनका** : बरं का अंकल्—हा सुरू कीं नाहीं—अतिशय नर्व्हस आहे !—आणि कमालीचा शा ऽ ऽ य ! कुठं जायला नको, कुठं यायला नको ! सारखा आपला घराच्या चार भिंतींत कोंडून घेऊन बसलेला असतो—(एकटीच हसते.) माय गुडनेस् ! मीच बोलत राहिलें कीं—हं सुरू—ही माझी बहीण—हेमलतादेवी—आम्ही तिला दिदी म्हणतों—तूं पण दिदीच म्हण—चालेल ना दिदी तुला ह्यांनीं दिदी म्हटलं तर—अन्‌फॉर्च्युनेटली

गेलीं बरींच वर्षें ती आजारी असते. आणि दिदी—मीट माय् हसबंड—सुरेश लाखे !

**बेबी :** काय म्हणालीस आडनांव ?

**सुरेश :** लाखे !

**मेनका :** अग लाखों रुपये मिळवत आले यांचे फोरफादर्स म्हणून यांचें नांव लाखे पडलें असेल—(हसते.)—बरी आहे का ग ही जोक दिदी ?—मी परवां आमच्या वेडिंगची पार्टी झाली होती मुंबईला त्यावेळीं हीच जोक केली होती—बरी आहे नाहीं अंकल्—तुम्हांला आवडली ही जोक ?

**महाराज :** (आंतून भयंकर संताप) फार आवडली !

**मेनका :** आय् वॉज कॉक शुअर ! बरं का सुरू—अंकल्ना देखील जोक्स् चीक्स् खूप आवडतात ! मी लहानपणीं येत असें ना इथं ? त्यावेळीं 'स्टेट्स' होतीं—मर्जे झालीं नव्हतीं—त्यांचा विनाश झाला नव्हता—

**बेबी :** विनाश !

**मेनका :** मर्जे—मर्जला काय म्हणतात ग तुमच्या मराठींत ?—

**बेबी :** विनाश नाहीं—विलीन !

**मेनका :** हां—हां—विलीन—डॅम् धिस मराठी—बरं का सुरू—स्टेट्स मर्ज झालीं नव्हतीं—त्यांचा विलास आतां झाला—

**बेबी :** विलीन !

**मेनका :** तेंच तें—त्यावेळीं काय मजा यायची ! आम्ही गांवांतून गेलों कीं सगळे लोक मुजरा करायचे—मलासुद्धां करायचे ! बॉवेला आमच्या बापूंना कुणीसुद्धां मुजरा करीत नसत—मला आवडतं असं लोकांनीं मुजरा बिजरा केला कीं—आफ्टर ऑल रॉयल ब्लड् आहे आपलं नाहीं का अंकल् !

**महाराज :** हो !

**मेनका :** सुरू बोल ना कांहीं तरी अंकल्शीं—नाहीं तर अंकल्ना वाटेल कीं तूं शिष्ठ आहेस म्हणून—हं बोल ना—

**दिदी :** बेबी—त्यांच्या चहाची व्यवस्था—आपण बसा—

**सुरेश :** नको—चहा घेत नाहीं मी !

**मेनका :** तो फक्त ओव्हलटिन् घेतो—शेठसाहेबांना चहा पिणं आवडत

नाहीं—

**बेबी :** शेठसाहेब ?

**मेनका :** शेठसाहेब म्हणजे माझे फादर इन् लॉ ! काय मान आहे त्यांना बॉंबेच्या बिझिनेस् वर्ल्डमध्यें—सगळेजण त्यांना शेठसाहेबच म्हणतात !

**दिदी :** हो का ? कसला बिझिनेस् आहे आपला ?

**सुरेश :** मी लक्ष घालीत नाहीं त्यांच्यांत—

**मेनका :** हें चूक आहे कीं नाहीं अंकल् ! खरं म्हणजे एकुलता एक मुलगा—शेठसाहेबांच्या मागून ह्यालाच पाहावा लागणार बिझनेस्—पण हा लक्षच देत नाहीं—आतां शेठसाहेब मला बिझनेस शिकवणार आहेत—मला त्यांनीं दोन कंपन्यांचं मॅनेजर नेमलं आहे—फाइव्ह थाऊझंड रुपीज पगार देतात मला—

**बेबी :** म्हणजे तूं नोकरी करतेस ?

**मेनका :** नोकरी ? उफ् ! सिली ! अग इनकमटॅक्सला दाखवावं लागतं—सांगूं नकोस हं कुणाला नाहींतर बडबडशील—

**बेबी :** मग मला दे ना ग एक नोकरी—

**महाराज :** बेबी !

**मेनका :** वावळटच आहेस ! राजघराण्यांतलीं माणसं कधीं नोकरी करतात वाटतं—मॅड—अंकल्ना राग आला बघ !—सुरू बोल ना तूं कांहींतरी—सांग ना शेठसाहेबांचा कसला बिझनेस् आहे—ऑफिस कसं छान आहे—सांग ना—

**सुरेश :** मी खरं सांगूं का ? युवर हायनेस्—मला कीं नाहीं, शेठसाहेबांच्या बिझनेसमध्यें कांहीं इंटरेस्ट नाहीं—त्यांच्या टेबलावर सहा सहा फोन्स एकदम वाजत असतात—त्यांचे स्वर फक्त मला आवडतात—युवर हायनेस्.

**दिदी :** स्वर ?

**सुरेश :** स्वर—म्हणजे ट्रिंट्रिं—ट्रिंट्रिं—ट्रिंट्रिं—ट्रिंट्रिं—ट्रिंट्रिं—ट्रिंट्रिं—असे निरनिराळ्या स्वरांत वाजतात—प्रत्येक टेलिफोनची बेल निरनिराळ्या स्वरांत—युवर हायनेस्—

**दिदी :** तुम्हांला स्वर ओळखतां येतात ?

**मेनका :** अग हो खरंच—बरं का अंकल्—सुरूला गाण्याचं भयंकर वेड

आहे!—अरे मफलर नीट घे गळ्याभोंवतीं—थ्रोटला जपलं पाहिजे नाहीं का अंकल्—आणि सुरू, दिदी पोएट्री छान करते हं! पूर्वी एक एक पोएट्री वाचून दाखवायची मला—अजून करतेस का ग दिदी—पोएट्र्या? आणि बरं का ग दिदी, हे मला गाणं शिकवणार आहेत—

**बेबी :** अग काय काय शिकणार आहेस तूं—शेठसाहेब तुला बिझनेस शिकवणार—हे गाणं शिकवणार—

**दिदी :** थांब ग बेबी!—आम्हांला म्हणून दाखवाल गाणं एखादं?

**सुरेश :** नाहीं हो!—मी आपला नुसता घरीं बसून रेकॉर्ड्स नाहींतर रेडिओ ऐकतों. आपण या, आपल्याला ऐकवीन—खूप रेकॉर्ड्स आहेत—

**मेनका :** अग कपाटं भरलीं आहेत नुसतीं रेकॉर्ड्सनीं—सुरू आपला चोवीस तास रेडिओग्रामपुढें बसलेला असतो माना हलवीत. आहा—आहा—आहा करीत. काय त्यांत एवढं असतं कुणाला ठाऊक—आतां आमचं लग्न झालं ना, तेव्हांपासून घराबाहेर पडायला लागला—

**दिदी :** बाहेर जायला आवडत नाहीं तुम्हांला?

**सुरेश :** नाहीं—रागावूं नका हं—आतां देखील हिनं आग्रह केला ना म्हणून निघालों—वाटेंत इथं आलों—

**दिदी :** कुठं निघालां आहांत तुम्ही?

**मेनका :** इश्य—कमाल करतेस तूं—अग लग्न झाल्यावर कुठं जातात?

**बेबी :** आम्हांला काय ठाऊक—आमचीं कुठं लग्नं झालीं आहेत?

**मेनका :** इश्य!—अग हनीमूनला—बंगलोरला! शेठसाहेब म्हणत होते स्वित्झरलंडला जा. पण स्वित्झरलंड म्हणजे किती लांब नाहीं का ग दिदी!—आणि आल्प्स पर्वतावर पुन्हा सारखं बर्फ पडतं म्हणे! जॉग्रफींत नव्हतं का आपल्याला?

**बेबी :** होतं!! स्वित्झरलंडला जायची संधि येऊन गेली नाहींस तूं?

**सुरेश :** तुम्हांला प्रवास आवडतो वाटतं!—पण हा पॅलेस् इतका छान आहे—आणि युवर हायनेस्, आपण इतक्या छान सोई केल्या आहेत—केवढी मोठी भिंत आहे चारी बाजूला—त्यामुळें कुठंहि बाहेर जावंसं वाटत नसेल कुणाला—नाहीं का युवर हायनेस्—

**महाराज** : हं! मी जातों जरा. आणि मेनका, जास्त बोललं तर दिदीला त्रास होतो बरं का—

**मेनका** : किती काळजी घेतां तुम्ही दिदीची अंकल्! नाहीं तर आमचे फादर! रेसच्या घोड्यांखेरीज दुसऱ्या कशाची काळजी नाहीं त्यांना!—अंकल्, तुमचे ते सख्खे धाकटे भाऊ असून एवढा कसा हो डिफरन्स्? —खरंच मला तुमच्यासारखे फादर मिळायला हवे होते—तुम्ही कसे अगदीं फादरसारखे फादर वाटतां.—आमचे फादर काय, रागावणं नाहीं, चिडणं नाहीं—आमच्यापेक्षां तेच जास्त दंगा करतात. खरं सांगूं का अंकल्, माझ्या एकाहि लग्नाला ऑपोझिशन् केलं नाहीं त्यांनीं, कुणाचंहि नांव सांगितलं तरी म्हणायचे गो अहेड्! एकदां बरं का अंकल्, मीं गंमत केली त्यांची—

**महाराज** : हं—(जायला निघतात. मेनका त्यांच्या कोटाला धरून त्यांना थांबवते.)

**मेनका** : वा वा—ही जोक ऐकल्याशिवाय मी नाहीं जाऊं देणार तुम्हांला —ही जोक छान आहे नाहीं का रे सुरू—

**सुरेश** : ही जोक छान आहे युवर हायनेस्—कुठली ग?

**मेनका** : अरे ती पट्टेवाल्याची—परवां मीं क्लबांत सांगितली ती—सगळ्यांच्या हसून हसून मुरकुंड्या वळल्या बरं का—(हसायला लागते.)

**बेबी** : तूं काय हसतेस? तूं जोक सांग ना—मग आम्ही हसूं—

**मेनका** : पण खरंच छान आहे हं जोक—काय झालं—आमचे बापू—तुमचे ब्रदर—आमच्यांत कांहीं इंटरेस्ट नाहीं त्यांना—त्यांना इंटरेस्ट रेसिसमध्यें आणि ममीला रमींत!—मी कुठल्याहि मुलाशीं लग्न करायला निघालें तरी ऑपोझिशन नाहीं—(बेबी महाराजांकडे पाहते.) त्याच वेळीं ह्याची माझी ओळख झाली—कुठें आठवते का तुला सुरू—

**सुरेश** : हो—(तो दिदीकडे पाहात असतो.)

**मेनका** : तुझं लक्षच नाहीं माझ्या जोककडे—

**सुरेश** : आहे कीं—

**मेनका** : मीं काय केलं—ह्यांचा पट्टेवाल्याच्या वेषांत फोटो काढला—आणि

२३८०५ ५।७।९०
सि. नाटक


बापूंना सांगितलं—कीं मी त्याच्याशीं लग्न करणार आहे—तशीं बापू म्हणाले—गो अहेड्!—पण मीं म्हटलं बापू हा पट्टेवाला आहे—तशीं बापू काय म्हणाले ठाऊक आहे का?—सांगा बघूं अंकल् बापू काय म्हणाले असतील तें—

**महाराज :** हें पाहा, तुला काय सांगायचं तें लवकर सांगून टाक!

**मेनका :** रागावलांत ना अंकल्! बापूंनीं असंच चिडावं म्हणून मीं केलं होतं—पण बापू कसले खट! म्हणाले, आयुष्यांत कोणाचा घोडा केव्हां विनमध्यें येईल हें सांगतां येत नाहीं!

**बेबी :** मग?

**मेनका :** अय्या, मग काय? हीच जोक! अंकल्, आवडली नाहीं तुम्हांला? मग ती लेडीज क्लबांतली सांगूं का?—ती फारच फनी आहे!

**महाराज :** (तिला एकदम बाजूला करतात.) थँक्यू!! (निघून जातात.)

**बेबी :** (मेनकेला मिठी मारून) माझी बाई ग ती!

**मेनका :** अग अग हें काय—माझी सगळी हेअरस्टाईल बिघडवलीस बघ!

**बेबी :** मेनकाताई, यू आर ग्रेट—सिम्प्ली ग्रेट! सांग, लेडीज क्लबांतली जोक सांग—विमेन्स क्लबांतली जोक सांग—तुझ्या प्रत्येक जोकला आम्ही पोट धरधरून हसूं—

**सुरेश :** चला—आपण ह्यांना खूप त्रास दिला—यांची प्रकृति बरी नाहीं ना युवर हायनेस्?

**मेनका :** मला कशाला युवर हायनेस् म्हणतोस?

**सुरेश :** तोंडांत बसलंय्!—आपण विश्रांति घ्या—आणि बऱ्या झालांत म्हणजे मुंबईला या—

**बेबी :** का हो सुरेश, मुंबईला कुठं आहे तुमचा बंगला?

**सुरेश :** कुठला युवर हायनेस्?

**मेनका :** सुरू!

**सुरेश :** अग पण तोंडांत येतं त्याला मी काय करूं?—बरं का, हिनं मला इथं येतांना इतकी भीति घातली होती कीं राजवाड्यांत असं वागायचं, असं

बोलायचं, तसं वागायचं—आणि स्वतः मात्र क्लबांत वागते तशीच वागते—इथं देखील—

**मेनका** : अरे पण मी वागलें तर चालेल—आमचं रॉयल् ब्लड आहे—तुझं ब्लड् रॉयल् कुठं आहे—

**बेबी** : जाऊं दे ग तें रॉयल् ब्लड ! सुरेश, तुम्ही कांहीं संकोच करूं नका हो ! आतां पपा बाहेर गेले ना—आमचं सगळ्यांचं ब्लड काढून घेतलंय त्यांनीं ! हं—सांगा तरी आम्हांला—मुंबईला कुठं बंगला आहे तुमचा—

**सुरेश** : आठ बंगले आहेत आमचे !

**मेनका** : आठ कुठले ? दहा !—

**सुरेश** : पण आम्ही हल्लीं जुहूच्या बंगल्यांत राहतों—

**दिदी** : जुहू ! सुंदर समुद्रकिनारा आहे नाहीं तिथं ?—छान नारळीचं बन—पावसाळ्यांत लाटा उंच जात असतील नाहीं ?

**सुरेश** : खिडक्या आम्ही बंद ठेवतों ! मला फारसा नाहीं आवडत समुद्र ! फक्त मला समुद्राचा आवाज आवडतो—

**बेबी** : तुम्ही समुद्रांत पोहायला जात नाहीं ?

**सुरेश** : छे !—

**बेबी** : कां ? भीति वाटते ?

**सुरेश** : नाहीं—पण मला नाहीं आवडत युवर हायनेस्—

**मेनका** : सुरू—आतां पुन्हा युवर हायनेस् म्हणालास तर मी एकटी जाईन हं हनीमूनला ! सांगतें ! तूं बस आपला रेडिओग्राम लावून गाणीं ऐकत.

**दिदी** : इतकं आवडतं संगीत तुम्हांला ?

**सुरेश** : हो खूप आवडतं—पण ऐकायला हं—असं वाटतं—

**मेनका** : तें कां ? तो गातो देखील.

**दिदी** : मेनका—आतां त्यांना बोलूं दे ना—हं काय वाटतं ?

**सुरेश** : असं वाटतं कीं सभोंवतीं गाण्याच्याच भिंती असाव्यात आणि त्यांत आपण बसावं—टबमध्यें आंघोळीला बसतों ना तसं—

**दिदी :** पण तुम्हांला असं मुक्त हिंडावं आणि गात सुटावं असं नाहीं वाटत?

**सुरेश :** नाहीं! हिंडायला नाहीं आवडत मला—सुरांचं पांघरूण घ्यावं आणि गपचूप आंत पडून राहावं असं वाटतं!

**बेबी :** दिदी, कल्पना चांगली आहे नाहीं ह्यांची—

**सुरेश :** कल्पना बिल्पना मला कांहीं कळत नाहीं हं!—पण मला सूर पाहात बसायला आवडतं—कसे छान उदबत्तीच्या धुरासारखे जातात—माझ्याशीं बोलतात देखील—

**मेनका :** नॉन्सेन्स्—दिदी, लक्ष देऊं नकोस हं तूं त्याच्या बोलण्याकडे! लहानपणापासून श्रीमंती लाडांत वाढला—लाइफ म्हणजे काय तें ठाऊकच नाहीं त्याला.

**दिदी :** (हसत) आणि तुला ठाऊक आहे!

**मेनका :** पण सूर ह्याच्याशीं बोलतात म्हणजे काय! असं कधींकधीं वेड्या-सारखं बोलतो—

**दिदी :** (अत्यंत आस्थेने) काय बोलतात सूर तुमच्याशीं?

**सुरेश :** (त्याला तिच्या स्वरांतल्या जिव्हाळ्यानें धीर येत चालला आहे) काय सांगूं तुम्हांला? मला सांगतां येणार नाहीं! पण सूर माझ्या पाठीवरून हात फिरवून मला झोपवतात—सकाळीं गालांवरून बोटांची अशी चाळवाचाळव करतात आणि जागंहि करतात—मोठे लुचे असतात हे सूर—पण कांहीं सूर चांगले असतात हं. (दरबारीची जराशी आलापी करतो.) हे पाहा कसे गंभीर आहेत. पण धानीचे सूर अगदीं ह्याच्या उलट—अगदी खट्याळ—(धानीचे उडते स्वर घेतो.) ह्यांच्याकडे (बेबीकडे पाहात)—ह्यांच्याकडे पाहिलं ना मीं तेव्हां मला धानीची आठवण झाली—धानीचा स्वभाव आणि ह्यांचा स्वभाव सारखा वाटला मला...

**बेबी :** सुरेश—बरेच आहांत कीं हो! आणि मेनकाताईला पाहिल्यावर काय वाटलं होतं हो तुम्हांला?

**सुरेश :** तिला मीं सांगितलं होतं—पण तिला राग आला—पुन्हा रागावेल ती माझ्यावर—

**बेबी :** ए रागवायचं नाहीं ग—सांगा ना—

**सुरेश :** नको !—सांगू कां ग ?

**मेनका :** सांग !

**सुरेश :** ही कीं नाहीं—मला सिनेमांतल्या गाण्यासारखी वाटली—(दिदी आणि बेबी हसतात.)

**बेबी :** मग लग्न कसं केलंत हिच्याशीं ? का सिनेमांतलीं गाणीं सुद्धां आवडतात तुम्हांला—

**सुरेश :** स्वर सगळेच चांगले असतात. शब्द कधीं कधीं घाण करतात—स्वर म्हणजे पाण्यासारखे असतात—त्यांत तुम्ही मीठ घातलंत तर खारट, साखर टाकलीत तर गोड—

**दिदी :** बरोबर आहे, बरोबर आहे सुरेश ! खारट शब्द—गोड शब्द—कडू शब्द—तेच करतात सगळी—किमया.

**बेबी :** सुरेश, आमची दिदी कशी वाटली हो तुम्हांला ?

**दिदी :** हें ग काय बेबी—ज्योतिषी आला कीं सगळेच आपला हात दाखवत सुटतात तसं चालवलंयस तूं—

**मेनका :** आतां का ? मला सिनेमांतल्या गाण्यासारखी म्हणाला तेव्हां हसली होतीस—सांग रे सुरू—ही कशी वाटली—

**सुरेश :** हें काय ग—

**दिदी :** नको ग त्यांना त्रास देऊं—

**मेनका :** सुरू, सांग ना दिदी कुठल्या रागासारखी वाटली—

**सुरेश :** सांगूं ?

**बेबी :** सांगा—

**सुरेश :** आसावरीसारखी—(कोमल रिखबाच्या आसावरीचे स्वर घेतो.) वास्तविक आतां आळवणं बरोबर नाहीं—

**दिदी :** कां ?

**सुरेश :** आतां आसावरीची वेळ संपत आली—

**बेबी :** (घड्याळांत पाहते.) अगबाई—मला गेलं पाहिजे—

**मेनका** : कुठें ?

**बेबी** : अडाण्याला भेटायला—

**सुरेश** : अडाण्याला ?

**बेबी** : हो !

**सुरेश** : पण नांवावरून जाऊं नका हं ! अडाण्याची भरारी केवढी प्रचंड असते ! (अडाण्यांतली तान घेतो.)

**बेबी** : अशीच आहे त्याचीहि भरारी—बराय् मेनकादेवी—टाटा—बेस्ट ऑफ् लक्—दिदी—गुड् बाय्—(पळत जाते.)

**सुरेश** : धानी—बरोबर धानी—(धानीचे उडते स्वर घेतो.) बरोबर अशी—अशी गेली—

**मेनका** : दिदी, आम्हांलाहि गेलं पाहिजे—चल सुरू.

**दिदी**—मेनका, ह्यांना संभाळ हं नीट—फार मोठा माणूस आहे तुझ्या हातांत—

**सुरेश** : मी मोठा माणूस ?—दिदी, तुम्ही देखील चेष्टा करायला लागलां माझी, असावरी चेष्टा नाहीं करीत—

**दिदी** : चेष्टा नाहीं सुरेश ! कुणालाहि हेवा वाटावा असं भाग्य आहे तुमचं—

**मेनका** : सत्तर लाख कॅश म्हणजे खरंच लकी नाहीं का ग ?

**दिदी** : अग ते सत्तर लाख ओवाळून टाकावे असलं भाग्य आहे याचं...

**सुरेश** : काय म्हणतां तुम्ही हें दिदी—

**दिदी** : होय सुरेश—स्वरांचा हा साक्षात्कार म्हणजे परमेश्वराचा साक्षात्कार...अहो पैशानं सारं कांहीं विकत घेतां येतं असं उगीच वाटतं आपल्याला. पण स्वरांची ही सोबत पैशांनीं नाहीं घेतां येत. फार मोठा ठेवा आहे तुमच्याजवळ—मेनका, खूप आनंद झाला मला तुझ्या लग्नानं. हें बघ, बायकांच्या जातीला फार जबाबदाऱ्या उचलाव्या लागतात—मुलगी म्हणून जन्म घ्यायचा, बायको म्हणून दुसऱ्या घरीं जायचं आणि आई म्हणून सगळ्यांना सांभाळ करीत बसायचं—सुरेश, आमची मेनकाहि चांगली चांगली आहे हो—तुम्हांला खूपखूप सुखांत ठेवील, छान सांभाळील.

**मेनका** : अग सांभाळावंच लागणार आहे ह्याला. लहानपणापासून एकटाच आहे हा. "ओनली सन ऑफ् हिज फादर." खूप लहानपणीं वारली ह्याची आई. नोकराचाकरांनीं सांभाळलं ह्याला—

**दिदी** : नोकरांनीं नाहीं सांभाळलं मेनका—सुरांनीं सांभाळलंय् ह्यांना. त्या सुरांसारखं तूंहि सांभाळ आतां—

**सुरेश** : येतों हं. तुम्ही बसा. युवर हायनेसचा निरोप घ्यायला हवा ना—नाहीं तर रागावतील ते—

**दिदी** : जा तुम्ही—मी सांगेन पपांना—

**सुरेश** : थँक्यू. आणि बोलतांना माझं चुकलं असेल तर क्षमा करा हं—लहानपणापासून एकटा—अगदीं एकटा वाढलोंय मी—माणसांत आलों कीं मला बिचकल्यासारखं होतं—

**दिदी** : पण मेनका करील तुम्हांला तयार. पुढल्या खेपेला याल त्यावेळीं खूप गाऊन दाखवा मला—गोड आहे तुमचा आवाज—

**सुरेश** : पण तुम्हांला ठाऊक आहे, मी अनोळखी माणसांपुढें असा आजच गायलों—

**दिदी** : कुठेंहि गा सुरेश, कुणाहि पुढें गा—स्वातीच्या पाण्यासारखं बरसत राहावं कलावंतानं—एखाद्या आसुसलेल्या रसिकाच्या अंतःकरणांत मोत्याचं वैभव निर्माण होईल—

**सुरेश** : आहाहा—कसं छान तंबोरा छेडल्यासारखं बोलतां तुम्ही! तुम्हांला सुद्धां चालतां यायला हवं होतं—वास्तविक देवानं मला पांगळं करायला पाहिजे होतं—मग मी चार भिंतींच्या आड गात बसलों असतों—

**दिदी** : छे छे छे! चार भिंतींच्या आड राहायचे विचार सोडून द्यायला पाहिजेत सुरेश! चार भिंतीच काय चार दिशा फोडून स्वर गेले पाहिजेत...

**सुरेश** : छे हो!—एवढं गाणं कुठें येतंय् मला!...तसले स्वर लावणारीं माणसं फार फार थोर होतीं—

**मेनका** : पुरे हं आतां—तूं एक वेडा आणि ही दिदी सात वेडी...

**सुरेश** : बराय–येतों मी. विसरूं नका मला...आणि मीहि विसरणार नाहीं

तुम्हांला—आसावरी विसरणार नाहीं. मी—(आसावरीचे संथ आलाप घेतो.) अशा अशा लक्षांत राहाल तुम्ही माझ्या...

**दिदी :** थांब हं मेनका—अरे आंत कोण आहे...(टीपॉयवरची बेल वाजवते.) सारजाबाई—

**मेनका :** काय हवं तुला दिदी—

**दिदी :** थांब हं—(एक एक पाऊल टाकीत जाऊं लागते.)

**मेनका :** मी धरूं का दिदी—

**दिदी :** छे छे—अग मलाहि आतां च्याल च्याल करतां यायला लागलं आहे—बस हं...

**सुरेश :** आहाहा—(आसावरीचे आलाप घेतो.) कशी संथ आलापीसारखी गेली आसावरीच्या.

**मेनका :** बिचारी ! पायांनीं धड असती तर राजाची राणी झाली असती !

(आंतून दिदी कुंकवाचा करंडा आणि खण घेऊन येते.)

**दिदी :** (मेनकेला कुंकूं लावीत) अग सुवासिनी तूं—तुला कुंकूं नको का लावायला जातांना—

(तिला खण देते.)

**मेनका :** हें काय दिदी......

**दिदी :** (तिच्याकडे लक्ष न देतां) ममीच्या कुंकवाचा करंडा आहे हा—किती वर्षांनीं मी त्या खोलींत गेलें आज—

**मेनका :** पण दिदी, हा खण कशाला ? अंकल्नीं हजार रुपये पाठवले होते ना प्रेझेंट म्हणून—

**दिदी :** अग तें प्रेझेंट होतं वेडे—ही ओटी आहे. (मेनका तिला वाकून नमस्कार करते. सुरेश नमस्कार करतो.) हें काय बरं सुरेश—

**सुरेश :** गावंसं वाटलं तर गायला पाहिजे ना मी दिदी—मग नमस्कार करावासा वाटला आणि मीं नमस्कार केला—बरोबर आहे कीं नाहीं ग मेनका—

**मेनका :** बरोबर आहे—दिदी, भलती शिकवण दिलीस हं ह्याला ! ह्याल आतां आणखी काय करावंसं वाटेल देव जाणे ! (सुरेशला) चल्य कलावंत

येतें ग दिदी—(दोघेंहि जातात. दिदी कसल्या तरी तंद्रींत दाराकडे पाठ करून उभी राहते.)

**दिदी** : मी आसावरी—मग तूं...तूं कोण आहेस रे संजय? तूं मल्हार आहेस! पावसासारखा आलास आणि निघून गेलास...

**संजय** : (आंत येत) हेमा—

**दिदी** : कोण संजय!—नको नको संजय—(हळू हळू चालत नेहमींच्या खुर्चीवर येऊन बसते.)

**संजय** : काय नको?

**दिदी** : संजय—कां आलांत पुन्हा?—जा जा संजय—

**संजय** : जाण्यासाठीं आलों नाहीं मी हेमा—आणि जायचंच ठरलं—तर जातांना एकटा नाहीं जाणार मी—

**दिदी** : तें शक्य नाहीं.

**संजय** : आतां काय अशक्य आहे? किती? अठ्ठेचाळीस पावलं चाललीस ना तूं आज?

**दिदी** : कुणीं सांगितलं तुम्हांला?

**संजय** : ज्यांनीं तुझ्या पायांत त्राण आणलं त्यांनीं! डॉक्टरांनीं स्वतः सांगितलं मला...

**दिदी** : तें त्राण तुम्हीं आणलंत संजय. तुम्ही आलांत आणि येतांना चैतन्य घेऊन आलांत...

**संजय** : आणि त्या चैतन्याला परत जा म्हणून सांगतेस? वा! चैतन्याशीं वागायची ही रीत नव्हे. मीं त्या चैतन्याचं स्वागत केलं असतं—त्याला कांहीं चहा वगैरे दिला असता—

**दिदी** : तुमच्याशीं बोलायचं म्हणजे वादळावर फुंकर घालण्यासारखं आहे—

**संजय** : ठीक आहे—मग राजकन्ये, काय आज्ञा आहे?

**दिदी** : ऐका माझं संजय—

**संजय** : काय ऐका?—'इथून जा' हेंच ना—आणि तूं राहणार इथें—

ह्या तुरुंगांत—आणि असंच स्वतःला कोंडून घेऊन आयुष्य काढणार—आणि आयुष्य काढणार म्हणजे काय करणार ? मरणाची वाट पाहणार—

**दिदी** : नाहीं संजय—आतां मरणाची कां वाट पाहीन मी ?

**संजय** : खोटं बोलते आहेत तूं.

**दिदी** : हें काय बरं संजय! आज थोडंसं चालतां यायला लागलं म्हणजे मी कांहीं पूर्ण बरी नाहीं झालें.

**संजय** : मी थांबेन. पांच वर्षे थांबेन—दहा वर्षं थांबेन—पण हेमा, मी निश्चय करून आलों आहें—

**दिदी** : निश्चय ?

**संजय** : हो निश्चय!—माझं प्रेम आहे तुझ्यावर आणि मी लग्न करणार आहें तुझ्याशीं—

**दिदी** : (तिला हा धक्का सहन होत नाहीं. ती अत्यंत व्याकुळ होते.) स्वप्नांच्या जगांतून जरा तरी जमिनीला पाय लावा संजय,—तुम्हीं माझ्यावर प्रेम केलंत—माझ्या योग्यतेपेक्षांहि खूप मला मिळालं—पण लग्न हा व्यवहार आहे, संजय. व्यवहाराला जगाचे कायदे लागतात. तिथं अपेक्षा असतात त्या अगदीं रुक्ष—गणिताच्या भाषेतल्या. काव्याच्या नव्हे !

**संजय** : शेवटीं सगळा शून्याचाच हिशेब आहे—गणिती काय आणि कवि काय, शेवटीं शून्यांतच पाहणारे. पण त्या शून्याला आपण अर्थ द्यायचा असतो.

**दिदी** : केवढा प्रचंड आत्मविश्वास आहे तुम्हांला—पण संजय, इतके बेसावध नका राहूं—मी ही अशी अपंग—लग्न ही माझ्या आयुष्यांतली एक अशक्य गोष्ट आहे, संजय—

**संजय** : काय बोलते आहेस हेमा हें ?

**दिदी** : संजय, भावनेच्या भरांत इतके नका वाहून जाऊं—

**संजय** : भावनेच्या भरांत वाहून जाणारा लेचापेचा कवि नाहीं मी, हेमा—आकाशांतले तारेदेखील जमिनीवर घट्ट पाय रोवून पाहतों मीं—हेमा, तूं बोलायला लावलंस म्हणून सांगतों—ह्या हातांनीं मीं कांहीं फक्त कविताच

लिहिल्या नाहींत. इमानाची भाकरी कमवतां येते ह्या हातांना—कशाला घाबरतेस हेमा—दारिद्र्याला?

**दिदी :** छे छे!

**संजय :** चांदण्याच्या पिठांच्या भाकऱ्या करतां येत नाहींत—मलाहि कळतं पण म्हणून डोळ्यापुढें स्वप्नं ठेवायचींच नाहींत कीं काय? कोणाला भितेस हेमा? तुझ्या पपांना?—पत्त्यांतल्या राजाएवढी देखील किंमत राहिलेली नाहीं त्यांना—त्यांना भितेस?

**दिदी :** मी कुणालाहि भीत नाहीं, संजय—

**संजय :** हें कृतीनं सिद्ध कर.

(जिन्यांतून 'दिदीऽऽ' ओरडत प्रताप आणि राजेंद्र येतात.)

**राजेंद्र :** गुड् न्यूज्! (संजयला पाहून) ओ—

**दिदी :** काय झालं?

**प्रताप :** संजय, तुमचा पायगुण भलताच जबर आहे हो—

**दिदी :** काय झालं?

**प्रताप :** एक अत्यंत आनंदाची बातमी सांगण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे!

**संजय :** आनंदाची बातमी सांगण्याचा प्रसंग येऊन ठेपत नसतो—

**प्रताप :** अत्यानंदामुळें शब्दरचनेंत थोडा गोंधळ झाला आहे. शब्द-सृष्टीच्या ईश्वरांनीं क्षमा करावी—दिदी, इतका भाग्याचा दिवस आजवर आला नव्हता—

(दिदी आणि संजय एकमेकांकडे पाहतात.)

**दिदी :** अरे, काय म्हणायचंय तुला प्रताप?

**प्रताप :** मला कांहींच म्हणायचं नाहीं—ही पपांची चिठी—त्यांना काय म्हणायचंय तें ऐका—'मुंबईला जात आहें, पंधरा दिवसांनीं परत येईन!'

**प्रताप आणि राजू :** (मुक्त कंठानें ओरडतात.) हो......

# ३

*स्थळ तेंच—सकाळची वेळ—दिदीच्या खोलींत कोणी नाहीं—डॉक्टर येतात.*

**डॉक्टर :** दिदी—दिदीराजे—(दिदीच्या रिकाम्या खुर्चीकडे पाहतात, अर्धवट स्वत:शींच पुटपुटल्यासारखें बोलतात)—अजून आलेली दिसत नाहीं परत. ...(दिदीच्या खुर्चीजवळच्या तिपाईवरून एक पुस्तक उचलतात—)

"Here, with a loaf of bread beneath the bough
A flask of wine, a book of verse and Thou
Beside me singing in the wilderness
And wilderness is Paradise now."

[मागल्या दरवाज्यांतून दिदी, राजेंद्र आणि प्रताप येतात. दिदीनें गरम कोट घातला आहे—तिच्या हातांत काठी आहे.]

**दिदी :** डॉक्टरकाका—

**डॉक्टर :** (हातांतलं पुस्तक बाजूला ठेवतात.) दिदी—फार लांबचा पल्ला गांठलेला दिसतोय आज.

**दिदी :** डॉक्टर—मी एकटी आलें जिना चढून (राजू तिच्या हाताला धरून बसवायला जातो.) नको राजू—मी थकलें नाहीं कांहीं—(नेहमींच्या खुर्चीवर न बसतां बाजूच्या खुर्चीवर बसते.)

**डॉक्टर :** कुठपर्यंत जाऊन आलां दिदी—

**दिदी :** रागावणार नाहीं ना तुम्ही ?

**डॉक्टर :** म्हणजे फार लांब गेल्यां होतां वाटतं—नो नो—उद्यांपासून फिरायची परवानगी बंद हां—

**दिदी :** नदीच्या घाटापर्यंत गेलों आम्ही—योगेश्वराचं दर्शन घेतलं—

**डॉक्टर :** ऑं—छे-छे-इतकं अंतर उगीच चाललांत एकदम—

**दिदी :** पण थकवा वाटला नाहीं मला डॉक्टर—मुळींच नाहीं—विचारा प्रतापला—राजू, थकलें का रे मी ?

**राजेंद्र :** नाहीं डॉक्टर—आणि डॉक्टर, किती लोक भेटले आम्हांला—बेंडा सावंताची आई भेटली होती.

**दिदी :** वेडी—बरं का डॉक्टर, अगदीं वेडी—खूप म्हातारी दिसायला लागली आहे—नाहीं ? तिनं कीं नाहीं माझी दृष्ट काढली—मीं कितीदां सांगितलं तिला पण ऐकेना—योगेश्वराच्या देवळांतल्या आबा भटजींना तरी काय आनंद झाला ! तीर्थ दिलं, प्रसाद दिला...वर आणखी धारोष्ण दूध दिलं प्यायला. वेडीं आहेत सगळीं माणसं—अजून जुन्या संवयी जात नाहींत त्यांच्या......

**डॉक्टर :** दिदी, राजवट बदलली म्हणून माणुसकी कशाला बदलायला हवी ?

**प्रताप :** पपांना नाहीं दिसत ही माणुसकी ! त्यांच्या दृष्टीनं गांवांतले लोक दीडशहाणे झाले आहेत—दिदी गांवांतनं चालत जात होती ना डॉक्टरकाका, तेव्हां नदीवरनं पाणी भरून घेऊन बायका येत होत्या त्या भेटल्या—त्यांनीं दिदीच्या पायांवर पाणी घातलं आणि स्वतःच्या पदरांनीं पाय पुसले दिदीचे—

**दिदी :** मला तर अगदीं काय करावं तें सुचेना—भारी भाबडेपणा आहे आपल्याकडे—

**डॉक्टर :** दिदी, किती वर्षांनीं पाय लागले तुमचे गांवाला—त्यांना खूपखूप आनंद झाला असेल—त्यांनीं व्यक्त तरी कसा करायचा तो ? मी एवढा मोठा डॉक्टर—फिजीशियन टु हिज रॉयल हायनेस—मला देखील तुम्ही चालायला लागलांत त्या दिवशीं, तेव्हां काय करावं तें सुचेना.

**दिदी :** म्हणून वेड्यासारखा नमस्कार केलात मला—मला इतकं ऑकवर्ड वाटलं त्या दिवशीं—

**प्रताप :** बाकी पपानीं असं हें गांवांतून आपल्याला हिंडतांना पाह्यलं असतं तर काय केलं असतं देव जाणे !

**राजेंद्र :** चला. उद्यांचा शेवटचा दिवस—दिवस कसे गेले कळलं नाहीं—परवांपासून पुन्हा बंदिवास सुरू—(बेबी येते.)

**बेबी :** दिदी—गांवांत गेली होतीस ना—

**दिदी :** तुला कसं कळलं—

**बेबी :** वा! सगळ्या गांवांत सेन्सेशन आहे—शिवाय आमच्या सासूबाई म्हणाल्या.

**डॉक्टर :** बेबीराजे, लग्न व्हायचंय अजून तुमचं—

**बेबी :** म्हणजे बॅंडबाजा, ताशे वगैरे वाजायचे आहेत—वाजतील !

**प्रताप :** ही सगळ्यांत सुखी आहे.

**बेबी :** कशावरून ?

**प्रताप :** तुला स्वातंत्र्य केव्हांच मिळालं आहे—

**बेबी :** स्वातंत्र्य मिळत नसतं मिस्टर, मिळवावं लागतं—संस्थान असतं तर पपांनीं दहा वेळा फांशीं दिलं असतं मला—

**दिदी :** काय बोलतेस हें बेबी ?

**बेबी :** तुला नाहीं पटायचं हें दिदी—तूं कांहीं झालं तरी पपांची लाडकी लेक आहेस—आमची गोष्ट निराळी आहे—होय कीं नाहीं डॉक्टर—

**डॉक्टर :** तुमची गोष्ट जगावेगळीच आहे—तुम्हांला मुळीं ब्रह्मदेवानेंच स्वतंत्र करून पाठवलंय—त्याला हिज हायनेस काय करणार ?

**बेबी :** डॉक्टर, पण ज्याचं आपल्यावर प्रेम नाहीं त्याच्यावर आपण कां म्हणून प्रेम करावं ? पपांना मी आवडत नाहीं आणि मला पपा आवडत नाहींत—अगदीं बाळपणापासूनचं वैर आहे आमचं—लहानपणीं तर मला पपांनीं एकदां हंटरनं फोडून काढलं होतं.

**दिदी :** चल् बेबी.

**बेबी :** चल् काय ? मी नाहीं विसरणार तो प्रसंग. आपल्या वाड्याची दुरुस्ती चालली होती—आणि दुपारच्या वेळीं मजूर भाकरी सोडून खात बसले होते—आम्ही गेलों तिथें—खरपूस बाजरीची भाकरी, लाललाल लसणाचा ठेचा आणि कांदा पाहिला आणि चक्क मागितली मीं भाकरी—पहिला घास घेतला आणि ब्रह्मांड आठवलं मला—नाकाडोळ्यांतून पाणी वाहायला लागलं—तेवढ्यांत हिज हायनेस हजर तिथें—पहिला हंटर गेला

त्या मजुराच्या पाठीवर आणि दुसरा राजकन्येच्या—पपांचं रॉयल ब्लड ना ? खवळलं तें ! त्यांना पटणंच शक्य नाहीं—

**प्रताप** : मग आतां बंडा सावंताच्या घरीं तर कांदाभाकर आणि लसणीचा ठेचाच कीं !

**राजेंद्र** : असं—म्हणजे लहानपणची अर्धवट राहिलेली इच्छा पुरी केलीस वाटतं.

**बेबी** : अरे, मी भाकरी करायला देखील शिकलें.

**दिदी** : पण बेबी—खरंच तुझं बंडावर एवढं प्रेम आहे ?

**बेबी** : अग तूं पाहिलं नाहींस त्याला ! एम्. ए. ला फर्स्ट क्लासमध्यें आलाय तो. मुंबईला त्याच्याच कॉलेजमध्यें प्रोफेसर झाला असता. तें सोडून नंदनवाडींत आलाय लोकसेवा करायला—कसली लोकसेवा करणार आहे देव जाणे. पण आजतरी हजारों माणसं मंत्रमुग्ध होतात तो बोलायला लागला कीं.

**राजेंद्र** : तुझ्यासमोर तोंड उघडायची बिशाद नसेल त्याची—

**बेबी** : कां ?

**राजेंद्र** : तूं बोलूं देतेस त्याला ?

**बेबी** : दिदी, पाहिलंस ह्या तुरुंगांत राहून बालकं कशीं अज्ञान राहिलीं आहेत तीं ?

**राजेंद्र** : काय झालं—

**बेबी** : मुला, प्रेमाच्या राज्यांत तोंड उघडण्यापेक्षां तोंड मिटण्याला किंमत अधिक असते—होय कीं नाहीं डॉक्टर—

**डॉक्टर** : अरे माझी म्हाताऱ्याची उगीच कशाला साक्ष काढतां ? .....

**दिदी** : मीं लहानपणीं पाहिलं होतं त्याला. तुम्हीं पाहिलंय डॉक्टर त्याला ?

**डॉक्टर** : वा—परवां बेबी राजांनीं इंट्रोडक्शन करून दिली ना—गुड बॉय—पण हिज हायनेसना कसं काय पटणार देव जाणे—

**बेबी** : पपांना मीं केलेली कुठलीच गोष्ट पटणार नाहीं—दिली परवानगी तर ठीक आहे—नाहींतर घरांतून जायची राजाज्ञा दिवसांतून दहा वेळां होत असते—एक दिवस अबाउट टर्न करायचं आणि—

(गिरकी घेते. दारांतून नोकर येतांना दिसतो—त्यानें तबकांतून पत्र आणलें आहे. बेबी तें पत्र घेते. नोकर जातो.)

**बेबी** : हेमलतादेवी—तुमचं पत्र—

**दिदी** : माझं—

**बेबी** : हो! पण......(अक्षर पाहत) पपांचं दिसतंय—

**राजेंद्र** : ह्या टाळी डॉक्टर—मुक्काम लांबला—

**दिदी** : (पत्र वाचूं लागते—तिचा चेहरा एकदम उतरतो. थकल्यासारखी नहमींच्या खुर्चीवर जाऊन बसते.)

**बेबी** : दिदी, काय झालं ग?

(दिदी तिला पत्र देते.)

**प्रताप** : दिदी वाच ना पत्र—

**डॉक्टर** : मी रजा घेऊं का?

**दिदी** : नाहीं—बसा डॉक्टर—

**बेबी** : "अनेक आशीर्वाद, आम्ही ज्या कामासाठी मुंबईला आलों तें काम झालें आहे. गेले कांहीं दिवस तुझ्या प्रकृतींत सुधारणा झाल्यासारखें वाटत होतें. प्रकृति अधिक झपाट्यानें सुधारली पाहिजे. मुंबईत कांहीं डॉक्टरांशीं आम्हीं चर्चा केली. त्यांनीं लंडनला जाण्याचा सल्ला दिला आहे. तेथें अधिक चांगले उपचार होतील. पुढल्या महिन्यांत आपण सर्वजण इंग्लंडला जाण्यासाठीं निघत आहों. कमींत कमी दोन वर्षें तरी तिथें राहावें लागेल, असें डॉक्टरांचें मत आहे. आम्हांला आतां कुठेंहि राहिलें तरी सारखेंच आहे. प्रताप, राजेंद्र आणि बेबी यांनाहि प्रवासाची आवड आहेच. त्यांना ही आनंदाची बातमी सांगावी"—(भयंकर चिडून चोळामोळा करून पत्र फेकते.) आनंदाची बातमी! मी साफ सांगतें दिदी, मी इंग्लंडला जाणार नाहीं—आणि माझं ऐकायचं असेल तर तूंदेखील जाऊं नकोस—प्रताप आणि राजूला जाऊं दे—

**राजेंद्र** : कां म्हणून?

**बेबी** : कां म्हणून? पपांच्या पांगुळगाड्याशिवाय कोलमडून पडाल तुम्ही.

**प्रताप** : कशावरून ?

**बेबी** : इतके दिवस ह्या वाड्यांत गपचूप राहिलांत त्यावरून सांगतें मी—वास्तविक बंडाचं निशाण उभं करायला हवं होतं, तें तुम्ही.

**राजेंद्र** : करूं.

**बेबी** : केव्हां ? म्हातारपणीं ? मला देवानें पुरुषाच्या जन्माला घातलं असतं तर केव्हांच धडा शिकवला असता मीं पपांना—

**प्रताप** : मग सध्यां चालवलं आहेस तें काय आहे असं म्हणणं आहे तुझं ? पपांना जवळजवळ रोज एक नवा धडा देत असतेस तूं—

**राजेंद्र** : वास्तविक पपांनीं तुला शिकवणीचे पैसे द्यायला हवेत—

**बेबी** : हें एकदां पपांच्या पुढें बोल ना—

**राजेंद्र** : बोलेन—

**बेबी** : केव्हां ?

**राजेंद्र** : ऐकशील तूं—

**बेबी** : त्या दिवशीं भाऊबीज नसली तरी ओवाळीन मी तुला—

**राजेंद्र** : आणि मी देखील हक्काच्या कमाईची ओवाळणी घालीन तुला—

**डॉक्टर** : कशीं फटाके उडवल्यासारखीं बोलताहेत पाहा दिदीराजे—दिदीराजे—कसल्या विचारांत पडलां आहांत तुम्ही—

**दिदी** : कसल्याहि नाहीं डॉक्टर ?

**डॉक्टर** : दिदी, एवढं काय मनाला लावून घेतां ?

**दिदी** : डॉक्टर, तुम्ही विचारतां हें ?

**डॉक्टर** : हो, मीच विचारतों ! दिदी, आयुष्यांत खरा निर्णय घ्यावयाचा प्रसंग एखाद्याच वेळीं येत असतो—त्यावेळीं तो नीट घेतां आला नाहीं तर सारं आयुष्य ब्रेक तुटलेल्या गाडीसारखं शेवटीं कुठल्या तरी खड्डयांत जाऊन पडतं—(कांहीं क्षण स्तब्धता.)

**बेबी** : डॉक्टर—तुम्ही कसल्या तरी विचारांत पडल्यासारखे दिसताय आतां—बाकी ह्या वाड्यांत विचार करणारी मंडळी फार झाली आहेत—छे, असल्या विचारी मंडळींत मला तर गुदमरल्यासारखं होतं—

**डॉक्टर :** बेबीराजे, तुम्हांला मागें मीं एकदां स्वित्झरलंडमधल्या एका नर्सची गोष्ट सांगितली होती—

**बेबी :** एकदां कां? पुष्कळ वेळां सांगितली होती—मादमाझेल् फ्लाविया! मीं तिच्या डोळ्यांत बोटं घातलीं होतीं—ती तुमच्याकडे मोसिये मोसिये करीत धावत आली होती—

**डॉक्टर :** आणि मग मीं तिची समजूत काढली होती—मीं तिची समजूत कशी काढली हें ऐकायचं होतं नाहीं का तुम्हांला? तुम्ही झालां आहात आतां तितकीं मोठीं! फ्लाविया...हं माफ करा हं दिदी—मी बसतों जरा—

**दिदी :** बसा ना डॉक्टर—तुम्हांला आम्हीं किती वेळां सांगितलं कीं दरबाराबरोबर दरबारी रीतिरिवाज गेले या वाड्यांतून—

**डॉक्टर :** थँक्यू—दिदी, मी निर्णयाबद्दल सांगत होतों नाहीं का? ही फ्लाविया मोठी वेडी होती—अगदीं वेडी—माझ्याशीं लग्न करायचं होतं तिला!

**दिदी :** डॉक्टर!

**डॉक्टर :** होय दिदी! वेडी मुलगी—तिचा बाप व्हायलिनिस्ट होता. आमचं लग्न ठरलं ना, त्या दिवशीं—मला घरीं घेऊन गेली होती ती—म्हाताऱ्यानं खूप प्रेमानं स्वागत केलं होतं माझं—एकुलती एक मुलगी इतक्या दूर देशीं माझ्याबरोबर येणार म्हणून व्याकुळ झाला होता म्हातारा—माझी भाषा कळत नव्हती त्याला—आणि त्याचंही फ्रेंच कळायला अवघड जात होतं मला—मग बरं का दिदी...त्याला कांहीं बोलायचं असलं, कीं आपलं व्हायलिन उचलायचा, माझ्याकडे पाहायचा...कसले तरी सुंदर स्वर काढायचा त्या व्हायलिनमधून...हसत हसत डोळे पुसायचा—आपल्या एकुलत्या एका लेकीच्या केसावरून हात फिरवायचा—त्याला काय सांगायचं होतं कोण जाणे—व्हायलिनमधून सांगायचा प्रयत्न केला त्यानं...मला कळलं होतं आणि कळत नव्हतंहि—माझा हात आपल्या मुलीच्या हातांत देतांना म्हाताऱ्याच्या निळ्या डोळ्यांतलीं आसवं त्याच्या पांढऱ्या शुभ्र दाढीवरून ओघळतांना मीं पाहिलीं...तो म्हातारा...ती संध्याकाळ...ते अश्रू...ती फ्लाविया...आणि ते व्हायलिनचे सूर...

**दिदी :** आणि मग?

**डॉक्टर :** आणि मग काय ?...तुम्हांला आज आलं ना, असंच एक पत्र मला आलं.

**दिदी :** कुणाचं ?

**डॉक्टर :** तुमच्या पपांचं ! महाराजांच्या परिवारांत मी एकटाच का होतों ? कुणींतरी महाराजांपर्यंत ही वर्दी पोहोंचविली आणि महाराजांनीं बंदी केली—

**बेबी :** कां पण ?...आणि डॉक्टर, तुम्हीं कां ऐकलंत महाराजांचं ?

**डॉक्टर :** रागावूं नका बेबीराजे ! मीं महाराजांचं ऐकलं नाहीं—हॉस्पिटल-मध्यें रुग्णशय्येवर मृत्यूचं आव्हान स्वीकारीत पडलेल्या तुमच्या ममींचं ऐकलं—महाराजांनीं पत्रांत दोनच ओळी लिहिल्या होत्या—नोकरीवरून जा आणि लग्न करा. आमचं लग्न ठरल्याचं सांगून मी ममींचा निरोप घ्यायला गेलों. माझ्याकडे ममींनीं पाहिलं आणि त्यांच्या डोळयांतून अश्रू वाहायला लागले—त्यांच्या क्षीण हातांना ते पुसण्याची देखील शक्ति नव्हती. ममी म्हणाल्या—डॉक्टर, तुम्ही गेलांत तर माझ्या पोरांना आई कुठली ? फ्लावियाचा म्हातारा बाप आनंदानं रडला होता—तुमची आई असहायतेनें रडत होती. मीं तीं असहाय आसवं पुसायचं ठरवलं आणि पुन्हा फ्लावियाला भेटलों. तो कसा ठाऊक आहे ?—तुम्हांला घेऊन—

**बेबी :** मला !

**डॉक्टर :** होय तुम्हांला ! एवढ्या एवढ्याशा होतां तुम्ही. एक प्रॅममध्यें घालून तुम्हांला फ्लावियाच्या घरीं घेऊन गेलों—तुमच्या हातांत फुलांचा एक गुच्छ दिला होता—गुच्छासकट तुम्हांला उचलून मीं आंत नेलं तेव्हां फ्लाविया म्हणाली होती—हे दोन गुच्छ कशाला आणलेत ? तुमच्या हातून तो गुच्छ मीं फ्लावियाला दिला आणि सांगितलं—फ्लाविया, मला हिची आणि हिच्या भावंडांची आई होऊन राहायचं आहे—आम्हां हिंदूंचा पुनर्जन्मावर विश्वास आहे—पुढल्या जन्मापर्यंत आपलं लग्न पुढं ढकललं पाहिजे आपल्याला —फ्लाविया संगमरवरी पुतळ्यासारखी एका जागीं खिळून उभी होती—आंतून फ्लावियाचा बाप व्हायलिनवर कसले तरी विलक्षण करुण स्वर काढीत होता—दॅट्स् ऑल, दॅट्स् ऑल्—

**बेबी** : लग्न या गोष्टीचा पपांना इतका कां तिटकारा—

**दिदी** : थांब बेबी—पण डॉक्टर, मला एका प्रश्नाचं उत्तर द्याल ?

(डॉक्टर नुसत्या मानेनं हो म्हणतात.)

**दिदी** : ममीच्या डोळ्यांतले असहाय अश्रू पुसण्याचा तुम्हीं निर्णय घेतलात त्याचं दुःख होतंय तुम्हांला ?—पश्चात्ताप होतोय ?

**डॉक्टर** : एक क्षणभरदेखील झाला नाहीं—सारं आयुष्य मीं एका तृप्तींत, समाधानांत काढलं. महाराजांनीं अनेक वेळां अपमान केला माझा—अनेक आपत्ती आल्या—गेल्या. मी अगदीं कोरा राहिलों. दिदी, तुमच्या ममींनीं मला आयुष्यांत केवढं मोठं प्रयोजन दिलं!—आपण कशासाठीं जगतों आहोंत याचं उत्तर देण्याचं भाग्य फार थोड्या लोकांच्या वांट्याला येतं! दिदी, मी पुरुष असून आई होण्याचं भाग्य मला लाभलं—तुमची आई म्हणून जगलों मी! तुमच्या चिमण्या विश्वांतलीं सुखदुःखं तुम्ही तुमच्या पपांशीं बोलला नाहीं कधीं—माझ्याशीं बोललांत! प्रतापराजे, राजूभय्या, बेबी, यांची मला काळजी वाटत नव्हती—मला काळजी वाटत होती ती तुमची—पण त्यांतून देखील मी आतां मुक्त झालों. आतां खरं सांगूं? मला माझी काळजी वाटायला लागली आहे. पांखरांसारखीं—भरभरभरभर हा पिंजरा सोडून तुम्ही सर्वजण जाणार आहांत—मग मात्र माझ्या आयुष्याला कांहीं प्रयोजन उरलं नाहीं. डॉक्टर! कशासाठीं जगतां आहां तुम्ही, असं जर कोणीं विचारलं—तर त्या प्रश्नाचं उत्तर राहिलं नाहीं आतां माझ्याकडे—

**दिदी** : प्रताप, राजू, बेबी जातील—पण मी कुठें जाणार डॉक्टर ?

**डॉक्टर** : तुम्हीहि जाल दिदी—गेलं पाहिजे तुम्हांला, गेलं पाहिजे, गेलं पाहिजे—(आवेगानें—मागल्या बाजूचा पडदा बाजूला करतात—तिथे महाराज उभे असतात. सर्वांना आश्चर्य वाटतं.)

**महाराज** : फारच अचानक आलों मी नाहीं ? सगळ्यांनाच धक्का बसलेला दिसतोय—डॉक्टर, कुणाला जायला सांगताहांत ? (डॉक्टर स्तब्ध) बोलत कां नाहीं डॉक्टर ? (मागाहून नोकर फळें घेऊन येतो—त्याला नुसत्या इशाऱ्यानें तीं टेबलावर ठेव असें सांगतात. तो ठेवून जातो.)

**डॉक्टर** : बोलण्यासारखं कांहीं राहिलं नाहीं आतां—

**महाराज** : ठीक आहे. आपल्या सेवेचीहि कांहीं आवश्यकता राहिली नाहीं.

**डॉक्टर** : हें मीच आपल्याला सांगणार होतों युवर हायनेस्!

**महाराज** : अस्सं! राजिनामा देऊन निघाल्याचा मोठेपणा हवा आहे तुम्हांला? संध्याकाळपर्यंत लिहून आणा.

**बेबी** : पपा—काय करतां...

**महाराज** : (तिला मध्येंच थांबवून) माझ्या वागण्याची चिकित्सा तुमच्या-कडून व्हायला नको आहे मला—माझं पत्र मिळालं?—

**बेबी** : (चोळामोळा करून टाकलेल्या पत्राकडे पाहत) हो! (महाराजांचं लक्ष जातं—)

**महाराज** : (पत्राची अवस्था पाहात) अस्सं!

**बेबी** : पण पपा...

**महाराज** : तुमचं काय मत आहे तें ह्या पत्राच्या अवस्थेवरून कळलं मला—

**बेबी** : पण मला तुम्हांला कांहीं सांगायचं आहे.

**महाराज** : इंग्लंडच्या बोटींत पंधरा दिवस एकत्रच राहायचंय आपल्याला तेव्हां सांगा—

**बेबी** : इंग्लंडच्या बोटींत भेट होणार नाहीं आपली.

**महाराज** : डॉक्टर! ह्या संभाषणांत तुम्हीं भाग घेण्याची आवश्यकता नाहीं—प्रताप, राजेंद्र, तुम्हीहि! (ते तिघेहि जातात.)—यस् बेबी—

**बेबी** : इंग्लंडच्या बोटींत—

**महाराज** : ऐकलंय मीं तें वाक्य!—पुढें बोला—

**बेबी** : मला पुढें कांहींहि बोलायचं नाहीं—

**महाराज** : ठीक आहे!—मग माझं ऐका—त्या माणसाशीं मी लग्न करूं देणार नाहीं तुला—

**बेबी** : तो प्रश्न आतां तुमच्या इच्छेचा राहिला नाहीं. माझं त्याच्याशीं लग्न झालं—

**महाराज** : केव्हां ?

**बेबी** : ज्या दिवशीं त्याची आणि माझी पहिली भेट झाली तेव्हां.

**महाराज** : त्याला लग्न म्हणत नाहींत बेबी—व्यभिचार म्हणतात—

**दिदी** : पपा, काय बोलतां हें ! शी शी शी—

**बेबी** : आणि दिदी, ह्यांच्यावर तूं मला प्रेम करायला सांगतेस ? प्रेम हा शब्द कशाशीं खातात हें ज्याला ठाऊक नाहीं त्याच्यावर मला प्रेम करायला सांगतेस ?

**महाराज** : मला तुमच्या प्रेमाची आवश्यकता नाहीं बेबी—

**बेबी** : तुम्हांला कोणाच्याच प्रेमाचीच आवश्यकता नाहीं पपा—तुम्हांला आवश्यकता आहे फक्त अमर्याद सत्तेची ! ज्या डॉक्टरांनीं पोटच्या पोरासारखं संगोपन केलं आमचं, त्यांच्या सेवेचं तुम्हीं काय चीज केलं तें हें पाहिलं आम्हीं आतांच ! बाभुळझाडालादेखील फुलं येतात—पण पपा, तुम्ही दुसऱ्यांच्या आयुष्यांत कांटे कांटे पसरण्याखेरीज कांहीं केलं नाहीं. दिदी, चल, चल माझ्याबरोबर. माझ्या झोपडींत तुला निवारा आहे. बंडाचे आईबाप गाईघोड्यावरदेखील पोटच्या पोरांसारखं प्रेम करतात--आपल्या हातांनीं भाकर खाऊं घालतील तुला—

**महाराज** : बेबी--कोंडून ठेवीन तुला—

**बेबी** : मग आजपर्यंत काय केलंत तुम्हीं—

**महाराज** : बेबी, त्या मोतद्दाराच्या मुलाशीं तुला लग्न करतां येणार नाहीं—

**बेबी** : अनोळखी माणसाच्या मताला मला नाहीं मान द्यावासा वाटत—

**महाराज** : अनोळखी—

**बेबी** : अनोळखी नाहींतर काय ?—तुम्हीं आपल्या मुलांशीं कधीं ओळख करून घेतली आहे ? कधीं मायेनं जवळ घेतल्याचं आठवतं तुम्हांला—कधीं पाठीवरून प्रेमाचा—शाबासकीचा हात फिरलाय तुमचा ? पगारी नोकरचाकरांनीं वाढवलं आम्हांला—कुठं, कधीं, केव्हां मिळालंय आम्हांला प्रेम ? राजाचीं पोरं--प्रेमाची भीक मागत हिंडलों आम्ही—ज्यांनीं घातली त्यांच्या मागून गेलों म्हणून इतका वैताग करायचं काय कारण ?

**दिदी** : बेबी—(तिच्या गळ्यांत मिठी मारते.)

**डॉक्टर** : बोलण्यासारखं कांहीं राहिलं नाहीं आतां—

**महाराज** : ठीक आहे. आपल्या सेवेचीहि कांहीं आवश्यकता राहिली नाहीं.

**डॉक्टर** : हें मीच आपल्याला सांगणार होतों युवर हायनेस् !

**महाराज** : अस्सं ! राजिनामा देऊन निघाल्याचा मोठेपणा हवा आहे तुम्हांला ? संध्याकाळपर्यंत लिहून आणा.

**बेबी** : पपा—काय करतां...

**महाराज** : (तिला मध्येंच थांबवून) माझ्या वागण्याची चिकित्सा तुमच्या-कडून व्हायला नको आहे मला—माझं पत्र मिळालं ?—

**बेबी** : (चोळामोळा करून टाकलेल्या पत्राकडे पाहत) हो ! (महाराजांचं लक्ष जातं—)

**महाराज** : (पत्राची अवस्था पाहात) अस्सं !

**बेबी** : पण पपा...

**महाराज** : तुमचं काय मत आहे तें ह्या पत्राच्या अवस्थेवरून कळलं मला—

**बेबी** : पण मला तुम्हांला कांहीं सांगायचं आहे.

**महाराज** : इंग्लंडच्या बोटींत पंधरा दिवस एकत्रच राहायचंय आपल्याला तेव्हां सांगा—

**बेबी** : इंग्लंडच्या बोटींत भेट होणार नाहीं आपली.

**महाराज** : डॉक्टर ! ह्या संभाषणांत तुम्हीं भाग घेण्याची आवश्यकता नाहीं—प्रताप, राजेंद्र, तुम्हीहि ! (ते तिघेहि जातात.)—यस् बेबी—

**बेबी** : इंग्लंडच्या बोटींत—

**महाराज** : ऐकलंय मीं तें वाक्य !—पुढें बोला—

**बेबी** : मला पुढें कांहींहि बोलायचं नाहीं—

**महाराज** : ठीक आहे !—मग माझं ऐका—त्या माणसाशीं मी लग्न करूं देणार नाहीं तुला—

**बेबी** : तो प्रश्न आतां तुमच्या इच्छेचा राहिला नाहीं. माझं त्याच्याशीं लग्न झालं—

**महाराज** : केव्हां ?

**बेबी** : ज्या दिवशीं त्याची आणि माझी पहिली भेट झाली तेव्हां.

**महाराज** : त्याला लग्न म्हणत नाहींत बेबी—व्यभिचार म्हणतात—

**दिदी** : पपा, काय बोलतां हें ? शी शी शी—

**बेबी** : आणि दिदी, ह्यांच्यावर तूं मला प्रेम करायला सांगतेस ? प्रेम हा शब्द कशाशीं खातात हें ज्याला ठाऊक नाहीं त्याच्यावर मला प्रेम करायला सांगतेस ?

**महाराज** : मला तुमच्या प्रेमाची आवश्यकता नाहीं बेबी—

**बेबी** : तुम्हांला कोणाच्याच प्रेमाचीच आवश्यकता नाहीं पपा—तुम्हांला आवश्यकता आहे फक्त अमर्याद सत्तेची ! ज्या डॉक्टरांनीं पोटच्या पोरासारखं संगोपन केलं आमचं, त्यांच्या सेवेचं तुम्हीं काय चीज केलं तें हें पाहिलं आम्हीं आतांच ! बाभुळझाडालादेखील फुलं येतात—पण पपा, तुम्ही दुसऱ्यांच्या आयुष्यांत कांटे कांटे पसरण्याखेरीज कांहीं केलं नाहीं. दिदी, चल, चल माझ्याबरोबर. माझ्या झोपडींत तुला निवारा आहे. बंडाचे आईबाप गाईघोड्यावरदेखील पोटच्या पोरांसारखं प्रेम करतात--आपल्या हातांनीं भाकर खाऊं घालतील तुला—

**महाराज** : बेबी—कोंडून ठेवीन तुला—

**बेबी** : मग आजपर्यंत काय केलंत तुम्हीं—

**महाराज** : बेबी, त्या मोतद्दाराच्या मुलाशीं तुला लग्न करतां येणार नाहीं—

**बेबी** : अनोळखी माणसाच्या मताला मला नाहीं मान द्यावासा वाटत—

**महाराज** : अनोळखी—

**बेबी** : अनोळखी नाहींतर काय ?—तुम्हीं आपल्या मुलांशीं कधीं ओळख करून घेतली आहे ? कधीं मायेनं जवळ घेतल्याचं आठवतं तुम्हांला—कधीं पाठीवरून प्रेमाचा—शाबासकीचा हात फिरलाय तुमचा ? पगारी नोकरचाकरांनीं वाढवलं आम्हांला—कुठं, कधीं, केव्हां मिळालंय आम्हांला प्रेम ? राजाचीं पोरं--प्रेमाची भीक मागत हिंडलों आम्ही—ज्यांनीं घातली त्यांच्या मागून गेलों म्हणून इतका वैताग करायचं काय कारण ?

**दिदी** : बेबी—(तिच्या गळ्यांत मिठी मारते.)

**महाराज** : दिदी--मुकाट्यानं जाऊं दे तिला--असली व्यभिचारी मुलगी नको आहे मला घरांत--

**बेबी** : पपा!! हा शब्द पुन्हा ऐकून घेणार नाहीं मी! (रागानें तिचे ओठ थरथरूं लागतात--डोळ्यांतून अश्रू वाहूं लागतात.) दिदी, चाललें मी. बंडा मुंबईहून आला कीं थाटानं लग्न करणार आहोंत आम्ही...येशील ना लग्नाला माझ्या...अग देव करतो कीं नाहीं तें सगळं बऱ्यासाठीं करतो--आतां तुला चालतां येतं--उगीच नाहीं--तिथपर्यंत आलं पाहिजे तुला--माझ्या लग्नांत दिदी...तूंच...तूंच...माझी आई...(तिला कडकडून भेटते--अत्यंत तुच्छतेनें आपल्या बापाकडे पाहते--आणि निघून जाते.)

**दिदी** : पपा--काय होतंय हो हें?

**महाराज** : लग्न!!

**दिदी** : जा--जा पपा--बेबीला परत बोलावून आणा. आपण लग्न लावून देऊं बेबीचं--साऱ्या नंदनवाडीला आमंत्रण देऊं आपण--ह्या वाड्याचीं पंधराहि दारं गजबजून जाऊं देत माणसांनीं--राजा आणि प्रजा ह्यांतलं शेवटलं अंतर तुटून जाऊं दे पपा--

**महाराज** : दिदी--बेबी गेली हें चांगलं झालं!

**दिदी** : मुलींना कधीं ना कधीं तरी माहेर सोडायचंच असतं पपा, पण हें असं नव्हे. माझ्यासारखी आयुष्यभर माहेरींच राहण्यासाठीं जन्माला आलेली कमनशिबी मुलगी एखादीच--

**महाराज** : तुलाहि सोडून जायचंय हें घर?

**दिदी** : नाहीं पपा, मला कसं सोडून जातां येईल?

**महाराज** : दिदी, तुला कल्पना येणार नाहीं, पण तुझ्याइतकं मला जगांत दुसरं कांहीं कांहीं प्रिय नाहीं--आयुष्यभर तुझी चिंता केली मीं...

**दिदी** : मला ठाऊक आहे पपा--पण पपा, बेबीनें तुमचा काय अपराध केला आहे? फुलपांखरासारखी बेबी!

**महाराज** : दिदी, फुलपाखरं--फुलं--तारे--नक्षत्रें ह्यांचा माझा कधींहि संबंध आला नाहीं. मला न रुचणाऱ्या, न मानवणाऱ्या गोष्टी आहेत या.

**दिदी :** मग आपल्या वाड्यांत एके काळीं इतके चित्रकार, गायक, कलावंत—

**महाराज :** त्यांना पोसणं हें राजाचं कर्तव्य आहे म्हणून...मीं फक्त कर्तव्य केलं—

**दिदी :** पण कर्तव्य करतांना प्रेमाचा ओलावा नसला तर अर्थ काय त्या कर्तव्याला ?

**महाराज :** ह्याचा विचार करण्याची मला आवश्यकता वाटली नाहीं —(सुभानराव टेबलावरून एक चिठी आणून देतो.) संजय देशमुख ?—पुन्हा कां आला हा इथं ? दिदे, यानं इथं येतां कामा नये.

**दिदी :** त्यांना सांगा तसं—(सुभानराव जातो.)

**महाराज :** दिदी—हा संजय पुन्हा पुन्हा इथं कां येतो ? त्याच्या कविता तूं वाचाव्यास अशी त्याची इच्छा असली तर पोष्टानं कविता पाठवूं शकतो तो—तुझ्या लिहिण्यावाचण्याला मीं कधींच विरोध केला नाहीं. पण पुन्हा पुन्हा यायचं काय कारण ?—काय मत आहे तुझं या इसमाबद्दल ?

**दिदी :** ते एक अलौकिक प्रतिभेचे कलावंत आहेत.

**महाराज :** एवढंच ?—अगदीं अंतःकरणाला स्मरून सांगते आहेस तूं हें ?

**दिदी :** हो !

**महाराज :** ह्यापलीकडे दुसरी कुठलीहि भावना नाहीं तुझ्या मनांत ?

**दिदी :** पपा, त्यांना भेटायची इच्छा नाहीं मला हें तुमच्या देखतच कळवलं ना मीं त्यांना—

**महाराज :** दिदी—हें तूं मनापासून कळवलंस कीं केवळ मला बरं वाटावं. म्हणून कळवलंस ?

**दिदी :** अगदीं मनापासून—संजयच काय, पण मला यापुढें कुणालाहि भेटायचं नाहीं—ह्या चार भिंतींतच मी राहीन—आणि माझा शेवटदेखील ह्या चार भिंतींखेरीज दुसऱ्या कुणींहि पाहूं नये—असं वाटतंय मला.

**महाराज :** असं बोलूं नकोस दिदी—इंग्लंडला गेल्यावर तुला नक्की बरं वाटेल.

**महाराज :** दिदी--मुकाट्यानं जाऊं दे तिला--असली व्यभिचारी मुलगी नको आहे मला घरांत--

**बेबी :** पपा !! हा शब्द पुन्हा ऐकून घेणार नाहीं मी ! (रागानें तिचे ओठ थरथरूं लागतात--डोळ्यांतून अश्रू वाहूं लागतात.) दिदी, चाललें मी. बंडा मुंबईहून आला कीं थाटानं लग्न करणार आहोंत आम्ही...येशील ना लग्नाला माझ्या...अग देव करतो कीं नाहीं तें सगळं बऱ्यासाठीं करतो--आतां तुला चालतां येतं--उगीच नाहीं--तिथपर्यंत आलं पाहिजे तुला--माझ्या लग्नांत दिदी...तूंच...तूंच...माझी आई...(तिला कवकवून भेटते--अत्यंत तुच्छतेनें आपल्या बापाकडे पाहते--आणि निघून जाते.)

**दिदी :** पपा--काय होतंय हो हें ?

**महाराज :** लग्न !!

**दिदी :** जा--जा पपा--बेबीला परत बोलावून आणा. आपण लग्न लावून देऊं बेबीचं--साऱ्या नंदनवाडीला आमंत्रण देऊं आपण--ह्या वाड्याची पंचराहि दारानं गजबजून जाऊं देत माणसांनीं--राजा आणि प्रजा ह्यांतले शेवटलं अंतर तुटून जाऊं दे पपा--

**महाराज :** दिदी--बेबी गेली हें चांगलं झालं !

**दिदी :** मुलींना कधीं ना कधीं तरी माहेर सोडायचंच असतं पपा, पण हें असं नव्हे. माझ्यासारखी आयुष्यभर माहेरींच राहण्यासाठीं जन्माला आलेली कमनशिबी मुलगी एखादीच--

**महाराज :** तुलाहि सोडून जायचंय हें घर ?

**दिदी :** नाहीं पपा, मला कसं सोडून जातां येईल ?

**महाराज :** दिदी, तुला कल्पना येणार नाहीं, पण तुझ्याइतकं मला जगांत दुसरं कांहीं कांहीं प्रिय नाहीं--आयुष्यभर तुझी चिंता केली मीं...

**दिदी :** मला ठाऊक आहे पपा--पण पपा, बेबीनं तुमचा काय अपराध केला आहे ? फुलपांखरासारखी बेबी !

**महाराज :** दिदी, फुलपाखरं--फुलें--तारे--नक्षत्रें ह्यांचा माझा कधींहि संबंध आला नाहीं. मला न रुचणाऱ्या, न मानवणाऱ्या गोष्टी आहेत या.

**दिदी** : मग आपल्या वाड्यांत एके काळीं इतके चित्रकार, गायक, कलावंत—

**महाराज** : त्यांना पोसणं हें राजाचं कर्तव्य आहे म्हणून...मीं फक्त कर्तव्य केलं—

**दिदी** : पण कर्तव्य करतांना प्रेमाचा ओलावा नसला तर अर्थ काय त्या कर्तव्याला ?

**महाराज** : ह्याचा विचार करण्याची मला आवश्यकता वाटली नाहीं —(सुभानराव टेबलावरून एक चिठ्ठी आणून देतो.) संजय देशमुख ?—पुन्हा कां आला हा इथं ? दिदे, यानं इथं येतां कामा नये.

**दिदी** : त्यांना सांगा तसं—(सुभानराव जातो.)

**महाराज** : दिदी—हा संजय पुन्हा पुन्हा इथं कां येतो ? त्याच्या कविता तूं वाचाव्यास अशी त्याची इच्छा असली तर पोष्टानं कविता पाठवूं शकतो तो—तुझ्या लिहिण्यावाचण्याला मीं कधींच विरोध केला नाहीं. पण पुन्हा पुन्हा यायचं काय कारण ?—काय मत आहे तुझं या इसमाबद्दल ?

**दिदी** : ते एक अलौकिक प्रतिभेचे कलावंत आहेत.

**महाराज** : एवढंच ?—अगदीं अंतःकरणाला स्मरून सांगते आहेस तूं हें ?

**दिदी** : हो !

**महाराज** : ह्यापलीकडे दुसरी कुठलीहि भावना नाहीं तुझ्या मनांत ?

**दिदी** : पपा, त्यांना भेटायची इच्छा नाहीं मला हें तुमच्या देखतच कळवलं ना मीं त्यांना—

**महाराज** : दिदी—हें तूं मनापासून कळवलंस कीं केवळ मला बरं वाटावं म्हणून कळवलंस ?

**दिदी** : अगदीं मनापासून—संजयच काय, पण मला यापुढें कुणालाहि भेटायचं नाहीं—ह्या चार भिंतींतच मी राहीन—आणि माझा शेवटदेखील ह्या चार भिंतींखेरीज दुसऱ्या कुणींहि पाहूं नये—असं वाटतंय मला.

**महाराज** : असं बोलूं नकोस दिदी—इंग्लंडला गेल्यावर तुला नक्की बरं वाटेल.

**दिदी** : मला केव्हांच बरं वाटलंय पपा—मी योगेश्वरापर्यंत चालत जाऊन आलें—

**महाराज** : कधीं ?

**दिदी** : आज. मला पूर्ण बरं वाटलंय आतां. आणखी अधिक बरं व्हायची इच्छा राहिली नाहीं मला—उलट इतकं बरं वाटायला लागल्याचा पश्चात्ताप व्हायला लागलाय मला—

**महाराज** : स्वस्थ विश्रांति घे दिदी—फार ताण पडलाय तुला आज—(खिडक्यांचे व दारांचे पडदे ओढून बंद करतात.) दिदी—आयुष्यांत मीं कुणापुढेंहि तोंड पसरून विनंती केली नाहीं—कुणाच्याहि रागालोभाची पर्वा केली नाहीं—जगांतली कुठलीहि आपत्ति सहन करीन मी—पण दिदी, तूं माझा तिटकारा करूं नकोस—

**दिदी** : पपा, मला फक्त आश्चर्य वाटतं कीं तुमचं हें अंतःकरण इतरांच्या वांट्याला कां येऊं नये ?

**महाराज** : तें विचारूं नकोस मला दिदी—विश्रांति घे—(जातात. दिदी नेहमींच्या खुर्चीवर बसते. तिपाईवरचें उमरखय्यामच्या रुबायांचें पुस्तक उघडते. संजय येऊन तिच्यामागें उभा राहतो, आणि पुस्तकांतली कविता वाचूं लागतो—)

**संजय** : ओहोहो—उमरखय्याम! अग पण उमरखय्याम इथं राजवाड्यात का बसून वाचायचा असतो ? संध्याकाळच्या छाया पसरत असाव्या—झाडाखालीं बसावं—कवितांचं पुस्तक—भाकरी एक एन् सुरई एक सुरेची—जवळ तू आहेस आणि मग..

**दिदी** : आंत कसे आलांत तुम्ही संजय ?

**संजय** : कसा आलों म्हणजे ? हिज हायनेस्च्या खास मेहरबानीनें! तुमच्या वाड्यावरचे नोकर काय बदमाष आहेत! आत येऊं नका असा महाराजांचा हुकूम आहे म्हणाला लुच्चा—इतक्यांत महाराज स्वतः आले समोरून आणि त्यांनीं होऊन मला भेटायला सांगितलं—आनंदाच्या भरांत मीं माझ्या नव्या कवितासंग्रहाची प्रतदेखील त्यांना दिली—आणि ही दुसरी तुझ्यासाठीं—(दिदीच्या हातांत प्रत देतो. दिदी पुस्तकाकडे न पाहतां तशीच पुस्तक हातांत घेऊन बसली आहे हें पाहून) हें काय ?

**दिदी** : संजय—

**संजय** : हं, उघड तें पुस्तक आणि अर्पणपत्रिका वाच—

**दिदी** : संजय—

**संजय** : वाच म्हणतों ना—

**दिदी** : पण हा काय जुलूम—

**संजय** : जुलूम मी करतोंय कीं तूं? वाच—नाहीं वाचत ? ठीक आहे. मीच वाचतों. ऐक. संग्रहाचं नांव आहे—श्रावण. कवि संजय. किंमत दोन रुपये. अर्पणपत्रिका—जन्मजन्मांतरींची सहप्रवासिनी हेमा हिला—

**दिदी** : मला स्वीकारतां येणं अशक्य आहे संजय.

**संजय** : काय ? अग हिज हायनेसनीं देखील स्वीकारला संग्रह आणि तूं घेत नाहींस—काय झालं ? काय झालं पुन्हा ?

**दिदी** : कांहीं झालं नाहीं—संपूर्ण बरी झालें आहें मी—आज योगेश्वराच्या देवळापर्यंत चालत जाऊन आलें—

**संजय** : एकटीच ? मला कां नाहीं कळवलंस ! ठीक आहे. उद्यांपासून बरोबर जाऊं या—मी इथेंच राहणार आहें—

**दिदी** : इथें ?

**संजय** : इथें म्हणजे ह्या राजवाड्यांत नव्हे. इथें कोण आम्हांला राहूं देतोय् ? इथल्या स्वागताची पद्धतच निराळी आहे—येणाऱ्या माणसाला पहिल्यांदा जा म्हणून सांगायचं ! मी राहीन आपला कुठेंतरी—पहाटे येईन राजकन्येला भूपाळी गाऊन उठवायला—मग आपण जाऊं फिरायला. शरद्-ऋतूची चाहूल लागली नाहीं तुला अजून ?

**दिदी** : मला सहाहि ऋतूंची आणि बाराहि महिन्यांची शोभा आतां कुठल्या तरी चार भिंतींच्या आंत राहूनच पाहिली पाहिजे—

**संजय** : म्हणजे राजेसाहेबांनीं तुला नजरकैदेंत वगैरे ठेवलंय कीं काय ?

**दिदी** : पुढल्या महिन्यांत आम्ही इंग्लंडला जातों आहोंत—

**संजय** : इंग्लंडला ?—इंग्लंडला काय आहे ?

दिदी : पपांची आज्ञा आहे—ते सगळ्यांना घेऊन इंग्लंडला जाणार आहेत—

संजय : किती दिवसांसाठीं ?

दिदी : कदाचित् कायमचं !

संजय : कां पण ?

दिदी : ह्या घरात पपांना हा प्रश्न कोणींहि विचारायचा नसतो—पपांच्या इच्छेविरुद्ध मला कांहींहि करतां यायचं नाहीं—त्यांचं माझ्यावर अमर्याद प्रेम आहे—

संजय : कुणाचं ?—तुझ्या वडिलांचं ?

दिदी : होय.

संजय : अमर्याद प्रेम आहे काय ? अमर्याद सत्तेचा लोभ असलेल्या माणसाला अमर्याद प्रेम करतां येतं हा शोध पहिल्यांदाच लागला मला—पोटच्या पोरीला नेसत्या वस्त्रानिशीं हाकलून देणाऱ्या बापाचं अमर्याद प्रेम !

दिदी : तुम्हांला कुणीं सांगितलं ?

संजय : बेबी भेटली मला रस्त्यांत. मुक्त आनंदांत चालली होती—बंधन तोडल्याच्या आनंदांत—तिनें सांगितली तुझ्या पपांच्या अमर्याद प्रेमाची कथा—

दिदी : संजय, पण माझं ऐका—

संजय : कांहीं ऐकायचं नाहीं मला—मला आश्चर्य वाटतं तें एवढंच ! असल्या दगडाच्या पोटीं तुझा जन्म झाला—बस्—मला कांहीं ऐकायचं नाहीं—तुला ह्या बंदिवासांतून मला मुक्त केलंच पाहिजे—तुझ्यासाठीं नाहीं—माझ्याहीसाठीं नाहीं. ज्या ईश्वरानें तुला प्रतिभेचं देणं दिलं आहे—त्याचं ऋण फेडण्याची जबाबदारी आहे तुझ्यावर—तें ऋण ह्या भिंतींच्या आड राहून फेडूं शकणार नाहींस तूं—कसला खेळ चालवला आहेस जिवाशीं ? मी नाहीं चालूं देणार.

दिदी : संजय, कसं सांगूं तुम्हांला ?

संजय : मला कांहीं ऐकायचं नाहीं—हेमा, विचार कर. हजारांत, लाखांत

जें देणं मिळत नाहीं तें देवानें तुला दिलं आहे—उघड्या डोळ्यांनीं जग पाहा—सुख पाहा, दुःख पाहा—आणि शेंकडों ओळी लिहून काढ. आज ना उद्यां कुठेंतरी—कधींतरी—कोणाच्या तरी जीवनांत त्यांतल्या चार ओळी आनंदाचीं फुलं फुलवतील. हा सारा संसार सुखाचा करायचा आहे तो कोणी? आपणच ना हेमा? चल हेमा—वास्तविक बेबीनें घेतलेला निर्णय तूं घ्यायला हवा होतास.

**दिदी** : माझं ऐकाल का संजय? मला तुम्ही काय म्हणतां तें कळत का नाहीं? पण माझ्यासारखी अपंग सोबतीण म्हणजे तुमच्या गळ्यांतलं कायमचं लोढणं आहे संजय—आयुष्याचीं गेलीं दहाबारा वर्षं मीं वाट पाहिली होती ती मृत्यूची. तुम्ही याल हें स्वप्नांत देखील वाटलं नव्हतं मला—तुमच्या कविता वाचून वेडी होत होतें मी—आणि त्या वेडांत कांहीं चार ओळी लिहिल्या असतील मीं—त्या दिवशीं तुम्ही येऊन माझ्यासमोर उभे राहिलांत त्यावेळीं साक्षात् मृत्युंजयच माझ्यापुढें उभा राहिल्यासारखं वाटलं मला. वास्तविक तें एकच दर्शन डोळ्यांत सांठवून मीं तुम्हांला पुन्हा भेटायलाहि नको होतं—पण तुम्ही पुन्हा आलांत—आणि माझं शरीर मोहरल्यासारखं झालं; तुम्हांला जा म्हणून सांगणं शक्यच झालं नाहीं मला—आज पुन्हा मी थकलें—तुमच्या दर्शनानं नवचैतन्य आलं होतं तें गेल्यासारखं वाटलं—तुमच्या वाटेवरून मला बाजूला व्हायला हवं—पत्नी म्हणून तुमच्या आयुष्यांत येण्यासारखं कांहीं नाहीं माझ्यांत. संजय, जा तुम्ही. आयुष्याचं घटिकापात्र बुडत आलं होतं—तेवढ्यांत तुम्ही आलांत, आधार दिलात. मला पुन्हा नवी शक्ति आली. आज योगेश्वराचं दर्शन घेतलं—कल्याणींत ओंजळ भरली—कांठावरचीं हिरवीं रानं आणि हिरवीं पानं पुन्हा एकदां डोळे भरून पाहिलीं मीं—आणि याचसाठीं केला होता अट्टाहास असं वाटायला लागलं मला—तुम्ही नका येऊं इथं. हा राजवाडा आहे—इथं कोणत्या वेळीं काय होईल कांहीं सांगतां येत नाहीं.

**संजय** : त्याला मी कधींच भ्यालों नाहीं हेमा—खूप झगडा केला आहे मीं आयुष्यांत—कितीतरी कोंडवाडे फोडले आहेत मीं—शाळेचा कोंडवाडा, घराचा कोंडवाडा—अनेक ठिकाणीं झुंज घेतली आहे मीं—आतां वाटतं झुंजतांना बरोबर कुणीतरी असावं—

**दिदी** : जरूर असावं—पण तें माझ्यासारखं दुबळं, अशक्त नव्हे—

**संजय** : दुबळं शरीर नसतं, हेमा—मन असतं—क्रांति कधीं पहिलवानांनीं केलेली एकली नाहीं मीं हेमा—एवढ्या एवढ्याशा शरीराच्या दुबळ्या दिसणाऱ्या महात्म्यांनीं क्रांति केली—

**दिदी** : तुमच्यांत आणि पपांच्यांत एक विलक्षण साम्य आहे—

**संजय** : माझ्यांत आणि पपांच्यांत ?

**दिदी** : होय—तुम्ही दोघेहि हुकूमशहा आहांत !

**संजय** : मी हुकूमशहा ?

**दिदी** : नाहींतर काय ? दुसऱ्याला बोलूंच देत नाहीं तुम्ही—

**संजय** : 'चुकतेस हेमा—तूं बोलावंस—खूप बोलावंस—माझ्या एकट्यासाठीं नव्हे तर तुझ्या बोलानं जग डोलावं म्हणून तर तुला सांगतों.आहें—

**दिदी** : पण माझी बोलायची इच्छाच नसली तर—

**संजय** : तर तूं बरी झाली नसतीस ! योगेश्वराच्या दर्शनाला गेली नसतीस—

**दिदी** : तुमचा विश्वास आहे योगेश्वरावर—

**संजय** : विश्वास ? अग योगेश्वर निर्माण कोणीं केला ? आपल्यासारख्याच कुणीतरी कवीनं—कलावंतानं ना ? मग आपल्याच निर्मितीवर आपण विश्वास नाहीं ठेवायचा ?—माझा विश्वास नाहीं फक्त तुझ्या पपांवर. त्यांनीं इंग्लंडला जायचा बेत केला आहे त्याच्यामागें काय कारण आहे हें कळूं शकतं मला—तुला मी जाऊं देणार नाहीं—

**दिदी** : म्हणजे काय करणार तुम्ही—

**संजय** : तुझ्याशीं लग्न.

**दिदी** : मला विचार करायला तरी सवड द्या संजय—

**संजय** : हेमा—योगेश्वराच्या दर्शनाला गेली होतीस ना—

**दिदी** : हो—

**संजय** : जातांना काय घेऊन गेली होतीस ?

**दिदी** : कांहीं नाहीं—फक्त भक्तिभाव—

**संजय** : अगदीं तशी—तशीच ये—आणि भक्तिभाव ठेवशील तो माझ्या-वर नव्हे—जीवनावर ठेव. आणि यापुढं मृत्यूची वाट पाहायची भाषा चुकूनदेखील तोंडांतून काढायची नाहीं—अग मृत्यूची आपण का वाट पाहायची असते—मृत्यु आपली वाट पाहत उभा असतो—राहूं दे बिचारा —त्याची काळजी आपण कशाला करायची?—आणि हेमा, असे हे पडदे ओढून प्रकाशाला कां मज्जाव करतेस? (खिडक्या-दारांवरचे पडदे उघडतो. आंत प्रकाशाचा स्रोत येतो.) असा सुंदर प्रकाश आंत येऊं दे! प्रकाशाची भीति घुबडांना—गरुडांना नसते. माझा निर्णय मीं तुला सांगितला—तुझा निर्णय अशा प्रकाशांत बसून घे आणि तुला वाटेल तेव्हां सांग मला—जातों मी हेमा—पण त्यापूर्वी एकच विनंती आहे.

**दिदी** : विनंतीची भाषा कसली संजय...कायं सांगायचं आहे?

**संजय** : हा संग्रह नीट स्वीकारला नव्हतास तूं—आतां स्वीकारशील? (तिला दरबारी पद्धतीनें संग्रह देतो—ती स्वीकारते.) जाऊं मी—

**दिदी** : कुठें जाणार आतां?

**संजय** : ह्या वाड्याबाहेरच्या पिंपळाच्या पारावर दोन निर्वासित उभे आहेत माझी वाट पाहत—

**दिदी** : निर्वासित? कोण निर्वासित?

**संजय** : एक बेबी आणि दुसरे डॉक्टर पटवर्धन—अच्छा—जातों— (झटकन निघून जातो. दिदी त्यानें दिलेल्या पुस्तकाची पानें उलटूं लागते. सुरेश आणि मेनका येतात. दिदी वाचनांत गढली आहे, सुरेश दारांत उभा राहून मोकळ्या आवाजांत 'आ. ' असा स्वर लावतो. दिदी वळून पाहते.)

**दिदी** : सुरेश! (त्याच्या हालचालींत एक निराळाच आत्मविश्वास दिसतो.)

**सुरेश** : होय दिदी, सुरेश! मला ओळखलं नाहीं—

**दिदी** : इश्य—न ओळखायला काय झालं...

**सुरेश** : नाहीं—पण मला ओळखणं इतकं सोपं नाहीं आतां—आतां मी तो—तो सुरेश नाहीं—मी मागें तुमच्या घरीं आलों होतों ना, तेव्हां सुरदंटा-सारखा होतों—

म. ग्रं. ... संग्रहालय
क्र. २३९०८ ... ७।५।९०

**दिदी** : सुरवंटासारखा—

**सुरेश** : हो सुरवंटासारखा—सरपटणारा—दिदी, तुम्हीं जादू केलीत—तुम्हीं मला गायला लावलंत. माझ्या आयुष्यांतली पहिली दाद तुम्हीं दिलीत, दिदी—कुणाला तरी आपण जें कांहीं करतों तें आवडलं म्हणजे काय वाटतं, नाहीं दिदी—

**दिदी** : होय सुरेश, खूप वाटतं—मेनका, तूं गप्प कां ?

**मेनका** : लग्नानंतर जरा आम्हीं आमच्या कामांत अदलाबदल केली आहे —बडबडणं, गप्पा मारणं सगळी जबाबदारी आमच्या ह्यांनीं घेतली आहे. तूं त्या दिवशीं त्याला कलावंत म्हणालीस—त्याला काय झालं देव जाणे—कसलं तरी डोक्यांत एक्स्प्लोजन् झालंय त्याच्या—

**सुरेश** : पण खरंच—दिदी, आयुष्यांत ज्याला माझ्यामुळें आनंद झाला असं यापूर्वी मला कोणीदेखील भेटलं नव्हतं—तुम्ही भेटलांत मला—तुम्ही मला सांगितलेंत कीं गा—मोकळ्या आवाजांत गा—न लाजतां गा—मी गायला लागलों. आणि मला एकदम माझा आवाज माझ्या हातांत आल्यासारखं वाटलं.

**दिदी** : खरं सांगतां सुरेश—खरं मेनका—

**मेनका** : दिदी, प्लीज डोण्ट आस्क मी ! ह्याला वेड लागलंय कीं मला वेड लागलंय हेंच कळेनासं झालंय मला—

**दिदी** : पण सुरेश न भितां गायला लागले म्हणून राग आला तुला—

**मेनका** : कमाल ! राग कां येईल ? बंगलोरच्या क्लबांत गायला सुरेश तर सगळ्या बायका नुसत्या जेलसीनं पाह्यला लागल्या माझ्याकडे—आय ॲम व्हेरी प्राउड ऑफ हिम !—म्युझिक म्हणजे काय सोपं नसतं कांहीं—

**दिदी** : मग सुरेश—माझ्यासाठीं गाल तुम्ही ?

**सुरेश** : तुमच्यासाठीं ? तुम्हीं विनंती नाहीं करायची मला—हुकूम करायचा दिदी ! आयुष्याला अर्थ आणला तुम्हीं माझ्या ! इतके दिवस—खरं सांगूं का—मला नेहमीं एका प्रश्नाची भीति वाटायची. म्हणून मी कुठंहि जात नसें—कुठेंहि गेलं कीं वाटायचं हा प्रश्न विचारणार—

**दिदी** : कुठला प्रश्न ?

**सुरेश :** आपण काय करतां ? हा.

**मेनका :** हें मात्र तुझं कांहींतरीच हां ! अग शेठसाहेब इतके श्रीमंत आहेत मग ह्यांनीं कशाला काय करायला हवं ग ?

**दिदी :** तसं नाहीं मेनका—बरोबर आहे त्यांचं ! आपण काय करतां ? ह्या प्रश्नाचं उत्तर अभिमानानं देण्यासारखं किती लोक काय करतात—

**सुरेश :** मला त्यावेळीं वाटे—मी काय सांगूं—मी कांहींच करत नव्हतों—दुसरेच लोक माझ्यासाठीं कांहीं तरी करायचे—हां—आतां आजारी पडलों असतों म्हणजे प्रश्न नव्हता—पण मी चांगला धडधाकड—लोक म्हणायचे आपण काय करतां—मग मी गप्प बसत होतों—आतां विचारूं देत.

**मेनका :** आतां काय सांगणार तूं ?

**सुरेश :** विचारून पाहा !

**मेनका :** (अत्यंत कृत्रिम रीतीनें) आपण काय करतां ?

**सुरेश :** मी गातों—

**मेनका :** पण दिदी—मला खरंच अगदीं वंडर वाटतं—हा इतका शाय होता—हा इतका धीट कसा झाला—एकदम न भितां मोठ्यानं आवाज लावून गायला कसं लागला ? कसं झालं ग हें ?

**दिदी :** मी काय सांगूं ? ज्ञानेश्वरांनीं सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी कशी लिहिली ? दोन अक्षरंदेखील न शिकलेल्या जनाबाईनें एवढे आर्त अभंग कसे लिहिले—शतकानुशतकं न कोमेजणारीं अशीं शेक्सपियरनं नाटकं कशीं लिहिलीं ? कांहीं कांहीं सांगतां येत नाहीं. गा—गा ना कांहीं तरी—असं गा कीं, ह्या प्रकाशानं ही खोली भरली आहे ना, तशी सुरांनीं भरून जाऊं दे—

**सुरेश :** छाय गाऊं दिदी !—पण दिदी, मला नुसत्या अर्धवट चीजा येतात. माझ्यापाशीं गाण्याला शब्द नाहींत—नुसते स्वर आहेत—

**दिदी :** नुसते स्वर ? म्हणजे विश्वाची भाषा आहे सुरेश. फलावियाचे वडील डॉक्टरांशीं ह्याच भाषेंत बोलले होते—

**मेनका :** फ्राविया ? फ्रॉविया कोण ?

**दिदी :** होती एक अभागिनी—गा सुरेश, गा.

(सुरेश मोकळ्या आवाजांत तराणा गातो.)

**महाराज :** स्टॉप् इट्! स्टॉप् इट्! काय चाललंय हें! अशक्य आहे हें सहन करणं दिदी—

**मेनका :** अंकल्!

**महाराज :** शट् अप्! कां आलीस तूं इथें? काय आहे हा आरडा-ओरडा? कशासाठीं गाणं-बजावणं चाललंय हें? दिदी—माझ्या मनःस्थितीची कुणालाच कल्पना येणार नाहीं आहे का?

**मेनका :** पण अंकल्—

**महाराज :** तूं बोलूं नकोस. जा तुम्ही. दिदीच्या प्रकृतीची तुम्हांला कांहीं काळजी आहे कीं नाहीं?

**दिदी :** पण पपा, मींच सांगितलं त्यांना गायला—

**महाराज :** आणि हे गायले! तुम्हांला कांहीं कॉमनसेन्स—आजाऱ्याच्या खोलींत असला धिंगाणा?

**मेनका :** धिंगाणा? म्यूझिक म्हणजे धिंगाणा! व्हॉट् अ मॅन्! उफ्—

**सुरेश :** माफ करा हं युवर हायनेस—मी केवळ दिदींच्या दर्शनाला आलों होतों—

**महाराज :** दर्शनाला? दिदी म्हणजे काय वाड्यावरची देवी वाटली कीं काय तुम्हांला?

**सुरेश :** बरोबर बोल्लांत—

**महाराज :** काय बरोबर बोल्लांत?

**सुरेश :** वाड्यावरची देवी!—खरंच तसं वाटलं मला—

**महाराज :** मेनका—चालायला लाग तुझ्या नवऱ्याला घेऊन.

**मेनका :** सुरेश—तूं म्हणालास तें बरोबर आहे—(पर्स उघडते.) अंकल्, सुरेश म्हणाला कीं—

**महाराज** : सुरेश काय म्हणाला तें ऐकायची इच्छा नाहीं मला —

**मेनका** : असं काय कुत्रं चावल्यासारखं करतां तुम्ही—सुरेश म्हणाला—हे तुम्हीं लग्नांत दिलेले हजार रुपये परत दे म्हणून—घेऊन टाका हे—शी! —आमच्या बंगल्यावरच्या अल्सेशियन्सचा खर्च आहे महिन्याला हजार रुपये—दिदी, सुरेश म्हणाला, तूं मला त्या दिवशीं कुंकू लावलंस ना, तें लाख रुपयांचं होतं—दिदी, सुरेश म्हणाला तूं त्याला शक्ति दिलीस आणि माझं कुंकू बळकट केलंय—

**दिदी** : जा मेनका, सुखी राहा! सुरेश, खूप गा—वेडे व्हा—आणि सगळ्यांना वेड करा—

**मेनका** : येतें हं अंकल्! तुमच्यापेक्षां आमचे बापूच हजार पटीनं बरे—रेसच्या घोड्यावर तरी प्रेम करतात—

**सुरेश** : दिदी, तुम्हांला समुद्राच्या उंच लाटा बघायच्या आहेत ना? आतां तुम्हांला बरं वाटलंय्—अवश्य या मुंबईला—अच्छा—

(मेनका आणि सुरेश जातात.)

**महाराज** : हें काय चाललंय तें सगळं मला कळेल का?

**दिदी** : तुम्ही तें कळून घ्यायचा प्रयत्नच करीत नाहीं पपा! कसं कळणार तुम्हांला—

**महाराज** : दिदी, तूं तरी असं म्हणूं नकोस! असा तिटकारा करूं नकोस माझा—निदान तूं तरी—बाकीच्यांची पर्वा नाहीं मला—

**दिदी** : कां नाहीं?

**महाराज** : हें विचारूं नकोस मला—तुझ्याशिवाय मला दुसरं कुणीहि नको आहे—

**दिदी** : कां नको पण पपा—

**महाराज** : दिदी, मला हें विचारूं नकोस—

**दिदी** : मला हें कळलंच पाहिजे पपा—मला हें समजूं शकत नाहीं—चार मुलांतल्या एकीवर माया आणि बाकीचीं डोळ्यासमोर देखील नको—हें काय आहे—समजूंच शकत नाहीं मला—समजूं शकत नाहीं—

**महाराज** : ठीक आहे—ऐक तर. कधीं तरी हें तुला समजायलाच पाहिजे होतं दिदी. पण एक वचन दे—

**दिदी** : कोणतं ?

**महाराज** : हें समजल्यावर तूं माझा तिटकारा करणारा नाहींस ना ? वचन दे—

**दिदी** : तें समजल्याशिवाय मी वचन कसं देऊं ? राजू—प्रताप—बेबी—काय असा अपराध केलाय त्यांनीं तुमचा ?

**महाराज** : माझा सर्वांनींच अपराध केलाय—तूं देखील—

**दिदी** : मी !

**महाराज** : हो तूं—बेबीच्या लग्नाला तूं पाठिंबा दिलास—

**दिदी** : हो—आणि अजूनहि मला त्यांत कांहीं चूक वाटत नाहीं—पण बेबीवरचा तुमचा राग आजचाच नाहीं—तिच्यावर तुम्हीं कधींच प्रेम केलं नाहीं.

**महाराज** : तुझ्याखेरीज मीं कोणावरहि प्रेम केलं नाहीं—

**दिदी** : असं कसं शक्य आहे ! मंमीवर नव्हतं का तुमचं प्रेम !—

**महाराज** : तुझा जन्म होण्यापूर्वी होतं—त्यानंतर मला कधींच तिच्या-बद्दल प्रेम वाटलं नाहीं—

**दिदी** : पण असं प्रेम नष्ट कसं होऊं शकेल ?

**महाराज** : माझ्या आयुष्यांत हें घडलं—

**दिदी** : पण मंमीचं तरी तुमच्यावर प्रेम होतं ना—

**महाराज** : ती फक्त मला भीत होती—

**दिदी** : पण तरी सुद्धां तुमचं एकमेकावर प्रेम होतं ना—होतं, होतं म्हणा पपा—

**महाराज** : नव्हतं, कधींहि नव्हतं—

**दिदी** : पण प्रेमाशिवाय तुम्ही एकत्र राहिलां कशीं—नाहीं पपा—मला सहन होत नाहीं हें—एकदां म्हाण—पुन्हा आठवून पाहा—असं कसं शक्य आहे ?—आणि प्रताप—राजू—बेबी—ह्यांचा जन्म—असल्या भीतीच्या पोटीं ? शी शी शी...

**महाराज** : दिदी—

**दिदी** : दूर व्हा—दूर व्हा पपा—(ममीच्या फोटोकडे पाहात) ममी—कां—कां राहिलीस ग तूं ह्या वाड्यांत ? भीति !—पपा, आयुष्यभर ही भीति उराशीं बाळगीत राहिली ममी, म्हणून आजारी पडली—तिला औषध हवं होतं तें भीतीवरचं—तिला हजारों रुपयांचीं औषधं दिलींत तुम्हीं, पण एका क्षणाचं प्रेम दिलं असतं—तर आमची ममी नसती सोडून गेली आम्हांला—ह्या वाड्याला लाथ मारून कां नाहीं बाहेर निघून गेली ममी ! कां—कां घाबरली—कशाला घाबरली ? असल्या प्रेमशून्य माणसाची पत्नी म्हणून कां स्वतःची विटंबना करीत राहिली ?—पपा, बेबीला व्यभिचारी म्हटलंत तुम्हीं, पण व्यभिचार केला तुम्हीं—एका असहाय घाबरलेल्या गाईवर—

**महाराज** : माझं ऐक दिदी—

**दिदी** : काय ऐकायचं तुमचं ? तुमची घृणा यायला लागली आहे मला. तुमचा हा राजवाडा—हें वातावरण—अपवित्र, अमंगल वाटायला लागलंय मला ! मी दारिद्र्यांत राहीन पपा, पण अपवित्र वातावरणांत राहणार नाहीं—

**महाराज** : कुठें चाललीस—

**दिदी** : वाट फुटेल तिथें—

**महाराज** : म्हणजे त्या उनाड इसमाकडे—दिदी, तुझ्यापासून खोटेपणाची अपेक्षा केली नव्हती मीं—

**दिदी** : काय खोटेपणा केला मीं ?

**महाराज** : तूं म्हणाली होतीस कीं त्याच्याबद्दल केवळ एक कलावंत म्हणून तुला आदर आहे—पण तुझं प्रेम आहे त्याच्यावर—

**दिदी** : होय ! पण मला त्याच्या आयुष्याचा नाश करायचा नव्हता—संसार उभा करण्याचं सामर्थ्य माझ्या दुबळ्या शरिरांत आहे असं वाटत नव्हतं मला—आणि त्याहीपेक्षां, पपा, तुमच्यासाठीं हें घर सोडायचं नव्हतं मला—बेबी गेली—उद्यां प्रताप, राजहि जातील—मग तुम्ही एकटे एकटे राहाल. ममीचे अश्रू डॉक्टरांनीं पुसले आणि ते आजन्म अविवाहित राहिले—तुमचे अश्रू पुसत मी तुमची मुलगी म्हणून नव्हे पपा, पण तुमची आई

म्हणून राहणार होतें. पण तुम्हांला कधींच समजू शकलं नसतं तें! पपा, ह्या घरांत तुम्हीं स्त्रीत्वाची विटंबना केलीत—निसर्गानें तुमचा क्रूर सूड घेतला—प्रकाशाच्या लेकरांना ह्या अंधारकोठडींत त्यानं जन्माला घातलं—त्यांना प्रकाशाकडेच गेलं पाहिजे—थेंबभर पाण्याला देखील शेवटीं विशाल समुद्राचीच ओढ असते पपा—माझ्यासारखी दुबळी मुलगी सुद्धां—त्याच विशाल जीवनाकडे निघाली आहे—जीवनाच्या त्या प्रकाशांत न्हाऊन आतां मला सुंदर व्हायचं आहे! जातें मी पपा. संजय माझ्या उत्तराची वाट पाहत असतील—

**महाराज** : कुठें?

**दिदी** : पृथ्वीच्या पाठीवर जिथं असतील तिथून त्यांना शोधून मी काढीन. तितकं सामर्थ्य आलंय माझ्या पायांत—आतां संपूर्ण संपूर्ण बरं वाटतंय मला—गुड् बाय् पपा—(जाते.)

**महाराज** : सुभानराव...(अत्यंत अस्वस्थपणें खोलींत फेऱ्या घालूं लागतात; सुभानराव ए. डी. च्या वेषांत येतात.) हें सहन होत नाहीं मला—

**सुभानराव** : काय युवर हायनेस?

**महाराज** : हा प्रकाश!...ओढून घ्या सगळे पडदे!...(सुभानराव खिडक्यादारांचे पडदे ओढूं लागतात.. खोलींत काळोख होऊं लागतो...महाराज दिदीच्या खुर्चीवर बसतात...)

IRBK-0123907

म. ग्रं. स. ज्ञा., [illegible]
क्र. २३९०५ नों. दि. ५।७।९०
वि. ८।१८९